• पंढरपूर • मंगळवार, १० डिसेंबर २०२४
• किंमत ₹ ४ • पाने : ८

# पंढरी संचार

pandharisanchar.com
RNI-MAH-MAR/1499/2000
• वर्ष २९ • अंक - २००




संत नामदेव पालखी सोहळ्याचे पंढरीत आगमन PII



'ॲडव्हान्सड इंडस्ट्रियल ऑटोमेशन अँड कंट्रोल'वर कार्यशाळा संपन्न PIII

## At a Glance

### आरोपींना पाच दिवसांची पोलिस कोठडी




**पंढरपूर :** गाय गोठ्यासाठी शासकीय अनुदान मिळवून देतो, असे सांगून अधिकृत प्रकरण न करता स्वतःकडील 10 लाख 14 हजार 500 रुपयांच्या, 500 रुपयांच्या 2029 बनावट नोटा दिल्या दिल्या. हे पैसे बँकेत भरण्यासाठी मधुकर माने गेले असता त्यांना हा बनावट नोटांचा प्रकार समजला. याप्रकरणी पंढरपूर शहर पोलिसांत दोघांच्या विरोधात गुन्हा दाखल झाला आहे. अतुल भारत तावरे (रा. करकंब), राजू विश्वनाथ चोरमले (रा. बार्डी, ता. पंढरपूर) या आरोपींना न्यायालयात हजर केले असता, पाच दिवसांची पोलिस कोठडी मिळाली आहे.

### काँग्रेसच्या बड्या नेत्याच्या इशारा



**सोलापूर :** लोकशाही व संविधानाला पायदळी तुडवत देशात अराजक पद्धतीने राजकारण सुरु आहे त्याला विरोध करण्याचा मार्ग मारकडवाडीने देशाला दाखवून दिला आहे. ईव्हीएम हटवून बॅलेट पेपरवर निवडणुका घेण्यासाठी मारकडवाडीने सुरु केलेल्या आंदोलनाची देशाने दखल घेतली असून, आता हे आंदोलन राष्ट्रीय पातळीवर जाईल व जोपर्यंत बॅलेट पेपरवर मतदान होत नाही तोपर्यंत हे आंदोलन सुरुच राहिल, असे महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे मुख्य प्रवक्ते अतुल लोंढे यांनी म्हटले आहे.

### शाळकरी मुलांचा जीव टांगणीला



**मंगळवेढा :** मंगळवेढा शहरातून ऊस भरुन कारखान्याकडे निघालेला ट्रॅक्टर दामाजी चौकातील इंग्लिश स्कूल गेटच्या समोर पलटी झाल्याची घटना शुक्रवारी पहाटे घडली असून, पाच दिवसात ट्रॅक्टर पलटी होण्याच्या दोन घटना घडल्या आहेत. दरम्यान या दोन्ही घटना सुट्टीच्या दिवशी व पहाटे घडल्यामुळे सुदैवाने यात कोणतीही हाणी होऊ शकली नाही. प्रशासन दोन घटना घडूनही कोणाच्या मृत्यूची वाट पाहते काय? असा संतापजनक सवाल नागरिकांमधून व्यक्त केला जात आहे.

### आ. योगेश टिळेकर यांचे मामा सतीश वाघ यांची हत्या



**सोलापूर :** पुणे-सोलापूर रस्त्यावर स्थित शेवाळवाडी परिसरात सोमवारी सकाळी प्रसिद्ध रिअल इस्टेट व्यावसायिक सतीश वाघ आणि भाजपचे आमदार योगेश टिळेकर यांचे मामा यांची हत्या झाली. चार व्यक्तींनी शेवरलेट कारमध्ये वाघ यांना बंदुकीचा धाक दाखवून अपहरण केले होते. त्यांचा मृतदेह सापडला असल्याची माहिती आहे. याबाबतचा अधिक तपास पोलिसांकडून करण्यात येत असल्याचे सांगण्यात आले.

# शासनाच्यावतीने पंढरीत होणाऱ्या कॉरिडॉरला व्यापाऱ्यांचा विरोध

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**पंढरपूर :** पंढरपूर राज्यातील महत्त्वाचे तीर्थक्षेत्र असल्यामुळे येथे येणाऱ्या भाविकांना सोवि सुविधा देण्यासाठी केंद्र व राज्य शासनाने पंढरपूरत कॉरिडॉर करण्याचा निर्णय घेतला आहे. मात्र कॉरिडॉर करताना घरे, दुकाने पाडण्यास व्यापाऱ्यांनी विरोध दर्शविला आहे. यामुळे व्यापारी आक्रमक झाले असल्याचे दिसून येत आहे.

आज मंदिर परिसरातील व्यापाऱ्यांनी महाद्वार येथे विठ्ठलाच्या मूर्तीस दुग्ध अभिषेक करून कॉरिडॉरला विरोध दर्शविला आहे. पंढरपूर राज्यातील महत्त्वाचे तीर्थक्षेत्र आहे. विठ्ठलाच्या दर्शनाला वर्षाला एक कोटीहून अधिक भाविक येतात. यामुळे येणाऱ्या भाविकांना सुविधा मिळाव्यात यास आमचाही पाठिंबा आहे. मात्र मंदिरे परिसर व प्रदक्षिणा मार्गावरील घरे दुकाने पाडून नागरिकांना विस्थापित करू नये अशी मागणी करून व्यापारी म्हणाले, कशा पद्धतीने कॉरिडॉर करण्यात येणार आहे. याबाबतचा आराखडा अद्याप जाहीर करण्यात आलेला नाही. कॉरिडॉर करण्यासाठी शासनाने एक समिती नियुक्त करावी. या समितीमध्ये महाराज मंडळी, शहरातील नागरिक, व्यापारी, लोकप्रतिनिधी यांचा समावेश करावा. विधानसभा निवडणुकीच्या अगोदर आमदार समाधान आवताडे, माजी आमदार प्रशांत परिचारक यांनी कॉरिडॉर करताना व्यापाऱ्यांना विश्वासात घेऊन तो करण्यात येईल असे सांगितले होते. मात्र त्या पद्धतीने काम होत नसल्याचे सांगून व्यापाऱ्यांनी नाराजी व्यक्त केली आहे. पंढरपुर हे भक्ती



पीठ आहे. यामुळे याचे महत्त्व राखावे ते पर्यटन केंद्र करू नये अशी मागणी काही व्यापाऱ्यांनी केली आहे. पंढरपूर कॉरिडॉरला व्यापाऱ्यांनी विरोध दर्शविला आहे. यामुळे आता केंद्र व राज्य शासन कोणती भूमिका घेणार याकडे लक्ष लागले आहे . विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर गेल्या वर्षापासून कॉरिडॉरबाबत कोणत्याही हालचाली होत नव्हत्या. मात्र विधानसभा निवडणूक झाल्यानंतर दिल्लीचे पथक मुंबई येथे आले. या पथकातील सदस्या केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी पंढरपूर आतील कॉरिडॉर हा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा ड्रीम प्रोजेक्ट असल्याने तो लवकरच पूर्ण करण्यात येणार असल्याचे सांगितले. यामुळे पंढरपुरात खळबळ उडाली असून व्यापारी व नागरिकात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

## पोलिसांकडून गणेश मंडळांचा सन्मान

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**पंढरपूर :** एक गाव एक गणपती व पारंपारिक वाद्याचा वापर करून मिरवणुका काढणाऱ्या गणेश मंडळांना पुरस्कार देऊन पंढरपूर तालुका पोलीस ठाण्यावतीने सन्मान करण्यात आला . पंढरपूर तालुका पोलीस ठाण्यात उपविभागीय पोलीस अधिकारी अर्जुन भोसले यांच्या हस्ते गणेश मंडळांना पुरस्कार देऊन सन्मान करण्यात आला. यावेळी पोलीस निरीक्षक तय्यब मुजावर व अधिकारी उपस्थित होते. गणेशोत्सव शांततेत पार पडावा म्हणून पंढरपूर तालुका पोलीस ठाण्यावतीने एक गाव एक गणपती योजना जाहीर करण्यात आली होती. तसेच पारंपारिक वाद्याचा वापर करून मिरवणुका करणाऱ्या गणेश मंडळांना पुरस्कार देण्याचे जाहीर केले होते. त्याप्रमाणे पंढरपूर तालुका



**पंढरपूर :** पंढरपूर तालुका पोलीस ठाण्यावतीने गणेश मंडळाच्या पदाधिकारी यांचा सन्मान करण्यात आला.

पोलीस ठाण्यावतीने पुरस्काराचे वितरण करण्यात आले. पारंपारिक वाद्याचा वापर करून आकर्षक मिरवणुका काढल्याबद्दल प्रथम क्रमांकाचा पुरस्कार खर्डी, व्दितीय पुरस्कार देगाव, तृतीय पुरस्कार लक्ष्मी टाकळी या गावातील गणेश मंडळांना देण्यात आला. तसेच एक गाव एक गणपती योजना राबविल्याबद्दल विटे, अजोती, भैरवनाथवाडी, बिटरगाव गावातील गणेश मंडळाचे पदाधिकारी यांचा सन्मान करण्यात आला. यावेळी उपविभागीय पोलीस अधिकारी अर्जुन भोसले यांनी गणेश मंडळांनी शांततेत यंदाचा गणेशोत्सव पार पाडला याबद्दल सर्वांचे अभिनंदन केले. तालुका पोलिसांनी गणेश मंडळांना पुरस्कार देऊन सन्मान केल्यामुळे पदाधिकारी व कार्यकर्ते यांच्यातून आनंद व्यक्त होत आहे.



## बांधकाम अर्धवट सोडून साडेतीन लाखांची फसवणूक

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**सोलापूर :** ईमारतीचे बांधकाम करण्यासाठी करार केला. मात्र, करारानुसार बांधकाम पूर्ण न करता साडेतीन लाख रुपये घेऊन फसवणूक केल्याप्रकरणी ठेकेदार पती व पत्नीवर फसवणुकीचा गुन्हा दाखल झाला आहे. ही घटना २६ डिसेंबर २०१९ ते ४ ऑक्टोबर २०२३ दरम्यान निराळे वस्ती, सोलापूर या ठिकाणी घडली आहे. याबाबत संतराम ऊर्फ शांतिकुमार गुलाब नागटिळक (वय ५४, रा. न्यू बुधवार पेठ, डॉ. आंबेडकर नगर, सम्राट चौक) यांनी फिर्याद दिली असून, राजकुमार भीमाशंकर उडचण व वर्षा राजकुमार उडचण (दोघेही रा. निराळे वस्ती, सोलापूर) यांच्याविरुद्ध फौजदार चावडी पोलिसांत गुन्हा नोंद झाला आहे.

## बदलत्या वातावरणामुळे द्राक्ष उत्पादक शेतकरी चिंताग्रस्त

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**पंढरपूर :** हिवाळा ऋतू त थंडी पडते हे वातावरण द्राक्ष पिकाला पोषक असते. मात्र सध्या कडक ऊन व ढगाळ वातावरण असल्यामुळे वातावरणातील बदलामुळे द्राक्ष पिकावर परिणाम होणार असल्याने शेतकरी चिंताग्रस्त झाला आहे.

पंढरपूर तालुक्यात कासेगाव, अनवली, भोसे, कोर्टी, वाखरी, खर्डी, भंडीशेगाव, चिलाईवाडी, करकंब आदी परिसरात मोठ्या प्रमाणावर द्राक्ष बागा आहेत. सध्या द्राक्ष बागात छाटणी करण्यात आली असून पेस्टिंग करण्यात आले आहे. हिवाळा ऋतूत थंडी असल्यामुळे हे वातावरण द्राक्ष पिकांना पोषक असते. यामुळे द्राक्षाची वाढ चांगल्या प्रकारे होते. मात्र सध्या थंडी गायब



झाली असून ढगाळ वातावरण व कडक ऊन पडत आहे. यामुळे याचा परिणाम द्राक्ष पिकावर होऊ लागला आहे. द्राक्ष पिकावर किडीचा प्रादुर्भाव होण्याची शक्यता आहे. तसेच उत्पादनात घट होणार असल्यामुळे शेतकरी चिंताग्रस्त झाला आहे. द्राक्ष पिकावर किडीचा प्रादुर्भाव होऊ नये म्हणून शेतकरी विविध प्रकारचे औषध फवारणी करतात मात्र. या औषधांच्या किंमती जास्त असल्यामुळे शेतकऱ्यांना आर्थिक भुर्दंड सहन करावा लागत आहे.

## विद्यार्थी शिकत असलेल्या महाविद्यालयात परीक्षा केंद्र देण्याची मागणी

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**पंढरपूर :** पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ अंतर्गत 108 महाविद्यालय आहेत. या महाविद्यालयामध्ये 70 हजार विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. गेल्या दोन वर्षापासून परीक्षा केंद्रामध्ये बदल करण्यात आला आहे. यामुळे विद्यार्थ्यांना अडचण निर्माण होत आहे. तरी परीक्षा केंद्रे आहे त्याच पद्धतीने सुरू ठेवावी अशी मागणी विद्यार्थ्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडवणीस यांना निवेदन पाठवून केली आहे. सोलापूर विद्यापीठामध्ये शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांची परीक्षा या अगोदर त्याच महाविद्यालयात परीक्षा केंद्रे तयार करून घेण्यात येत होती. यामुळे विद्यार्थ्यांना कोणतीही अडचण येत नव्हती. मात्र सन 2023 पासून विद्यापीठाने प्रायोगिक तत्त्वावर वेगळ्या महाविद्यालयात प्रवेश केंद्रे निर्माण करून परीक्षा घेण्यास सुरुवात केली आहे. परीक्षेचे कामकाज करण्यासाठी वेबसाईट निर्माण केली आहे. मात्र कामकाज व्यवस्थित होत नसल्यामुळे अडचण निर्माण होत आहे. ऑक्टोबर महिन्यात होणाऱ्या परीक्षा तीन वेळा पुढे ढकलण्यात आल्या आहेत. परीक्षा घेण्यास अडचण निर्माण होत आहे. परीक्षेचा निकाल वेळेवर लागत नाही. यामुळे विद्यार्थ्यांना पुढील प्रवेश घेण्यासाठी अडचण निर्माण होत आहे. तरी सोलापूर विद्यापीठाने पूर्वीप्रमाणे विद्यार्थी शिकत असलेल्या त्याच महाविद्यालयात परीक्षा केंद्रे सुरू करावीत अशी मागणी विद्यार्थ्यांतून होत आहे. या मागणीचे निवेदन विद्यार्थ्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडवणीस यांना पाठविले आहे. यामुळे आता मुख्यमंत्री फडवणीस कोणता निर्णय घेणार याकडे लक्ष लागले आहे.

## हम करे सो कायदा यासारखं पवार वागत आहेत

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क



**माळशिरस :** राष्ट्रवादी शरदचंद्र पवार गटाचे अध्यक्ष शरद पवार यांनी आज मारकडवाडी गावाला भेट दिली. याच मुद्यावरुन भाजप आमदार गोपीचंद पडळकर यांनी त्यांच्यावर टीका केली. हम करे सो कायदा यासारखं शरद पवार वागत आहेत. शरद पवार लोकशाही मानत नाहीत. जे नातेवाईक निवडून आले ते ईव्हीएम घोटाळ्याने निवडून आलेत का? हे आता ईव्हीएमच्या नावाने बोंबा मारत आहेत, असे म्हणत पडळकरांनी शरद पवारांवर टीका केली. शरद पवार गटाचे आमदार उत्तम जानकर यांना गावात कमी मते असल्याचे समोर आल्याने अंतर त्यांच्या गटाने यावर आक्षेप घेतला होता.

## शुभेच्छा ....

पंढरी संचार छायाचित्र सेवा



**पंढरपूर :** महाराष्ट्र राज्याच्या उपमुख्यमंत्रीपदी एकनाथ शिंदे यांनी शपथ घेतल्यानंतर शिवसेनेचे सोलापूर लोकसभा संपर्कप्रमुख महेशनाना साठे यांनी दिल्या शुभेच्छा दिल्या. याप्रसंगी घेतलेले छायाचित्र.

## सांगोला शहरात चोरीच्या घटनांत वाढ

# सर्वाधिक चोरीच्या घटना आठवडा बाजारात; पोलिसांचे दुर्लक्ष

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क



**सांगोला :** सांगोला आठवडा बाजारातील मोबाईल चोरीच्या घटनांमध्ये दिवसेंदिवस वाढ होत आहे. काल रविवारी आठवडा बाजारात ६ जनांचे मोबाईल चोरीला गेल्याची माहिती आहे. पोलिसांना चकमा देऊन मोबाईल चोर पसार होत आहेत. यावरून पोलीस गस्तीला व चोरांचा हात खिशाला अशी परिस्थिती भाजी मंडई आठवडा बाजारात निर्माण झाली आहे.

सांगोला तालुक्याचा आठवडा बाजार मोठया प्रमाणात भरला जातो. या बाजारात खरेदी विक्रीसाठी तालुका व तालुक्याबाहेरचे व्यापारी, ग्राहक येतात. मात्र या बाजारात मोबाईल चोरट्यांनी चांगलाच धुमाकूळ घातला आहे. चोरट्यांनी महागड्या मोबाईलवर डल्ला मारण्याचे सत्र सुरू ठेवले आहे. यामुळे बाजारकरुंमध्ये भितिचे वातवरण निर्माण झाले आहे.

मोबाईल चोरीच्या मोठ्या प्रमाणात घटना घडल्यानंतर आणि नागरिकांच्या तक्रारी प्राप्त झाल्यानंतरच आठवडा बाजारात पोलिसांची गस्त सुरू होते अशी तक्रार आहे. मध्यंतरी पोलीस बाजारात फिरकत देखील नाहीत. काही वेळेला बाजारात पोलीस गस्त असताना देखील पोलिसांच्या हातावर तुरी देऊन मोबाईल चोर आपले काम फत्ते करतात असेही नागरिकांच्या तक्रारी आहेत. मोबाईल चोर-पोलिसांचा पाठशिवणीचा खेळ सुरू आहे. यामध्ये सर्वसामान्य जनतेच्या खिशाला चाट बसत आहे. मोबाईल चोरीचे प्रकार घडत असताना याबाबत काही मोबाईल धारकांना तक्रारी केल्या तर काहींनी पोलिसांच्या प्रश्नांची कटकट नको म्हणून पोलीस ठाण्याकडे येण्याचे टाळले जात आहे.

अत्याधुनिक युगात नवनवीन डिझाइनचे ब्रँडेड महागडे मोबाईल बाजारात येत आहेत. ग्राहक मोठया हौसेने खरेदी करीत आहेत. यावर सहजपणे गर्दीचा फायदा घेत चोर महागडे मोबाईल हातोहात लंपास करीत आहेत. यावर सांगोला पोलीस स्टेशनमधील शहर बीट चे पोलीस व गुन्हे शाखेच्या कामकाजावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. एखादा अपवाद आठवडा वगळाला तर इतर बाजारात मोबाईल चोरीच्या घटना घडतात असे ही बाजार करू सांगतात. यावर प्रशासनाने गांभीर्याने घेऊन आठवडा बाजारातील मोबाईल चोरीला आळा बसवावा अशी मागणी बाजारकरू मधून केली जात आहे.

## मध्य रेल्वेच्या ८० गाड्यांमध्ये धुके निवारण यंत्रणा

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क



**सोलापूर :** दाट धुक्यामुळे जेव्हा कमी दृश्यमानता असेल तेव्हा लोकोपायलटला साधारण पाचशे मीटरपर्यंतची सिग्नलची स्थिती समजणार आहे. दाट धुक्यामुळे रेल्वेचा वेग मंदावतो नियोजित वेळेवर परिणाम होतो. यावर उपाय म्हणून मध्य रेल्वेच्या सोलापूर विभागात धुके सुरक्षा उपकरणाद्वारे (फॉग पास डिव्हाइस) हा अडथळा दूर होणार आहे. कमी दृश्यमानता असली, तरी लोकोपायलटला साधारण ५०० मीटरपर्यंतची सिग्नलची स्थिती समजणार आहे. यामुळे अनेक रेल्वे गाड्यांचा वेग अधिक होण्यास व प्रवाशांना इच्छित ठिकाणी वेळेवर पोचण्याची सोय होणार आहे. सोलापूर विभागात ८० इंजिनमध्ये फॉग पास डिव्हाईस उपकरणे बसविण्यात आल्याची माहिती रेल्वे प्रशासनाकडून देण्यात आली.

## सोलापूरसाठी स्वतःचा हक्काचा पालकमंत्री मिळण्याची अपेक्षा

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**सोलापूर :** मागील पाच वर्षांत पहिली अडीच वर्षे महाविकास आघाडी आणि दुसरी अडीच वर्षे महायुती सरकारच्या कालावधीत सोलापूरला स्वतःचा हक्काचा पालकमंत्री मिळाला नाही. जिल्ह्याबाहेरील मंत्र्यांनी पालकमंत्रिपदाची जबाबदारी सांभाळली. त्यामुळे अनेक स्थानिक विकासाचे प्रश्न रेंगाळले आहेत. यंदाच्या सत्ताधारी महायुतीकडून सोलापूरला स्वतःचा पालकमंत्री मिळावा, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.यापूर्वी दिवंगत नेते राजारामबापू पाटील, ज्येष्ठ नेते शरद पवार, सुशीलकुमार शिंदे, विजयसिंह मोहिते-पाटील, अशा दिग्गज नेत्यांनी सोलापूरच्या पालकमंत्रिपदाची धुरा सांभाळली होती. १९८२-८३ साली तत्कालीन मुख्यमंत्री बॅ. बाबासाहेब भोसले यांच्या औटघटकेच्या काळात सोलापूरचा स्वतःचा पालकमंत्री लाभला नव्हता. त्यानंतर ३५-४० वर्षांच्या कालखंडानंतर मागील पाच वर्षे सोलापूर जिल्हा मंत्रिपदापासून वंचित राहिला होता. त्यामुळे साहजिकच पालकमंत्रिपद दिलीप वळसे-पाटील, जितेंद्र आव्हाड, दत्तात्रय भरणे, राधाकृष्ण विखे- पाटील, चंद्रकांत पाटील यांनी आपापल्या परीने पालकमंत्रिपदाची जबाबदारी सांभाळली होती. यातून सोलापूरला अपेक्षित न्याय मिळू शकला नाही. अनेक विकासाचे प्रश्न रेंगाळत पडले आहेत. या पार्श्वभूमीवर यंदाच्या महायुतीच्या नवीन सरकारमध्ये सोलापूरला स्वतःचा हक्काचा पालकमंत्री मेळावा, अशी आशा सोलापूरकर बाळगून आहेत.

**सोलापूर :** 2025 साली महाराष्ट्र राज्य शासकीय सेवेत कार्यरत कर्मचाऱ्यांना 26 सार्वजनिक सुट्ट्या मिळतील. प्रमुख सुट्ट्यांमध्ये 26 जानेवारी (प्रजासत्ताक दिन), 19 फेब्रुवारी (शिवाजी महाराज जयंती), 31 मार्च (रमजान ईद), 15 ऑगस्ट (स्वातंत्र्य दिन), 2 ऑक्टोबर (गांधी जयंती) आणि 25 डिसेंबर (ख्रिसमस) यांसारख्या दिवशी सुट्टी राहील. याशिवाय, महाशिवरात्री, होळी, गुढीपाडवा, गणेश चतुर्थी, दिवाळी, बकरी ईद आणि अन्य सणांच्या पार्श्वभूमीवर सुट्ट्या जाहीर करण्यात आलेल्या आहेत.

### श्रीसंत ज्ञानेश्वर महाराजांचा संजीवन समाधी सोहळा साजरा करून

# संत नामदेव पालखी सोहळ्याचे पंढरीत आगमन

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**पंढरपूर :** नामा म्हणे आता, लोपला दिनकर।
बाप ज्ञानेश्वर, समाधिस्थ ॥
आलंकापूरी आळंदी येथे कैवल्य साम्राज्य श्रीसंत ज्ञानेश्वर महाराजांचा संजीवन समाधी सोहळा साजरा करून परतीच्या दिशेने निघालेल्या संत नामदेव महाराज पालखी सोहळ्यांचे सोमवारी पंढरी नगरीत आगमन झाले.



मंगळवार दि. 26 नोव्हेंबर रोजी उत्पत्ती एकादशी व गुरुवार दि. 28 नोव्हेंबर रोजी आळंदी येथे संत ज्ञानेश्वर महाराजांचा संजीवन समाधी सोहळा साजरा झाला.

या सोहळ्यासाठी संत-महंतांच्या पालख्यांसह लाखो भाविक आळंदीत दाखल झाले होते. अमावस्येपर्यंत पालखी सोहळ्यांचा मुक्काम आळंदी येथील श्री विष्णु मंदिर येथे होता. रविवार दि. 1 डिसेंबर रोजी अमावस्येनिमित्त काल्याचा कार्यक्रम झाल्यानंतर संतांच्या पालखी सोहळ्यांनी परतीच्या दिशेने प्रवास सुरु केला.


सोमवार दि. 9 डिसेंबर, मार्गशीर्ष शु. 9 दिवशी पालखी सोहळ्यांचे दुपारी 5 वाजता इसबावी येथील विसावा मंदिराजवळ आगमन झाले. याठिकाणी महाराज मंडळी, मानकरी व नागरिकांनी दर्शन घेवून पालखी सोहळ्याचे स्वागत केले. याठिकाणी अभंग व आरती करण्यात आली. पालखी रथ फुलांनी सजविण्यात आला. त्यानंतर शाही लवाजम्यासह सनई-चौघड्याच्या निनादात, हरिनामाचा गजर करत पालखी सोहळा कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालय, सरगम चौक, भोसले चौक, भादुले चौक, महाद्वार यामार्गे संत नामदेव पायरी येथे आला. यावेळी अभंग, आरती करण्यात आली.

त्यानंतर पालखी सोहळा संत नामदेव मंदिरात विसावला. नामदास परिवारातील सुवासिनी महिलांनी पालखीचे औक्षण केले. याठिकाणी श्री केशवराज, संत नामदेव-जनाबाई यांची आरती झाल्यानंतर मानकऱ्यांना श्रीफळ प्रसाद देण्यात आला. पालखी सोहळा यशस्वी होण्यासाठी सर्वश्री ह.भ.प. माधव महाराज, मुकुंद महाराज, केशव महाराज, कृष्णदास महाराज, ज्ञानेश्वर महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली एकनाथ महाराज, विठ्ठल महाराज, हरि महाराज, निवृत्ती महाराज, मुरारी महाराज, केदार महाराज, भावार्थ महाराज, आदित्य महाराज यांच्यासह नामदास महाराज परिवार व फडकऱ्यांनी परिश्रम घेतले.

### वारकऱ्यांना अल्पोपहाराचे वाटप

● संत नामदेव महाराज पालखी सोहळ्यातील वारकऱ्यांना क्रांतीसिंह नाना पाटील चौक येथे संत नामदेव शिंपी समाज, युवक संघटनेच्यावतीने चहा, केळी व शाबू खिचडी या अल्पोपहाराचे वाटप करण्यात आले. यावेळी अध्यक्ष गणेश उंडाळे, उपाध्यक्ष संजय जवंजाळ, खजिनदार शशिकांत जवंजाळ, विश्वस्त राजेश धोकटे, बाबासाहेब म्हैंदरकर, विलास पोरे, सेवक कृष्णा जवंजाळ, जयवंत कांबळे, माजी अध्यक्ष ज्ञानेश्वर भावलेकर गुरुजी, विष्णु पोरे, गोविंद वेल्हाळ, रत्नाकर पिसे, दत्ता चांडोले, शिवकुमार भावलेकर, युवक संघटनेचे अध्यश शैलेश धट, महेश गाणबोटे यांच्यासह हजारो वारकरी, समाज बांधव उपस्थित होते.

## शेअर मार्केटमध्ये पैशाचे आमिष दाखवून फसवणूक




■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**सांगोला :** शेअर मार्केटमध्ये पैसे गुंतवणूक केल्यास एका वर्षात दाम दुप्पट करून देण्याचे अमित दाखवून सांगोल्यातील भुसार व्यापाऱ्याची 17 लाख 70 हजार 500 रुपयांची फसवणूक केल्याची घटना घडली आहे. याबाबत अमर लोखंडे यांनी दिलेल्या तक्रारीवरून अंकुश तुकाराम लिगाडे आणि सुनील शहाजी पाटील यांच्या विरोधात फसवणुकीचा गुन्हा दाखल केला आहे. याप्रकरणी पोलीसांनी कोणासही अटक केली नाही. सदर आरोपींचे राजकीय नेत्यांशी निकटचे संबंध असल्यामुळे पोलीस यांना अटक करणार का याकडे सांगोला तालुक्यातील नागरिकांचे लक्ष लागून राहिले आहे.

## Selected

## मुख्यमंत्र्यांचे नाव घेणारे कोठे ठरले एकमेव आमदार



**सोलापूर :** सोलापूर शहर मध्य विधानसभा मतदारसंघातील भारतीय जनता पार्टीचे आमदार देवेंद्र कोठे यांनी पद व गोपनीयतेची शपथ घेताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे नाव घेतले. फडणवीस यांचे नाव घेणारे ते एकमेव आमदार ठरले आहेत. आमदार कोठे म्हणाले मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वावर श्रद्धा ठेवून मी ही शपथ घेत आहे असा उल्लेख करून त्यांनी विधानसभा सदस्यत्वाची शपथ घेतली.

## फौजदाराला हुज्जत घालणे आले अंगलट




**सोलापूर :** वाहतूक शाखेच्या फौजदाराला हुज्जत घालणे एकाला चांगलेच महागात पडले आहे. त्याच्यावर शासकीय कामात अडथळा आणला म्हणून गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याप्रकरणी शहर वाहतूक शाखेचे फौजदार नागेश येणपे यांनी फिर्याद दिली असून त्यावरून वसीम अब्बाद शेख (रा. दहीटणे, सोलापूर ) याच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. येणपे यांनी बुलेटला बसविलेला मॉडीफाय सायलेन्सर काढायला सांगितल्याने शेख याने त्यांच्याशी हुज्जत घातली. त्यामुळे त्याच्याविरुद्ध शासकीय कामात अडथळा आणल्याप्रकरणी जोडभावी पेठ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे.

## पुरस्कार....

पंढरी संचार छायाचित्र सेवा




**माळशिरस :** माजी आमदार दत्तात्रय सावंत यांच्या हस्ते 'कृतीशील प्राध्यापक' पुरस्कार स्वीकारताना प्रा. विनोद बाबर . यावेळी महिला विज्ञान महाविद्यालयाचे शिक्षक उपस्थित होते.

## आ. कोठे यांनी सहपरिवार घेतली मुख्यमंत्र्यांची भेट



■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**सोलापूर :** सोलापूर शहर मध्ये विधानसभा मतदारसंघातील भारतीय जनता पार्टीचे नवनिर्वाचित आमदार देवेंद्र कोठे यांनी मुंबईतील विशेष अधिवेशनादरम्यान परिवारासह मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेऊन त्यांचे आशीर्वाद घेतले. यावेळी देवेंद्र कोठे यांच्या पत्नी मोनिका कोठे, मुलगा श्रीविष्णुराज, मुलगी कविश्री हे उपस्थित होते.

## आंतर महाविद्यालयीन कराटे स्पर्धा संपन्न



**सोलापूर :** पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर सोलापूर विद्यापीठ अंतर्गत आंतर महाविद्यालयीन कराटे स्पर्धा आज वि. गु. शिवदारे आर्टस अँड कॉमर्स व सायन्स महाविद्यालयात वर्ल्ड कराटे फेडरेशनच्या नियमांनुसार 'कराटे डो असोसिएशन ऑफ महाराष्ट्र' यांच्या टेक्निकल सपोर्टने उत्साहात पार पडल्या. या स्पर्धेचे उद्घाटन प्रा. कुलगुरू डॉ. लक्ष्मीकांत दामा, शिवदारे कॉलेजचे चेअरमन राजशेखर शिवदारे, डॉ. लकडे, सचिन गायकवाड, संदीप गाडे यांच्या प्रमुख उपस्थितीत झाले. यावेळी संगीता सुरेश जाधव, भुवनेश्वरी जाधव, मिहिर सुरेश जाधव उपस्थित होते.






## विनोद बाबर यांना 'कृतिशील प्राध्यापक'पुरस्कार प्रदान

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**माळशिरस :** पानीव ता.माळशिरस येथील श्रीराम शिक्षण संस्थेचे विशेष कार्यकारी अधिकारी व श्रीराम महिला विज्ञान महाविद्यालयाचे प्राचार्य विनोद बाबर यांना महाराष्ट्र राज्य शाळा कृती समितीच्यावतीने २०२४-२५ साठी "कृतिशील प्राध्यापक पुरस्कार" देऊन सन्मानित करण्यात आले. हा पुरस्कार त्यांना शैक्षणिक व प्रशासकीय कार्यातील उल्लेखनीय योगदानाबद्दल प्रदान करण्यात आला.

पुरस्कार वितरण समारंभ सिंहगड कॉलेज, पंढरपूर येथे संपन्न झाला. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष आणि प्रमुख पाहुणे म्हणून महाराष्ट्र राज्य शाळा कृती समितीचे सचिव व माजी आमदार दत्तात्रय सावंत उपस्थित होते. या कार्यक्रमाला डॉ. शशिकला जगताप (आरोग्य समन्वयक, श्री छत्रपती शिवाजी समोपचार रुग्णालय, सोलापूर), डॉ. यु. एफ. जानराव (कुष्ठरोग तंत्रज्ञ), अमोल सुरवसे (पुणे बोर्ड संचालक), नारायण भानवसे (महात्मा फुले विद्यालय संस्थापक), तात्यासाहेब काटकर यांच्यासह श्रीराम महिला बी.एस्सीचे प्रा. अभिजित बाबर,प्रा.सत्यजित रेडे पाटील, प्रा.गणेश शेळके ,मोहन कांबळे, उदय भोसले यांची उपस्थिती होती. या गौरवाबद्दल विनोद बाबर यांचे श्रीराम शिक्षण संस्थेचे अध्यक्ष प्रकाश पाटील, मार्गदर्शक श्रीलेखा पाटील, उपाध्यक्ष करण पाटील, सचिव ॲड. अभिषेक पाटील तसेच सर्व प्राचार्य व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी अभिनंदन केले

### आदी जांबमुनी महाराज रथोस्तव समिती अध्यक्षपदी साळवे

**सोलापूर :** श्री आदी जांबमुनी महाराज मोची समाज मध्यवर्ती रथोस्तव समितीच्या नूतन अध्यक्षपदी शानराव साळवे यांची एकमताने निवड करण्यात आली. निवडी नंतर त्यांचा मान्यवरांच्या हस्ते पुष्पहार घालून सत्कार करण्यात आला. यावेळी जांबमुनी मोची समाजातील प्रमुख पदाधिकारी व युवक वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होते. सोलापूर शहरात दरवर्षी आदी जांबमुनी महाराज यांचा रथोत्सव सोहळा मोठ्या उत्साहात साजरा केला जातो. यावर्षी देखील हा सोहळा मोठ्या उत्साहात साजरा केला जाणार असल्याची माहिती अंबादास करगुळे यांनी यावेळी दिली.

## शिंदे विद्या मंदिर येथे क्रीडा सप्ताहाचे उदघाटन



**सोलापूर :** संभाजीराव शिंदे विद्या मंदिर, जुनी मिल कंपाऊंड, सोलापूर मध्ये क्रीडा सप्ताहाचे उद्घाटन आंतरराष्ट्रीय चित्रकार सचिन खरात यांच्या हस्ते क्रीडा ज्योत प्रज्वलीत करून करण्यात आले. यावेळी संस्था सदस्या डॉ. राधिका चिलका, राष्ट्रीय हॉलीबॉल खेळाडू सुदेश मालप, माध्यमिक विभागाचे प्र. मुख्याध्यापक सचिन ढोपरे, प्राथमिक विभागाच्या मुख्याध्यापिका राजश्री नारायणकर, प्रशालेचे माजी मुख्याध्यापक नागेश कुमार काटकर आदी उपस्थित होते.






### श्री शंकर सहकारीची ऊसाच्या पहिल्या हप्त्यामध्ये गत

## हंगामाच्या तुलनेत रक्कम रु 150 प्रती मे टना ची विक्रमी व भरघोस वाढ

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**माळशिरस :** श्री शंकर सहकारी साखर कारखाना लिमिटेड सदाशिवनगर सन 2024-25 गळीत हंगामासाठी गाळपास आलेल्या ऊस बिलाचा पहिला हप्ता रक्कम रू 2750/- प्रति मे टन प्रमाणे तसेच बिगर ॲडव्हान्स तोडणी वाहतुकीची पहिल्या मस्टर ची बिले दिनांक 10/12/2024 रोजी सभासद,ऊस उत्पादक शेतकरी व तोडणी वाहतूक कंत्राटदारांच्या बँक खात्यावर वर्ग होणार असलेची माहिती कारखान्याचे व्हाईस चेअरमन ॲड. मिलिंद कुलकर्णी यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे दिली.



कारखान्याचे चेअरमन आ. रणजितसिंह मोहिते पाटील यांनी दिलेल्या सूचनेनुसार गाळपास आलेल्या ऊसाची बिले,बिगर ॲडव्हानस तोडणी वाहतुकीची बिले अदा करणेची वचनपूर्ती कारखान्याच्या व्यवस्थानाकडून केली जात असलेचे यावेळी बोलताना श्री कुलकर्णी यांनी सांगितले. सभासद व ऊस उत्पादकांनी आमदार श्री रणजितसिंह मोहिते पाटील यांचे नेतृत्वावर कायम विश्वास दाखवून ऊस पुरवठा कारखान्यास केला आहे.सभासद, ऊस उत्पादकांना जास्तीत जास्त ऊस दर देण्यासाठी व अडचणीच्या परिस्थितीमध्ये व्यवस्थापन नेहमीच सभासद, ऊस उत्पादकांच्या पाठीशी खंबीर पणे उभे असलेचे व्यवस्थापनाने दाखवून दिले असून चालू गळीत हंगामामध्ये कारखान्याने 3.50 लाख मे टन गाळपाचे उद्दिष्ट निर्धारित केले असून सभासद व ऊस उत्पादक शेतकऱ्यांनी आपला सर्व ऊस कारखान्याकडे गाळपास पाठविणेचे आवाहन श्री कुलकर्णी यांनी यावेळी केले.

**सोलापूर :** वाढत्या महागाईचा शेतकरी आणि कृषी उपक्रमांवर नकारात्मक परिणाम होऊ नये म्हणून भारतीय रिझर्व्ह बँकेने एक महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. RBI ने तारणमुक्त कृषी कर्जाची मर्यादा वाढवली आहे, ज्यामुळे खाजगी आणि सार्वजनिक क्षेत्रातील बँकांना शेतकऱ्यांना अधिक कर्ज देण्याची संधी मिळेल. या निर्णयामुळे शेतकऱ्यांना कृषी कर्ज घेताना सोय होईल, आणि त्यांना आवश्यक असलेल्या अधिक वित्तीय सहाय्याची प्राप्ती होईल. RBI च्या या पावलाने शेतकऱ्यांना आर्थिकदृष्ट्या मजबूत होण्याची संधी मिळेल आणि कृषी क्षेत्राला प्रोत्साहन मिळू शकते.

### श्री.विठ्ठल एज्युकेशन अँड रिसर्च इन्स्टिट्यूट संचलित कॉलेजमध्ये

## 'अॅडव्हान्सड इंडस्ट्रियल ऑटोमेशन अँड कंट्रोल'यावर कार्यशाळा संपन्न

■ पंढरीसंचार न्यूज नेटवर्क

**पंढरपूर :** गोपाळपूर (ता.पंढरपूर) येथील श्री.विठ्ठल एज्युकेशन अँड रिसर्च इन्स्टिट्यूट संचलित कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगच्या इलेक्ट्रिकल इंजिनिअरिंग विभागामध्ये नुकतीच 'अॅडव्हान्सड इंडस्ट्रियल ऑटोमेशन अँड कंट्रोल' या विषयावरील कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. या कार्यशाळेत एकूण ७९ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. या कार्यशाळेत प्रशिक्षणार्थ्यांना 'इंडवेल ऑटोमेशन, मंगरूळ' चे ट्रेनर हिमांशु कुमार यांचे मार्गदर्शन लाभले.

स्वेरीचे संस्थापक सचिव व कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगचे प्राचार्य डॉ. बी.पी. रोंगे यांच्या मार्गदर्शनाखाली, कॅम्पस इन्चार्ज डॉ. एम. एम पवार यांच्या सहकार्याने, उपप्राचार्या डॉ. मिनाक्षी पवार व इलेक्ट्रिकल इंजिनिअरिंगच्या विभागप्रमुख डॉ. डी. ए. तंबोळी यांच्या नेतृत्वाखाली आयोजिलेल्या या कार्यशाळेचे उदघाटन प्लेसमेंट विभागाचे अधिष्ठाता प्रा. एस. एम. खोमने यांच्या हस्ते करण्यात आले. पाहुण्यांचे स्वागत प्रा.आर.एन. खांडेभरड यांनी केले. शैक्षणिक इन्चार्ज डॉ. एम. पी. ठाकरे यांनी यावेळी इलेक्ट्रिकल इंजिनिअरिंग विभागाची अद्ययावत माहिती दिली. विद्यार्थ्यांसाठी अशा कार्यशाळा का राबवल्या जातात, याचे महत्त्व काय? याविषयी त्यांनी सविस्तर मार्गदर्शन केले. प्रा. खोमणे यांनी 'करिअर करताना अशा पद्धतीच्या कोर्सचा भविष्यात कसा उपयोग होतो यावर विचार प्रकट केले. कार्यशाळेचे ट्रेनर हिमांशू कुमार यांनी सदरचे सहा दिवसीय प्रशिक्षण हे कशा पद्धतीचे असेल याविषयी माहिती दिली. प्रशिक्षणाच्या पहिल्या दिवशी ऑटोमेशन, कंट्रोलर व पीएलसी विषयी माहिती दिली तसेच लँडर डायग्राम, बेसिक प्रोग्रॅमिंग ट्रीक टाईम बेस्ड उदाहरणे, कोडसेस सॉफ्टवेअर मधील प्रोग्रॅमचा सराव करून घेतला. प्रशिक्षणाच्या दुसऱ्या दिवशी पल्स इन्स्ट्रक्शन पल्स व काउंटरवरील उदाहरणे, प्रोग्रॅमिंग इन जीएक्स डेव्हलपर्स, ऑनलाइन एडिट प्रोजेक्टर डेव्हलपमेंट याविषयी अधिक माहिती दिली. तिसऱ्या दिवशी 'इंट्रोडक्शन टू डिजिटल इनपुट/आउटपुट वायरिंग कन्सेप्ट, पीएलसी हार्डवेअर व सॉफ्टवेअर, कम्युनिकेशन, प्रोग्रॅम अपलोड व डाउनलोड याविषयी सांगितले. चौथ्या दिवशी इंट्रोडक्शन टू ह्युमन मशिन इंटरफेस स्क्रीन डेव्हलपमेंट, टॅग क्रिएशन, प्रोजेक्ट डेव्हलपमेंट याविषयी माहिती सांगितली. पाचव्या दिवशी 'एसीड्राईव्ह, स्पीड डायरेक्शन, अनॅलॉग सिस्टीमचे इंट्रोडक्शन, याविषयी सांगितले. सहाव्या दिवशी 'एक्सलरेशन अँड डी-एक्सेलरेशन टाईम कंट्रोल ऑफ इंडक्शन मोटर, वूईथ पी एल सी, ब्लॉक डायग्राम ऑफ एडीसी अँड डीएसी एप्लीकेशन, रियल टाइम एप्लीकेशन, एस सी ए डी ए मॉनिटरिंग अँड कंट्रोल' याविषयी उत्कृष्ट मार्गदर्शन केले. अखेर या कार्यशाळेमध्ये उपस्थित झालेल्या प्रशिक्षणार्थ्यांना पाहुण्यांचे हस्ते प्रमाणपत्र देऊन कोर्सची सांगता करण्यात आली. यावेळी प्रा. डी.डी. डफळे, प्रा. व्ही.ए.सावंत यांच्यासह इलेक्ट्रिकल इंजिनिअरिंग विभागातील प्राध्यापक वर्ग उपस्थित होते.



पंढरपूर : स्वेरीत 'अॅडव्हान्सड इंडस्ट्रियल ऑटोमेशन अँड कंट्रोल' या कार्यशाळेचे उदघाटन करताना ट्रेनर हिमांशु कुमार सोबत डावीकडून विद्यार्थिनी, डॉ. एम. पी. ठाकरे, ट्रेनर हिमांशु कुमार, प्रा. डी.डी. डफळे, विद्यार्थी व विद्यार्थ्यांचे प्रकल्प पाहताना ट्रेनर हिमांशु कुमार.

## विवाहितेची गळफास घेऊन आत्महत्या



■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**सांगोला :** अज्ञात कारणावरून विवाहित महिलेने राहत्या घरी पत्र्याच्या लोखंडी अँगलला साडीने गळफास घेऊन आत्महत्या केली. ही घटना रविवार, दुपारी २ च्या सुमारास मिरज रोड, सांगोला येथे घडली. लक्ष्मी गणेश चोथे (२२, रा. मिरज रोड, सांगोला) असे मृत विवाहित महिलेचे नाव आहे. याबाबत, सांगोला ग्रामीण रुग्णालयाचे वैद्यकीय अधिकारी डॉ. अमोल खुरे यांनी खबर दिली असून पोलिसांनी, अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे. सांगोला-मिरज रोड येथील गणेश चोथे हा मोलमजुरीच्या कामासाठी घराबाहेर गेला होता.

### » Selected

## आरपीएफकडून 1100 मुलांची सुटका

**सोलापूर :** मध्य रेल्वेच्या पाचही विभागतील आरपीएफ पोलिसांनी 'ऑपरेशन नन्हे फरिश्ते'अंतर्गत जानेवारी ते नोव्हेंबर या 11 महिन्यांत एक हजार 99 मुलांची सुटका केली. रेल्वे सुरक्षा दलाकडे रेल्वे मालमत्ता, प्रवासी क्षेत्र व प्रवाशांच्या सुरक्षेची जाबाबदारी आहे. या शिवाय 'ऑपरेशन नन्हे फरिश्ते' अंतर्गत मुलांना वाचवण्याची जबाबदारीही ते पार पाडतात. मध्य रेल्वेच्या मुंबई, सोलापूर, पुणे, भुसावळ आणि नागपूर रेल्वे सुरक्षा दलाने (आरपीएफ) शासकीय रेल्वे पोलिस आणि इतर फ्रंटलाईन रेल्वे कर्मचारी यांच्या समन्वयाने 'ऑपरेशन नन्हे फरिश्ते'अंतर्गत गेल्या 11 महिन्यांत रेल्वेस्थान, प्लॅटफॉर्म, रेल्वे बोगी या ठिकाणांतील एक हजार 99 मुलांची सुटका केली आहे. यात 740 मुले आणि 359 मुलींचा समावेश आहे. या सर्व मुलांना बोलते करून त्यांच्या पालकांचा चाईल्डलाईन सारख्या स्वयंसेवी संस्थांच्या मदतीने ही भरकटलेली मुले गुन्हेगारीकडे वळण्याआधीच पालकांचा शोध घेऊन या मुलांचे पालकांशी पुनर्मिलन घडवण्यात येते. नोव्हेंबरमध्ये सुटका करण्यात आलेल्या मुलांची संख्या 124 होती. ज्यामध्ये 78 मुले आणि 46 मुलींचा समावेश आहे. त्या तुलनेत जानेवारी ते नोव्हेंबर 2023 या कालावधीत सुटका/पुनर्मिलन करण्यात आलेल्या मुलांची संख्या एक हजार 53 जणांचा समावेश आहे. यात 741 मुले आणि 312 मुलींचा समावेश आहे.

## मका पिकाला दर मिळत नसल्याने शेतकरी हवालदिल



**सोलापूर :** पावसातून वाचलेल्या मका पिकाला चांगला भाव मिळत नसल्यामुळे शेतकऱ्यांची नाराजी आणखी वाढली आहे. मक्याचे दर वाढण्याचे नाव घेत नाहीत. त्यामुळे मका उत्पादक शेतकऱ्यांमध्ये संतापाची लाट निर्माण होत आहे. जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या मक्याला गेल्या दोन महिन्यांपासून चांगला भाव मिळत नाही. मात्र, लागवड खर्चात वाढ होत आहे. तरीही दरात मोठी तफावत पाहायला मिळत आहे. शासनाने मका खरेदी केंद्र चालू करावे, अशी मागणी शेतकरीवर्गातून होत आहे.

## संभाजी आरमारच्या मंद्रूप शाखेचा शुभारंभ



■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**सोलापूर :** संभाजी आरमार या सामाजिक संघटनेच्या मंद्रूप ता. दक्षिण सोलापूर येथील नूतन शाखेचा शुभारंभ संघटनेचे संस्थापक अध्यक्ष श्रीकांत डांगे यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी संघटनेचे कार्याध्यक्ष शिवाजी वाघमोडे यांच्यासह अन्य पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. यावेळी श्रीकांत डांगे म्हणाले नूतन शाखेच्या पदाधिकाऱ्यांनी लोकांच्या गरजेला धावून जावे. त्यांना आवश्यक ती मदत करावी. गरज पडल्यास संभाजी आरमार संघटनेचा प्रत्येक कार्यकर्ता तुमच्या पाठीशी खंबीरपणे उभा राहील अशी ग्वाही दिली.

## सत्कार...

पंढरी संचार छायाचित्र सेवा



पंढरपूर : माढा विधानसभा मतदारसंघाचे नूतन आमदार अभिजीत आबा पाटील यांनी आज महाराष्ट्राच्या सर्वोच्च अशा विधानभवनामध्ये शपथविधी घेतल्यानंतर पंढरपूरच्या विठ्ठलाच्या तुळशीचा हार घालून विधानभवनाच्या प्रांगणामध्ये सत्कार करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. यावेळी विठ्ठल सहकारी साखर कारखान्याचे संचालक उमेश काका मोरे, गणेश दादा ननवरे व माढा विधानसभा राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष सुनील भोसले आदी उपस्थित होते.

## तालुक्यात आधुनिक कुस्ती केंद्राची गरज



**सांगोला :** कुस्ती हा पारंपरिक खेळ आहे. या खेळाची जपणूक करणे आज काळाची गरज बनली आहे. सांगोला तालुक्यात कुस्तीची आवड असणाऱ्या पैलवानांची संख्या अधिक असली तरी आधुनिक कुस्ती केंद्र नाहीत. सध्या कुस्तीमध्ये विविध प्रकार आले असल्यामुळे या खेळाची जपणूक करण्यासाठी 'आधुनिक कुस्ती केंद्र' निर्माण होणे गरजेचे आहे. सध्या ग्रामीण भागामध्ये असे कुस्ती प्रकार खेळण्यासाठी सुविधा नसल्यामुळे पैलवान मागे पडत असल्याचे चित्र दिसत आहे.

## आ.गोपीचंद पडळकर व आ. सदाभाऊ खोत यांची तोफ मारकडवाडी गावात कडाडणार

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**माळशिरस :** महाराष्ट्रातील महाविकास आघाडीच्या नेत्यांना सळो की पळो करून सोडणारी धनाजी संताजी ची जोडी माळशिरस तालुक्यातील मारकडवाडी ग्रामस्थांच्या मंगळवार दि. 10/12/2024 रोजी सकाळी 10 वाजता भेटीला येऊन ईव्हीएम मशीनबद्दल गैरसमज असणाऱ्या महाविकास आघाडीच्या नेत्यांचा पोलखोल जत विधानसभा मतदार संघाचे नवनिर्वाचित आमदार गोपीचंद पडळकर व विधान परिषदेचे आमदार सदाभाऊ खोत यांची तोफ मारकडवाडी गावात कडाडणार आहे.





महायुतीचे अधिकृत उमेदवार भारतीय जनता युवा मोर्चाचे राष्ट्रीय उपाध्यक्ष व माळशिरस विधानसभेचे लोकप्रिय दमदार माजी आमदार रामभाऊ सातपुते यांनी मारकरवाडी गावचे ग्रामदैवत श्री क्षेत्र वश्या मारुती मंदिर परिसर सुशोभित करून पर्यटन स्थळ बनलेले आहे. मारकडवाडी गावातील अनेक प्रलंबित विकासकामे केलेली असल्याने भाजपचे उमेदवार रामभाऊ सातपुते यांना मतदारांनी मतदान केलेले आहे. विशेष करून लाडक्या बहिणींनी लाडक्या भावाला मतदान करून भविष्यामध्ये असेच काम करावे, असा एक प्रकारे आशीर्वाद दिलेला आहे. तालुक्यातील व मारकडवाडी गावातील मताधिक्य घटल्याने महाविकास आघाडीचे नेते इव्हीएम घोटाळा आहे, असा कांगावा करून मारकडवाडी गावातील नागरिकांना काही ग्रामस्थांना हाताशी धरून धुडगूस सुरू आहे. देशाचे नेते शरदचंद्रजी पवार यांच्यासह महाराष्ट्राच्या राजकारणातील व सेवानिवृत्त अधिकारी यांची मांदियाळी सुरू झालेली आहे. राजकारणात मतदारांनी नाकारलेले आहे, परंतु ईव्हीएम मशीन घोटाळा आहे असा सूर लावलेला आहे. महायुतीचे लढवय्या शिलेदार आमदार गोपीचंद पडळकर व आमदार सदाभाऊ खोत मारकडवाडी गावातील ग्रामस्थांना संवाद साधणार आहेत .

## गुरुकुलमध्ये विद्यार्थ्यांनी साकारली आकाशगंगा



■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**सोलापूर :** गुरुकुल पब्लिक स्कूलमध्ये विज्ञान प्रदर्शन झाले. प्रमुख पाहुणे म्हणून केंद्रप्रमुख राजकुमार खाडे होते. यश कल्याणी सेवाभावी संस्थेचे गणेश करे पाटील, डॉ. विशाल शेटे यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. सार्थक सूर्यवंशी, अथर्व बरिदे, मेघराज शिंदे, शर्वरी सपकाळ या विद्यार्थ्यांचा शाळेतील प्रा. शिंदे यांच्याकडून विशेष सत्कार करण्यात आला. शाळेत विद्यार्थ्यांनी 'आकाशगंगा, जिवंत देखावा' सादर केला. विद्यार्थ्यांनी बोलणारा रोबोटही बनवला होता. त्याने सर्वांचे लक्ष वेधले.

## कुत्र्याला मारल्याचा योग्य तो पुरावा द्या



**सांगोला :** अक्कलकोटमध्ये २९ नोव्हेंबर रोजी २२ तासांत १२ भटक्या कुत्र्यांचा मृत्यू झाला. या कुत्र्यांना मारल्याचा पुरावा देणाऱ्यास पीएएल ॲनिमल फाउंडेशन संघटनेकडून २५ हजार रुपये बक्षीस म्हणून देण्यात येणार आहेत. आशितोष चंद्रकांत कटारे (वय ३३) यांनी याबाबत फिर्याद दिली आहे. २९ नोव्हेंबर रोजी रात्री ११ ते ३० नोव्हेंबर रोजी रात्री ९ वाजेपर्यंत शहरातील १० ते १२ कुत्रे अज्ञात व्यक्तीने खाद्यपदार्थ देऊन मारले. एका कुत्र्याचा मृतदेह कामगार चौकात होता.

### श्रीशिवप्रतिष्ठान हिंदुस्थान पंढरपूरच्या वतीने

## मातृ-पितृ इच्छापूर्ती दिन अर्थात शिवप्रतापदिन उत्साहात पार पडला

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**पंढरपूर :** मार्गशीर्ष शुद्ध षष्ठी सहित सप्तमी या दिवशी प्रतापगडावर १० नोव्हेंबर, १६५९ या दिवशी पुण्यश्लोक छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वराज्याचा शत्रू असलेल्या अफझुलखानाचा कोथळा काढून त्याचा पुरता बीमोड केला. हे कार्य त्यांनी आपल्या मातोश्रींच्या म्हणजे पुण्यश्लोक आऊसाहेबांच्या आज्ञेनंच केलं. 'शहाजी राजे व बंधु संभाजी राजे याचे उसने फेडा' असे आऊसाहेब जिजाऊ माँसाहेबांनी छत्रपती शिवाजी महाराजांना सांगितले होते. प्रतापगढला येताना अफझुलखानाने अवघ्या महाराष्ट्राचे आराध्य दैवत असलेल्या आपल्या पंढरीशाला उपद्रव पोहोचवण्याचा प्रयत्न केला, मंदिरात गायी कापल्या, माता-भगिनींना उपद्रव केला, त्याआधी श्रीतुळजाभवानीच्या मूर्तीचाही विध्वंस केला होताच. अशा क्रुरकर्म्या अफझुलखानाचा श्रीशिवप्रभुंनी केलेला वध तो दिवस म्हणजेच आई-वडिलांच्या आज्ञेची परिपूर्ती मातृ-पितृ इच्छापूर्ती दिन अर्थात शिवप्रताप दिन. हा दिवस शिवप्रतिष्ठान हिंदुस्थान पंढरपूरच्या वतीने साजरा करण्यात आला. त्यानिमित्त पंढरपुरातून सायंकाळी छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे शिवछत्रपतींचे पूजन करण्यात आले. त्यानंतर संपूर्ण प्रदक्षिणा मार्गावरून गीते म्हणत, घोषणा देत शिवप्रताप दौड काढण्यात आली. दौड झाल्यावर छत्रपती शिवाजी महाराज चौकात शिवसूर्यहृदय स्तोत्र या छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवनावरील श्लोकांचे सामूहिक पठण झाले. त्यानंतर धारकरी तुकारामदादा चिंचणीकर यांचे मार्गदर्शन झाले. ध्येयमंत्र-प्रेरणामंत्र घेण्यात आला. शिवछत्रपतींची आरती करण्यात आली. फटाक्यांची आतिषबाजी मोठ्या प्रमाणात केली गेली. जिलेबीचा प्रसाद वाटप करण्यात आला आणि कार्यक्रमाची सांगता झाली.



या वेळी वारकरी संप्रदाय पाईक संघाचे रामकृष्ण वीर महाराज, जनता बँकेचे संचालक साळे सर, त्याच बरोबर श्रीशिवप्रतिष्ठान हिंदुस्थान पंढरपूरातील धारकरी, वारकरी, शिवभक्त, हिंदुत्ववादी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## धोत्री येथील आगीच्या घटनेत लाखो रुपयांचे नुकसान

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**सोलापूर :** दक्षिण सोलापूर तालुक्यातील धोत्री येथील एका कपड्याच्या दुकानाला आग लागून लाखो रुपयांचे नुकसान झाल्याची घटना गुरुवारी रात्री घडली आहे. या घटनेत राणी व्हटकर यांच्या कापड दुकानाला आग लागून सर्व कपडे, साड्या जळून खाक झाल्या. यासह त्यांनी दुकानात ठेवलेली शासकीय कागदपत्रे तसेच ड्रॉवर मधील रोख रक्कम देखील जळून गेली आहे. या आगेमुळे साधारणपणे आठ ते दहा लाख रुपयांचे नुकसान झाल्याचा अंदाज व्यक्त होत आहे. या घटनेची नोंद वळसंग पोलीस ठाण्यात झाली आहे. ग्रामस्थांनी आग विझवण्याचा प्रयत्न केलेला प्रयत्न अयशस्वी ठरला.

## चुकीचे आंदोलन करणाऱ्यांवर गुन्हे दाखल करू




**सोलापूर :** सोलापूर जिल्ह्यातील मारकडवाडी हे गाव ईव्हीएम सोडून मतपत्रिकेद्वारे मतदान घ्यावे या मागणीसाठी सध्या देशभरात चर्चेत आले आहे. या पार्श्वभूमीवर सोलापूर जिल्ह्याचे जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी रविवारी रात्री अचानक पत्रकार परिषद घेऊन प्रशासनाची भूमिका मांडली. निवडणूक आयोगाव्यतिरिक्त दुसऱ्या कोणालाही निवडणुकीची प्रक्रिया राबवता येणार नाही. त्यामुळे आम्ही मारकडवाडीतील मतदान प्रक्रिया थांबवली. ईव्हीएम विरुद्ध चुकीच्या पद्धतीने आंदोलन करणाऱ्यांवर आम्ही गुन्हे दाखल करत आहोत अशी माहिती त्यांनी यावेळी दिली.

# रस्ते अपघात, गंभीर समस्या

यंदाच्या वर्षांत देशात रस्ते अपघातांत १.६८ लाख बळी गेले आहेत. सरकार रस्ते अपघात कमी करण्यासाठी सतत प्रयत्न करत आहे, पण लोकांना कायद्याचा आदर आणि धाकही राहिलेला नाही अशी खंत केंद्रीय परिवहनमंत्री नितीन गडकरी यांनी गुरुवारी संसदेत व्यक्त केली. वाढत्या अपघातांविषयी चिंता व्यक्त करताना गडकरी म्हणाले, सरकारच्या अथक प्रयत्नांनंतरही देशात वर्षभरात रस्ते अपघातांत १.६८ लाख लोकांचा मृत्यू झाला. मृतांमध्ये ६० टक्के युवक आहेत. रस्ते अपघात कमी करण्यासाठी सर्वांचे सहकार्य महत्त्वाचे असते. पण सर्वांत मोठी समस्या म्हणजे लोक कायद्याचा आदर करत नाहीत शिवाय त्यांना धाकही उरला नाही. लोक रेड सिग्नलचे पालन करत नाहीत, हेल्मेट घालत नाहीत. फक्त हेल्मेट न घातल्याने ३० हजार जणांचा अपघाती मृत्यू झाला आहे. परदेशात जाऊन आलेले लोक तेथील वाहतूक व्यवस्थेचे कौतुक करतात परंतु देशात स्वतःच वाहतूक नियमावली पाळत नाहीत ही वस्तुस्थिती आहे. रस्ते अपघात कमी करण्यासाठी सरकार प्रयत्नशील असते परंतु लोकप्रतिनिधी, प्रसारमाध्यमे आणि समाजाच्या सहकार्याशिवाय नियमांची कठोर अंमलबजावणी करणे शक्य होत नाही. दंडाची रक्कम वाढवली तरी लोक नियमांचे पालन करत नाहीत. सिग्नल तोडण्याची प्रवृत्ती आपल्या अंगात भिनली आहे. रेड सिग्नल लागल्यानंतर दोन मिनिटे थांबायलाही आपल्याकडे वेळ नाही. वाहन चालवताना कट मारणे हा आपला आवडता छंद आहे. एखाद्याने कट मारला की लगेच दुसऱ्याला राग येतो. समोरच्या व्यक्तीने लगेच चूक मान्य केली तर ठीक अन्यथा प्रकरण हाणामारीवर येते. अशा घटना नित्याच्या झाल्या आहेत. त्यामुळे वाहन चालवताना काळजी घेण्याची अधिक गरज आहे. रोड रेज या शब्दाचा वापर साधारणपणे वाहनचालकांच्या हिंसक, धोकादायक आणि आक्रमक वर्तनाशी संबंधित आहे. यात असभ्य इशारे करणे, शिवीगाळ करणे, धमकी देणे, भीती दाखवण्याच्या हेतूने वाहन चालविणे आदींचा समावेश आहे. रोड रेजच्या कारणामुळे संघर्ष होण्याची शक्यता असते आणि प्रसंगी हाणामारीही होऊ शकते. गत काही वर्षांत देशात रोड रेजच्या घटना वाढल्या आहेत. केंद्रीय रस्ते परिवहन मंत्री नितीन गडकरी यांनी मार्च २०२२ मध्ये या संदर्भात काही आकडेवारी सादर केली होती. त्यानुसार २०१९ मध्ये देशात रोड रेजची आणि निष्काळजीपणे गाडी चालविण्याची सुमारे दीड लाखाहून अधिक प्रकरणे समोर आली होती. २०२० मध्ये त्यात वाढ होत ही संख्या १ लाख ८३ हजारांवर पोहोचली. २०२१ मध्ये ही संख्या २ लाख १५ हजारांवर गेली. अनेकदा वाहतूक सुरक्षा कर्मचारीदेखील 'रोड रेज'ला बळी पडले आहेत. गतवर्षी मुंबईत एका वाहनचालकाने रेड सिग्नल असतानाही गाडी थांबवली नाही. त्याला वाहतूक शाखेच्या पोलिसांनी अडवले असता त्याने गाडी थांबवण्याऐवजी वेग वाढवला. गाडीसमोर असलेले पोलिस गाडीच्या बॉनेटवर पडले. तरीही चालकाने २० किलोमीटरपर्यंत गाडी दामटली. काही जण वाहतूक कोंडीतही हॉर्न वाजवत राहतात, काही जण चुकीच्या दिशेने ओव्हरटेक करतात तर काहीजण नो एन्ट्रीतून गाडी नेतात. अशा घटनांतून वाद निर्माण होतात. मुळात आता वाहनचालकांत सहनशीलताच राहिलेली नाही. वाहतूक नियमांचे पालन केले तर अशा घटना घडणार नाहीत. २०१८ ते २०२२ या काळात देशात ७ लाख ७७ हजार ४२३ लोकांचा रस्ते अपघातात मृत्यू झाल्याची माहिती केंद्रीय मंत्री गडकरी यांनी दिली आहे. या लोकांचा मृत्यु कोणत्याही दंगलीत अथवा लढाईत्त झाला नाही तर रस्ते अपघातात झाला आहे. केंद्र सरकारने रस्ता सुरक्षा समिती नेमली आहे आणि ब्लॅक स्पॉटसाठी ४० हजार कोटी रुपये दिले आहेत, तरीही रस्ते अपघातांत वाढ झाली आहे. रस्ते निर्मितीसाठीचे अभियांत्रिकी ज्ञान, वाहनांचे तंत्रज्ञान, कायद्याची अंमलबजावणी आणि लोकजागृती हे घटक रस्त्यावर होणारे अपघात कमी करण्यासाठीचे प्रमुख घटक आहेत. परंतु कायदा पालनाकडे दुर्लक्ष ही मोठी सामाजिक समस्या असल्याचे गडकरी म्हणाले. बहुतांश अपघातांमागे वाहतूक नियमांचे पालन न करणे हे प्रमुख कारण आहे. छोट्या शहरातही हे प्रकर्षाने जाणवते. रेड सिग्नल असतानाही गाड्या दामटण्याची प्रवृत्ती चौका-चौकात आढळते. रस्ता अपघातात दुचाकीस्वारांचे प्रमाणही वाढले आहे. खराब रस्ते, विरुद्ध दिशेने प्रवास, अतिवेग, चुकीचे गतिरोधक, मद्यपान करून वाहन चालवणे या कारणांमुळेही अपघातांचे प्रमाण वाढले आहे. बहुतांश अपघातांत दुचाकीस्वाराने हेल्मेट न घातल्यामुळे डोक्याला मार लागून मृत्यू झाले आहेत. काही शहरांत दुचाकीवर मागे बसणाऱ्यालाही हेल्मेट सक्तीचे करण्यात आले आहे. परंतु त्याचे पालन होताना दिसत नाही. हेल्मेट घालण्याबाबत जनजागृतीही केली जात आहे. नोव्हेंबर महिन्यात सर्वसाधारणपणे उसाच्या गळीत हंगामाला सुरुवात होते, ऊस वाहतूक करणाऱ्या चालकांचा मनमानी कारभार अपघातांना निमंत्रण देणारा ठरतो. वाहनचालक वाहतुकीचे नियम धाब्यावर बसवून ऊस वाहतूक करताना दिसतात. संबंधित कारखाना प्रशासन, पोलिस खाते आणि परिवहन विभागाने याकडे लक्ष देण्याची गरज आहे. काही ठिकाणी प्रशासन वेगवेगळ्या योजनांसाठी खोदकाम करते, त्यामुळेही अपघातांचे प्रमाण वाढले आहे. रस्त्याचे खोदकाम झाल्यानंतर त्याची दुरुस्तीही काळजीपूर्वक केली पाहिजे. महामार्गावर सतत होणारे अपघात, त्यात नागरिकांचे बळी जात असल्याने निर्माण होत असलेली गंभीर परिस्थिती याकडे गांभीयनि लक्ष देण्याची वेळ आली आहे. रस्त्याच्या कडेला खोदकाम करण्याची परवानगी असताना अनेक ठिकाणी रस्त्याच्या मधोमध रस्ते खोदले जातात, खोदलेल्या रस्त्यांची माती रस्त्यावर पडून राहिल्याने वाहतुकीला अडथळा निर्माण होतो, त्यामुळेही छोटे-मोठे अपघात होतात. अपघात टाळण्यासाठी पालिका, महानगरपालिका यांनी दक्ष रहायला हवे तसेच नागरिकांनी, वाहनचालकांनी वाहतूक नियमांचे पालन करायलाच हवे. तरच या समस्येला आळा बसु शकेल.

> बांग्लादेशातील हिंदू मंदिरांवरील हल्ले ही बाब तेथील धर्मनिरपेक्ष सरकारच्या प्रतिमेस तडा देणारी आहे. प्रधानमंत्री महंमद युनूस यांनी अनेक वेळा अभिवचन दिले आहे की, अल्पसंख्यांकांच्या हक्कांचे ते रक्षण करतील. पण ते वचन त्यांनी खरोखर पाळले काय?

# हिंदू मंदिरांवरील हल्ल्याचे पडसाद

**प्रा. डॉ. वि. ल. धारूरकर**

एखाद्या देशातील सामाजिक वातावरण गढूळ होण्यामध्ये तेथील परकीय हस्तक्षेप, दहशतवादी संघटनांच्या हालचाली आणि परकीय हात असे अनेक घटक त्यामागे लपलेले असतात. बांग्लादेश सध्या याच कारणामुळे तणावातून जात आहे. १९७१ साली भारताच्या माजी पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधी यांनी मोठे आव्हान स्विकारले आणि पाकिस्तानच्या तावडीतून पूर्व पाकिस्तानची मुक्तता केली. कारण पाकिस्तान बंगाली बहुल असलेल्या पूर्व भागातील जनतेचे शोषण करीत असे. अन्याय, विषमता आणि दारिद्र्य ही संकटे जणू काही बांग्लादेशवासीयांच्या पाचवीलाच पूजलेली होती. बांग्लादेशचे शिल्पकार शेख मुजीबुर रहमान हे धर्मनिरपेक्षता, सर्वसमावेशक आणि सहिष्णु विचारांचे पुरस्कर्ते होते. अवामी लीग हा शेख मुजीबुर रहमान यांचा पक्ष. मुक्तीनंतर त्यांच्या विचारांचे स्वप्न साकार करण्याचा प्रयत्न या पक्षाने केला. त्यांच्या मृत्यूनंतर त्यांची कन्या शेख हसीना यांनी बांग्लादेशचा विकास वेग वाढविला, तेथील मानव निर्देशांकही सुधारला आणि वस्त्रोद्योग, कुटीर उद्योग, लघु उद्योग यामध्ये मोठी प्रगती केली. त्यांच्या प्रयत्नामुळे बांग्लादेशात महिलांचे अर्थकारणही सुधारले. आर्थिकदृष्ट्या बांग्लादेश आशिया खंडात वेगाने प्रगती करू लागला. परंतु या प्रगतीला दृष्ट लागली ती महासत्तांची. भारताच्या मार्गदर्शनाखाली बांग्लादेश चांगली प्रगतीची घोडदौड करीत आहे हे पाहून अमेरिका, चीन या महासत्तांनी बांग्लादेशातील काही गटांना हाताशी धरले. विशेषतः इस्लामी छात्र शिबीर नावाच्या गटाने थेट अफगाणिस्तानात आणि पाकिस्तानात जाऊन प्रशिक्षण घेतले आणि हे लोक बांग्लादेशात परतल्यानंतर जातीय व हिंसक कारवाया करू लागले. विशेषतः हसीना यांच्या तिसऱ्या कार्यकाळात विदेशी कुटील कारस्थानामुळे अशांतता पसरली. बांग्लादेशातील विद्यार्थ्यांचे आंदोलन आणि त्यानंतर शेख हसीना यांना सत्तेचा त्याग करावा लागला. त्यानंतर जणू बांग्लादेशातील मूलतत्त्ववादी व कट्टरपंथी गटाने चौकुर दहशतवादी हिंसाचारी धोरण अनुसरले. बांग्लादेशातील ढाका येथील ढाकेश्वरी मंदिरावर हल्ला झाला. तेव्हा स्वतः पंतप्रधान युनूस यांनी मंदिराला भेट दिली आणि संरक्षणाचे अभिवचन दिले होते. चितगाव या हिंदू बहुल नगरीत तीन मंदिरांवर झालेल्या हल्ल्याची कथा करुण आणि चिंताजनक आहे.

**चितगावमध्ये काय घडले?**

चट्टोग्राम उर्फ चितगावमधील हिंदू बहुल वस्तीमधील शांतनेश्वरी मातृ मंदिर, शोनी मंदिर आणि शांतनेश्वरी कालीबारी मंदिर या तीन मंदिरांना लक्ष्य का करण्यात आले? त्याचे कारण म्हणजे तेथील इस्कॉन मंदिरातील पूजारी चिन्मय कृष्ण दास यांना झालेली अटक व त्यानंतर त्यांच्यावर चालविण्यात आलेला देशद्रोहाचा खटला. त्यांना अजूनही जामीन मिळालेला नाही. हे प्रकरण २ जानेवारीपर्यंत पुढे ढकलण्यात आले आहे. कट्टरपंथीयांचे अल्पसंख्यांक मंदिरे आणि समुदायावरील हल्ले का थांबत नाहीत? याची चिंता तेथील सरकारला का वाटत नाही? असे अनेक प्रश्न यातून उभे राहतात. विशेषतः चट्टोग्राममधील तीन मंदिरावर झालेले हल्ले हा पूर्व नियोजित प्रकार असावा असे म्हटले जात आहे. या मंदिरावरील हे हल्ले काय दर्शवितात? जमात-ए-इस्लामी आणि बांग्लादेश नॅशनॅलिस्ट पार्टी (बीएनपी) च्या अतिरेकी गटांना पोलिस का आवरू शकले नाहीत? शेवटी जेव्हा परिस्थिती हाताबाहेर जात आहे असे दिसले तेव्हा लष्कराने हस्तक्षेप केला. तेव्हा थोडेफार चित्र बदलले. चट्टोग्राम या शहरात इस्कॉनच्यावतीने उभारलेली श्री श्री राधा गोविंद मंदिर ही एक भव्य वास्तू आहे. बांग्लादेशात इस्कॉन मंदिरांचे मोठे जाळे आहे. त्यांची मुख्य शहरातून ७५ मंदिरे आहेत. शिवाय त्यांचे २ लाख सदस्य आहेत. त्यांचे वाढत असलेले प्रस्थ व आकर्षण पाहून जमात-ए-इस्लामी आणि बीएनपी या संघटनांनी अस्वस्थ होऊन त्यांच्या विरोधात मोहीम सुरू केली. खरेतर, इस्कॉन मंदिरांचे कार्य हे सेवाभावी आहे. जनकल्याणास उत्तेजन देणारे आहे. मोफत आहार, उपचार व सेवा देणारे आहे. तेव्हा अशा या सेवाभावी संस्थेला त्रास देऊन या कट्टरपंथी संघटनांनी काय मिळविले? जगभर नाचक्की झाली आणि सरकारच्या धोरणाचे वस्त्रहरण झाले, त्याचे काय?

**अवामी लीगची योग्य भूमिकाः**

बांग्लादेश मुक्त झाला त्या दिवशी केलेल्या भाषणात शेख मुजीबुर रहमान म्हणाले होते, 'हमादेर इतिहास संघर्ष मा अचेन' आमचा इतिहास संघर्षाचा इतिहास आहे. त्यांचा संघर्ष अजूनही संपलेला नाही. शेख मुजीबुर रहमान आणि त्यांच्या कन्या शेख हसीना यांचा पक्ष असलेल्या अवामी लीग या संघटनेने मात्र या प्रश्नावर ठाम भूमिका घेतली आहे आणि त्यांनी अतिरेकी कारवायांचा निषेध केला. अवामी लीगने अल्पसंख्यांक हिंदूंची बाजू घेऊन आपल्या सोशल मिडिया प्लॅटफॉर्मवर असे मत व्यक्त केले की, अवामी लीग चितगावमध्ये दिवसाढवळ्या हिंदू मंदिरांवर झालेल्या हल्ल्याचा तीव्र निषेध करीत आहे. बांग्लादेशमध्ये हिंदूनी रहावे की नाही अशी परिस्थिती निर्माण केली जात आहे. अशाप्रकारे अवामी लीगने घेतलेली ठाम भूमिका निर्णायक आणि तेवढीच महत्त्वाची आहे. पुढील काळात निवडणुका घोषित होतील तेव्हा हिंदू समुदाय आवामी लीगच्या बाजूने उभा राहिल असे चित्र दिसत आहे. खरेतर, १९७१ नंतरचा सारा इतिहास पाहता, आवामी लीगने घेतलेली भूमिका सुसंगत, योग्य आणि स्वागतार्ह आहे. त्यांनी देशभर अल्पसंख्यांकांच्या रक्षणासाठी मोहिम आखावी, त्यांना मदत करावी आणि त्यांच्या सुरक्षेसाठी प्रयत्न करावेत. तसे केल्यास बांग्लादेशचे कॉस्मोपॉलिटिन स्वरूप कायम राहिल आणि तेथील धर्मनिरपेक्षतेला खरा अर्थ प्राप्त होऊ शकेल. आजतक वाहिनीच्या प्रज्ञा प्लॅटफॉर्मवर याबाबत ताजी माहिती उपलब्ध आहे. त्याचा धांडोळा घेतल्यास, या सर्व घटनांमागील शह-प्रतिशह आणि काटशहाचे राजकारण लक्षात येते.

**भारताचा योग्य पवित्राः**

भारताचे परराष्ट्र मंत्री एस. जयशंकर यांनी या प्रश्नावर खंबीर आणि ठोस भूमिका घेतली आहे. त्यांनी बांग्लादेशमधील अल्पसंख्यांकांवर हल्ले करण्याच्या प्रकाराचा तीव्र निषेध केला आहे आणि अल्पसंख्यांकांच्या हिताचे व तेथील त्यांच्या धार्मिक स्थळांचे रक्षण करणे ही सरकारची जबाबदारी आहे. सरकारने याबाबतीत योग्य ती काळजी घेतली पाहिजे. अल्पसंख्यांकांना संरक्षण दिले पाहिजे आणि तेथील मंदिरांचेही रक्षण केले पाहिजे असे ठामपणे बजावले आहे. त्यांच्या या भूमिकेचे खरोखरच जगभरात स्वागत होत आहे. लंडनमधील संसदेत हुजूर पक्षाच्या खासदार प्रिती पटेल आणि मजूर पक्षाचे खासदार बॅरी गार्डिनर या दोघांनी बांग्लादेशातील अल्पसंख्यांक हिंदूच्या मंदिरावरील हल्ल्याचा प्रश्न संसदेत मांडला. त्यांनी तेथे केलेल्या भाषणात बांग्लादेशातील मंदिरावरील हल्ल्यांचा निषेध करून अल्पसंख्यांक हिंदूंचे रक्षण करण्यासाठी संयुक्त राष्ट्रसंघाने कारवाई करावी आणि लंडननेसुद्धा त्यामध्ये हस्तक्षेप करावा अशी भूमिका घेतली आहे. जगभरातील अनेक लोकशाही देशातून होत असलेली ही मागणी बांग्लादेशच्या व्यवस्थेचे वस्त्रहरण करणारी आहे. खुद्द अमेरिकेतही अनेक लोकशाही गटांनी या घटनेचा निषेध केला असून बांग्लादेशातील अल्पसंख्यांकांच्या रक्षणासाठी ठाम भूमिका घेण्याचे आवाहन केले आहे.

**समारोपः**

या सर्व चर्चेवरून हे स्पष्ट होते की, बांग्लादेशातील हिंदू मंदिरावरील हल्ले ही बाब तेथील धर्मनिरपेक्ष सरकारच्या प्रतिमेस अनुसरून योग्य वाटत नाही. प्रधानमंत्री महंमद युनूस यांनी अनेक वेळा अभिवचन दिले आहे की, अल्पसंख्यांकांच्या हक्कांचे ते रक्षण करतील. त्यांनी अशीही मल्लिनाथी केली की, भारतातील प्रसार माध्यमे या विध्वंसाचा अतिशयोक्त प्रचार करीत आहेत. खरेतर, सत्य आणि वास्तव परिस्थिती याचे भान ठेवून त्यांनी असे विधान करणे उचित ठरत नाही. त्यांच्याकडे सूत्रे आल्यापासून बांग्लादेशातील प्रशासन कोलमडले आहे. पूर्वीच्या शेख हसीना सरकारला नावे ठेवणे सोपे, पण त्यांनी अत्यंत प्रतिकूल परिस्थितीतसुद्धा देशाच्या प्रगतीला गती दिली आणि शांतता व सुव्यवस्था ठेवली होती ही गोष्ट लक्षात घेतली पाहिजे. गेल्या १५ वर्षात शेवटचे काही महिने वगळता परिस्थिती आटोक्यात होती, लोकजीवनही शांत होते. त्यामुळे प्रगतीचा टप्पा गाठता आला आणि जीडीपीसुद्धा ७ टक्क्यापर्यंत पोहोचला. हे त्यांचे श्रेय मान्य करावे लागेल. पुढे जेव्हा परिस्थिती सुरळीत होईल, निवडणुका घोषित होतील, तेव्हा खलिदा झिया यांचा बीएनपी पक्ष आणि शेख हसीना यांचा आवामी लीग पक्ष यामध्ये चुरशीची लढत होईल. तेव्हा अल्पसंख्यांक निश्चितच आवामी लीगच्या बाजूनी उभे राहतील. पुढे चालून बांग्लादेशचे राजकारण कोणती गती घेईल हे आज सांगता येत नाही. अस्थिरता, गोंधळ व अराजकतेची परिस्थिती युनूस यांच्या हंगामी कार्यकाळात दिसत आहे. या पार्श्वभूमीवर बांग्लादेशातील अल्पसंख्यांक हिंदू मंदिरांवरील हल्ल्यांचा अन्वयार्थ हाच आहे की, लोकशाही व्यवस्थेत सर्वसमावेशक आणि सहिष्णु धोरण आखून सरकार चालले पाहिजे, राजकीय पक्षानेसुद्धा आपल्या स्वार्थासाठी भावनात्मक आणि भडकविणाऱ्या कृती करण्याच्या मागे लागू नये. त्यामुळे आता पुढील काळ आवामी लीगच्या प्रसारासाठी व विस्तारासाठी अनुकूल होत आहे. कट्टरपंथी जेवढ्या चुका करतील तेवढा त्याचा फायदा आवामी लीगसारख्या उदार समुदायाला होईल ही गोष्ट सहज शक्य आहे. इंग्लंड, अमेरिका आणि भारतामध्ये उदार मतवाद्यांनी बांग्लादेशात हस्तक्षेप करून तेथे शांतता प्रस्थापित करावी. परिस्थिती हाताबाहेर गेल्यास संयुक्त राष्ट्रसंघाला तेथे शांतीसेना पाठवावी लागेल. बांग्लादेशातील आजचे अशांत व हिंसक चित्र कधी व कसे बदलेल असा प्रश्न निरीक्षक विचारत आहेत. पुढे चालून निवडणुका घोषित झाल्यानंतर लोकशाहीकरणाच्या प्रक्रियेला सुरुवात होईल तेव्हा सामाजिक शांततेची गरज आहे. सध्याच्या हंगामी सरकारने प्रथम शांतता व सुव्यवस्थत्त निर्माण करावी, मंदिरावरील हल्ले थांबवावेत. तसे झाले तर महंमद युनूस यांनी लोकशाहीच्या रस्त्यातील काही काटे तरी कमी केले एवढे श्रेय त्यांना इतिहास देऊ शकेल. ते तरी प्रा. युनूस शक्य करून दाखवतील काय?

## गुड मॉर्निंग
दिवसाची अर्थपूर्ण सुरुवात

**पंचांग** मंगळवार, दिनांक १० डिसेंबर २०२४, मार्गशीर्ष शु. १०, उ.भाद्रपदा, श्री शके १९४६, विक्रम संवत् २०८१, अनलनाम संवत्सर, दक्षिणायन, हेमंत ऋतू नक्षत्र : उ.भाद्रपदा, योग : व्यतिपात, करण : तैतिल. सूर्योदय : स.०६.४२ सूर्यास्त : सायं.०५.३१ वा. **राहू काळ : दुपारी : ३:०० ते ४:३०**

**दिनविशेष**



▶१८७०: आंतरराष्ट्रीय किर्तीचे भारतीय इतिहासकार जदुनाथ सरकार यांचा जन्म. ▶१८८०: प्राच्यविद्यापंडित श्रीपाद कृष्ण बेलवलकर यांचा जन्म. ▶१८९६: डायनामाईटच्या शोधातून अमाप संपत्ती मिळविणाऱ्या आल्फ्रेड नोबेलचा मृत्यू. दरवर्षी त्यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ या दिवशी नोबेल पुरस्कारांचे वितरण केले जाते. ▶१९४८: मानवी हक्क दिन. ▶१९५५: आचार्य शंकर दत्तात्रय जावडेकर यांचे निधन. ▶१९६४: सूचिकार शंकर गणेश दाते यांचे निधन. ▶१९८९: दलाई लामा यांना शांततेचे नोबेल पारितोषिक प्रदान. ▶१९९८: अर्थशास्त्रातील अल्लेखनीय कामगिरीबद्दल दिला जाणारा नोबेल पुरस्कार प्रसिद्ध अर्थतज्ञ प्रा. अमर्त्य सेन यांना प्रदान. ▶२००१: चित्रपटसृष्टीतील ज्येष्ठ अभिनेते दादामुनी उर्फ अशोककुमार यांचे निधन. ▶२००३: संगीतकार श्रीकांत ठाकरे यांचे निधन.

**राशीभविष्य** ▲**मेष** : मनपसंत व्यक्तीचा सहवास. ▲**वृषभ** : सरकारी कामात यश. ▲**मिथुन** : अपेक्षित पत्रे हाती येतील. ▲**कर्क** : नवीन स्थळांना भेटी द्याल. ▲ **सिंह** : मनाविरूद्ध वागवे लागेल. ▲**कन्या** : कंटाळवाणा दिवस. ▲ **तुळ** : करमणुकीत वेळ घालवाल. ▲**वृश्चिक** : विरंगुळा लाभेल. ▲ **धनु** : अतिविश्वास टाळा. ▲**मकर** : दगदगीचा दिवस. ▲**कुंभ** : चांगली बातमी मिळेल. ▲**मीन** : प्रियजनांशी गाठभेट

**चिंतन** स्त्रियांचे शिक्षण आणि राष्ट्रिय विकास यांचा जवळचा संबंध आहे. कुटुंबातील स्त्री सुशिक्षित असली तर त्या कुटुंबाचा उद्धार तर होतोच, पण पुढील पिढीचे भिविष्य उजळून निघते.

– धोंडो केशव कर्वे

**व्यक्तीविशेष**

### जदुनाथ सरकार

जदुनाथ सरकार विसाव्या शतकातील आघाडीचे भारतीय इतिहास संशोधक होते. बंगालमधील करचमारिया या गावात त्यांचा १० डिसेंबर १८७० रोजी जन्म झाला. त्यांचे वडिल त्या गावचे जमीनदार होते. करचमारिया सध्या बांगलादेशात आहे. कोलकता येथील प्रेसिडन्सी कॉलेजमधून त्यांनी इंग्रजी आणि इतिहास या दोन्ही विषयांत बी. ए. ची. पदवी घेतली. नंतर पटणा कॉलेजमध्ये प्रथम इंग्रजीचे आणि नंतर इतिहासाचे प्राध्यापक म्हणून त्यांनी नोकरी केली. औरंगजेब हे त्यांचे पुस्तक १९०१ मध्ये प्रकाशित झाले. पुढे त्यांनी हिस्टरी ऑफ औरंगजेब हे पुस्तक पाच खंडात लिहिले. हे पुस्तक पूर्ण होण्यासाठी त्यांना पंचविस वर्षे लागली. हे पुस्तक १९२४ मध्ये प्रकाशित झाले नंतर फॉल ऑफ मुघल एम्पायर हे पुस्तक लिहायलाही त्यांना आणखी पंचवीस वर्षे लागली. हे पुस्तक चार खंडात १९५० रोजी प्रकाशित झाले. सरकार यांनी 'चैतन्य : हिज पिलग्रीमेजेस अँड टीचिंग्ज' आणि 'शिवाजी अँड हीज टाईम्स' ही आणखीन दोन पुस्तके लिहिली आहेत. कोलकाता विद्यापीठाचे कुलगुरु म्हणून त्यांनी १९२६ ते २८ या कालखंडातन काम केले. ते बंगलच्या विधिमंडळावरही होते. १९२९ मध्ये ब्रिटिश सरकारने त्यांना सर ही पदवी प्रदान केली. १५ मे १९५८ रोजी त्यांचे निधन झाले.

**बोधकथा**

### सत्याचा विजय

शिक्षकांना मोठे आश्चर्य वाटले. सर्व गणितं बरोबर येऊनही गोपाळ का रडत आहे? त्यांनी त्याला रडण्याचे कारण विचारले. तेव्हा गोपाळ नम्रपणे म्हणाला, 'गुरुजी, तुम्हाला वाटत असेल की, ही सर्व गणितं मी माझ्या मनाने सोडवली आहेत. पण हे खरं नाही. ही उदाहरणे सोडवण्यासाठी मी माझ्या एका मित्राची मदत घेतली होती. त्यामुळे मी या बक्षिसासाठी पात्र नाही. उलट मी त्याच्या नावाने शाबासकी मिळवली म्हणून शिक्षेस पात्र आहे.' त्याचे हे खरे उत्तर ऐकून शिक्षक खूप प्रसन्न झाले आणि ते म्हणाले, 'आता तर हे बक्षिस तुला घ्यावेच लागेल. पण हे गणित सोडवल्याबद्दल नाही तर तू सत्य बोललास त्यासाठी आहे.' (उत्तरार्ध)

**जिज्ञासा**

### प्लास्टिकचा शोध

लहान वयातच एका मुद्रणालयात तो खिळे जुळवण्याचे काम करत असे आणि फावल्या वेळात आपल्या आवडीचे वैज्ञानिक प्रयोग करत असे. मोठ्या रकमेचे बक्षिस मिळणार या आशेने जॉन कृत्रिम हस्तीदंत तयार करण्याचा प्रयत्न करू लागला. तो काम करत असताना खिळे लावल्यामुळे त्याच्या बोटास त्रास होत असे. यावर उपाय म्हणून जॉन त्यावर कोलोडीन नावाचे औषध लावत असे. हे औषध बोटांना लावले की त्याला बरे वाटे.

एक दिवस कोलोडीनची बाटली कपाटात आडवी पडली आणि त्यातील कोलोडीन फळीवर सांडले. दुसऱ्या दिवशी कपाट उघडल्यानंतर जॉनला जणू चमत्कारच दिसला. ती वस्तू अगदी हस्तीदंतासमान होती. कपाटात प्लॅस्टिकचा पहिला प्रकार म्हणजे सेल्यूलॉइड प्लास्टिक तयार झाले होते. कपाटात त्या ठिकाणी काही गुळगुळीत पापुद्रे जमा झाले होते. याचे जॉनने निरिक्षण केले आणि नंतर कापसापासून तसेच मोठ्या प्रमाणातील प्लॅस्टिक बनवले. आज अनेक प्रकारचे प्लॅस्टिक उपलब्ध आहेत पण पहिले प्लॅस्टिक जॉन वेस्लेहीयाट याला सापडले. (उत्तरार्ध)

# कधी जाणार?

कल्पना करून पाहा अशा जगाची, जिथे प्रत्येकाला आपल्या मृत्यूची तारीख माहीत आहे. काय-काय होईल? कुटुंबातील ज्येष्ठ व्यक्तीला आपण कधी 'जाणार' हे ठाऊक असल्यामुळं ती प्रॉपर्टीचं व्यवस्थापन करणं टाळतेय किंवा केलंच तरी ते कुणाला सांगत नाहीये.अशा परिस्थितीत मुलं त्या व्यक्तीची 'मनोभावे' सेवा करतील? वयानं लहान असूनही आपण आधी जाणार हे ज्याला माहीत आहे, तो कसं वागेल? पती आणि पत्नी आपापल्या मृत्यूची तारीख एकमेकांना शेअर करतील का? लग्नं जुळवताना पत्रिकेतच मृत्यूची तारीख टाकण्याचा आग्रह उभय पक्षांकडून होईल का? झाल्यास लग्नं जुळतील का? पाप-पुण्य, स्वर्ग-नरक आदी संकल्पनांवर विश्वास असलेली माणसं साधेपणानं वागतील की अधिकाधिक सुखलोलुप होतील? भूतपिशाच्च आदी संकल्पनांवर विश्वास असलेली माणसं तेही प्लॅनिंग आधीच करून ठेवतील का? पुढील सात पिढ्यांचं कमावून ठेवण्याची भूक कमी होईल की वाढेल? मोठमोठ्या उद्योगसमूहांच्या प्रमुखांची काय स्ट्रॅटेजी राहील? एकचालकानुवर्तित्व असलेल्या राजकीय पक्षांचे प्रमुख 'आपल्यानंतर पक्षाचं काय,' हा प्रश्न कधी आणि कसा सोडवतील? जमीनजुमल्याचे कज्जे-खटले कोर्टाबाहेर सोडवण्याची प्रवृत्ती वाढीस लागेल का? मृत्यूची प्रमाणपत्रं हयातीतच मिळवून ठेवण्याची सोय उपलब्ध होईल का? त्यानुसार सरकारी कचेऱ्यांमधील कामकाजात गतिमानता आणता येईल का? ही सगळी 'फॅण्टसी' वाटू शकेल; परंतु आजची फॅण्टसी उद्याची रिॲलिटी ठरावी, असे धक्के तंत्रज्ञान रोज देतंय. 'उपरवाले का बुलावा कब आएगा,' हे आर्टिफिशियल इंटेलिजन्स सांगणार आहे म्हणे! त्यासाठी संशोधकांनी 'डेथ क्लॉक' तयार केलंय आणि 'ॲप' स्वरूपात ते उपलब्धही झालंय. ते तयार करणारे कॅलिफोर्नियातील संशोधक ब्रेट फ्रॅन्सन यांच्या म्हणण्यानुसार, पाच कोटी लोकांच्या 'लाइफ एक्स्पेक्टन्सी डेटा'चा अभ्यास करून हे ॲप डेव्हलप केलंय. सव्वा लाख लोकांनी ते डाउनलोडही केलंय म्हणतात! म्हणजे, त्यांची झाकली मूठ सव्वालाखाची राहिलेली नाही. 'यूजर'चं सध्याचं वय, त्याच्या खाण्यापिण्याच्या सवयी, तो किती तास झोपतो, व्यायाम करतो की नाही, सिगारेट-दारू आदींचं सेवन करतो का, त्याच्या आजारांचा इतिहास अशी माहिती हे ॲप आपल्याला मागणार आणि आपल्या मृत्यूची संभाव्य तारीख सांगणार. वास्तविक 'लाइफ एक्स्पेक्टन्सी' हा वैद्यकशास्त्राचा विषय. शिवाय, आपल्या सवयींवरून आपल्यालाही थोडीबहुत कल्पना असतेच; पण तारखेच्या स्वरूपात ही वेळ समोर आली, तर दचकायला होणारच! हे योग्य की अयोग्य, नैतिक की अनैतिक हा विषय आता राहिलेला नाही. तंत्रज्ञान ही विकण्याची वस्तू आहे आणि निर्णय खरेदीदाराने घ्यायचाय. तारीख ऐकून हार्ट अ‍ॅटॅक येण्याची भीती वाटणारे ॲपपासून दूर राहतील. एआय तंत्रज्ञानाने आपल्या जीवनात प्रवेश (किंवा घुसखोरी) करून आता बरेच दिवस झाले. आपल्या संपूर्ण जीवनावर त्याचा प्रभाव पडेल, असं म्हणता-म्हणता त्याने आपलं जीवन व्यापून टाकायला सुरुवातही केली. पण आता ते आपल्या मरणापर्यंत पोहोचलं. हे चांगलं की वाईट, हा ज्याचा त्याचा प्रश्न; पण तंत्राने जीवनातली मजा हिरावून घेऊ नये, असं प्रामाणिकपणे वाटतं. कालचा दिवस इतिहासजमा झाला. उद्याची खात्री देता येत नाही. फक्त आजचा दिवस 'आपला', एवढंच माहीत असण्यात जगण्यातली खरी मजा आहे.

– हिमांशु चौधरी




हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक - **बाळासाहेब भगवानराव बडवे** यांनी ३१, 'यमुना', भक्ती मार्ग, एल आय सी ऑफिस जवळ, पंढरपूर जि. सोलापूर : ४१३३०४ येथे प्रकाशित केले. तसेच मुद्रक मुद्रक - क्रांती प्रिंटर्स प्रोप्रा. अनिरूद्ध बाळासाहेब बडवे यांनी ३१, 'यमुना,' भक्ती मार्ग, पंढरपूर येथे मुद्रित केले. कार्यकारी संपादक : प्रा. दीपक द. निकते. विभागीय कार्यालय 'पंढरी संचार', महावीर नगर, अतुल टायरच्यावर, पंढरपूर. फोन / फॅक्स: ०२१८६-२२८२२२ /२३; ९२२६३३७६२७ http://pandharisanchar.com E-mail : dainik.pandhari@gmail.com

## पाणीपुरवठा, आरोग्यसेवा व वाहतुकीचे नियोजन; उपविभागीय अधिकारी वर्षा लांडगे यांची माहिती

# श्रीक्षेत्र नारायणपूर येथे श्रीदत्त जयंती सोहळ्याची जय्यत तयारी

■ **पंढरी संचार न्यूज नेटवर्क**

**सासवड :** प. पू. श्री. नारायण महाराज (अण्णा) यांच्या कृपाशीर्वादाने व प.पू. टेंबे स्वामी महाराज यांच्या अधिपत्याखाली तीन दिवसांचा भव्य अपूर्व सोहळा श्रीक्षेत्र नारायणपूर (ता. पुरंदर) येथे शुक्रवार (दि. १३) ते रविवार (दि. १५) यादरम्यान होत आहे. यानिमित्त यात्रेच्या नियोजनासाठी गुरुवारी बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. या बैठकीत यात्रेबाबत जय्यत तयारीबाबत चर्चा करण्यात आली. यात्राकाळात भाविकांना सुविधा पुरविल्या जातील. आरोग्य सेवा, पाणीपुरवठा, विद्युतपुरवठा, वाहतूक, कायदा व सुव्यवस्था, आपत्ती निवारण कक्ष तसेच सासवड नगरपरिषदेकडून अग्निशमन दलाची गाडी, पाण्याचे टँकर, मूव्हिंग टॉयलेट फॉगिंग मशिनसाठी प्रशासन सहकार्य करील, असे उपविभागीय अधिकारी वर्षा लांडगे यांनी सांगितले.

या सोहळ्यानिमित्त शुक्रवारी (दि. १३) अखंड प्रज्वलित अग्नियज्ञकुंडाचा २४ वा वर्धापन दिन साजरा केला जात असून, सायंकाळी पालखी प्रदक्षिणा व २०० कोटी श्रीक्षेत्र नारायणपूर (ता. पुरंदर) येथे श्री दत्त जयंती सोहळ्यानिमित्त आयोजित बैठकीस उपस्थित प्रांताधिकारी वर्षा लांडगे, ऋषिकेश अधिकारी व अन्य अधिकारी उपस्थित होते. शिवदत्त नामयज्ञ साजरा केला जात आहे. या ठिकाणी सकाळी पालखी मंदिरातून निघेल,



ग्रामप्रदक्षिणा करून ४ वाजता यज्ञस्थळी पोहचेल. तेथे यज्ञकुंड व अग्निपूजन होईल. नंतर दीपपूजा प्रज्वलित होऊन शिवदत्त नामाचे हवन होईल. दीपपूजा व आरती होऊन दीप प्रदक्षिणा होऊन यज्ञकुंड अग्निदर्शन, गंध, घुगऱ्यांचा प्रसाद होईल. त्यानंतर पालखीसह मंदिरात येऊन आरती होईल.

शनिवारी (दि. १४) श्री दत्त मंदिरात सकाळी ९.३० ते १० आरती, दुपारी १ ते ३ वाजता विविध गावांतून येणाऱ्या दिंड्यांचे स्वागत केले जाईल. दुपारी ३ ते ४ भजन, त्यानंतर ४ ते ५.३० वाजता पादुकांवर रुद्राभिषेक होईल. दत्तजन्म सोहळा सायंकाळी ७ वाजून ३ मिनिटांनी होणार आहे. श्री दत्त जन्मप्रसंगी प.पू. टेंबे स्वामी महाराज यांचे जन्म व्याख्यान, आरती, नाव ठेवणे, पाळणा, पुष्पवृष्टी, सुंठवडा वाटप व देव भेटवणे तसेच रात्री ९ वाजता महाप्रसाद व शोभेचे दारूकाम होईल. रात्री १० वाजता कीर्तन आणि १२ वाजता भजनी भारुडाचा कार्यक्रम होईल. रविवारी (दि. १५) दत्त जयंतीचा समारोप दिवस आहे. पहाटे ४ ते ६ वाजता नारायणेश्वर (महादेव) मंदिर व श्री दत्त मंदिरात रुद्राभिषेक होईल. ६ ते ७.३० वाजता पौर्णिमा हवन व ८.३० ते ९ आरती होऊन मंदिरातून पालखी प्रस्थान होईल. ढोल लेझीम, हत्ती, घोडे, बँड यांच्यासह भव्य मिरवणूक पालखी चंद्रभागा स्नानासाठी प्रस्थान ठेवेल. सकाळी १० वाजता चंद्रभागा कुंडावर पोहोचेल. देवस्नान होऊन गावातून मिरवणुकीने पालखी मंदिरात १.३० वाजता पोहोचेल. याठिकाणी श्री दत्त जयंती सोहळा प्रवचन व भाविक भक्तांना महाप्रसादाचे आयोजन केले आहे.

पालखीची मंदिर प्रदक्षिणा होऊन रात्री १० वाजता आरतीने सोहळ्याची सांगता होईल, अशी माहिती दत्त मंदिराचे व्यवस्थापक भरतनाना क्षीरसागर यांनी दिली. ही बैठक पोलिस निरीक्षक ऋषिकेश अधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. तसेच यात्रेसाठी सहकार्य करण्याचे आवाहन त्यांनी नागरिकांना केले. राज्यातून लाखो भाविक दत्त जयंती सोहळ्यासाठी येत असतात. यासाठी सोहळ्यात लागणाऱ्या सर्व बाबींचा आढावा टेंबे स्वामी महाराज यांनी घेतला. या वेळी शिवसेनेचे जिल्हाप्रमुख दिलीप यादव, शिवसेना तालुकाप्रमुख हरिभाऊ लोळे, निवासी नायब तहसीलदार संदीप पाटील, प्रभारी गटविकास अधिकारी पंकज शेळके, पोलिस निरीक्षक ऋषिकेश अधिकारी, सासवड नगरपरिषदेचे मुख्याधिकारी डॉ. कैलास चव्हाण, सार्वजनिक बांधकाम विभागाचे उपअभियंता स्वाती दहिवाल, महावितरण विभागाचे उपकार्यकारी अभियंता गणेश चांदणे, नगरपरिषदेचे आरोग्य अधिकारी मोहन चव्हाण, आरोग्य अधिकारी पुरंदर विक्रम काळे, एस.टी. महामंडळाचे कैलास जगताप, दादासाहेब भुजबळ, मंडल अधिकारी सचिन मोरे, ग्रामसेवक दादासाहेब भवर, सरपंच प्रदीप बोरकर, रामभाऊ बोरकर, चंद्रकांत बोरकर, दिगंबर भिताडे आदी उपस्थित होते.

## अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन

# मरकळ पंचलिंग माळावर श्रीदत्तजन्मोत्सवास प्रारंभ

■ **पंढरी संचार न्यूज नेटवर्क**

**आळंदी :** श्रीक्षेत्र मरकळ ( मारूतीनगर ता.खेड ) येथील जागृत, पुरातन पंचलिंगमाळावरील दत्तमंदिरात टाळ-मृदंगाच्या गजरात श्री दत्त जन्मोत्सवा निमित्त आयोजित अखंड हरिनाम सप्ताहास विविध धार्मिक कार्यक्रमांनी हरिनाम गजरात श्री पंचलिंग गुरुदेव दत्त देवस्थान ट्रस्ट अध्यक्षा ह.भ.प. ताईमाऊली महाराज यांचे मार्गदर्शनात सोहळ्यास प्रारंभ झाला. या निमित्त पंचक्रोशीतील भाविक, नागरिकांना हरिकीर्तन सेवेच्या श्रवणाची पर्वणी लाभणार आहे.



पंचलिंग गुरुदेव दत्त प्रतिष्ठानच्या वतीने हरिनाम सप्ताहाचे आयोजन ८ ते १५ डिसेंबर या कालावधीत जन्मोत्सव सोहळ्याचे आयोजन करण्यात आले. या सप्ताहाचे उद्‌घाटन विविध उपक्रमांनी झाले. सप्ताहाचे उद्‌घाटन प्रसंगी पंचलिंग देवस्थान अध्यक्ष ताई माऊली महाराज, मी सेवेकरी फाउंडेशन अध्यक्ष सुधीर मुंगसे, पुणे जिल्हा वारकरी महामंडळाचे अध्यक्ष विलास महाराज बालवडकर, सरपंच चंदनशेठ मुऱ्हे, कृषी उत्पन्न बाजार समिती सदस्य अनुराग जैद, संचालक संतोष कुंभार, मरकळ उपसरपंच सतीश लोखंडे, ग्रामपंचायत सदस्य भानुदास लोखंडे, विद्यमान सरपंच बाजीराव लोखंडे, विद्यमान चेअरमन बाळू टाकळकर, गोरक्ष महाराज वर्पे, पुणे जिल्हा शिवसेना अध्यक्ष भगवानशेठ पोखरकर, जिल्हा परिषद सदस्य आळंदी शहराध्यक्ष राहुलशेठ चव्हाण, पत्रकार महादेव पाखरे, अनिल जोगदंड, राजेश नागरे, अर्जुन मेदरकर, गोविंद ठाकूर तौर, देवस्थान सदस्य संभाजी ज्ञानोबा लोखंडे, किरणशेठ लोखंडे, संतोष कुंभार, हिरामण लोखंडे, मयुर चव्हाण, सतिश लोखंडे, भानुदास लोखंडे, शंकर वरपे, हनुमंत आव्हाळे, पंडित बिराजदार, हनुमंत आदलकार, पुजारी स्वामी सूर्यवंशी, लक्ष्मण नेटके, कैलास होले, शिवाजी शंकर मोशेरे, आळंदी शहर शिवसेना शाखा प्रमुख रोहिदास कदम, तंटामुक्त समिती अध्यक्ष किरणशेठ लोखंडे, मोई ग्रामपंचायत सरपंच चंदनशेठ मुऱ्हे आदी उपस्थित होते. श्री गुरु चरित्र पारायण सोहळ्याचे ग्रंथ पूजन पुणे जिल्हा वारकरी महामंडळाचे अध्यक्ष विलास महाराज बालवाडकर, भगवान पोखरकर, राहुल चव्हाण, अर्जुन मेदनकर यांचे हस्ते झाले.

श्री पंचलिंग गुरुदेव दत्त देवस्थान ट्रस्ट, श्री रामकृष्ण वारकरी शिक्षण संस्था अनाथ आश्रम मरकळ यांचे वतीने दत्तजयंती निमित्त अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे. भाविक नागरिक, वारकरी यांनी या जन्मोत्सवास उपस्थित रहावे असे आवाहन ताई माउली महाराज यांनी केले आहे.

श्री दत्तजन्मोत्सव सोहळ्यासाठी पुणे, रायगड, कोकण, मुंबई येथील दत्तभक्त, भाविक मरकळच्या दत्तमंदिरात दर्शनास मोठ्या संख्येने येत असतात. मंदिर परिसरात या निमित्त लक्षवेधी भगव्या पताका, भगवे ध्वज, आकर्षक विद्युत रोषणाई, विविध रंगीबेरंगी आकर्षक पुष्प सजावट करण्यात आली आहे.

## ग्रामविकास मंडळाच्या चैतन्य विद्यालयात

# फिरत्या प्रयोगशाळेतून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन

■ **पंढरी संचार न्यूज नेटवर्क**

**ओतूर :** येथील ग्राम विकास मंडळाच्या चैतन्य विद्यालयात सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे आणि एलजी मोबाईल सायन्स क्लब यांचे विद्यमाने फिरत्या प्रयोगशाळेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केल्याची माहिती मुख्याध्यापिका राजश्री भालेकर यांनी दिली. यावेळी विद्यार्थ्यांना वेगवेगळ्या प्रयोगांची माहिती कृतीसह सांगण्यात आली. लिक्विड नाइट्रोजनच्या माध्यमातून त्याचे सजीव व निर्जीव यांच्यावर कोणते परिणाम होतात हे दाखवण्यात आले.

उणे १९६ तापमानाला लिक्विड नायट्रोजन कसे काम करतो हे दाखवण्यात आले. प्रत्येक वर्गातून विद्यार्थ्यांना प्रकल्प दाखवण्यात आले. यासाठी निशान जगताप, रवी मगर, राहुल जगताप, स्वप्निल भोसले, सिताराम बहिर यांनी यासाठी मार्गदर्शन केले. विद्यालयाचे विज्ञान विभाग प्रमुख प्रमोद कुमार जाधव यांनी प्रास्ताविक व स्वागत केले. अनिल जवरे यांनी सूत्रसंचालन केले तर एम .एम. तांबे यांनी आभार मानले. अनिल उकिरडे, पंकज घोलप, विशाल चौधरी, मिलिंद खेत्री, संतोष कांबळे, अश्विनी नलावडे,तनुजा थोरात या विज्ञान शिक्षकांचे या कामी सहकार्य लाभले.

## सुनावणी दरम्यान समर्थकांनी तहसीलदारांना घेतले फैलावर

# संचालक अशोक राक्षे यांच्या दाखल्यावर आक्षेप

■ **पंढरी संचार न्यूज नेटवर्क**

**खेड :** खेड बाजार समितीचे संचालक अशोक राक्षे यांच्या आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटक दाखल्यावर आक्षेप घेतला आहे. त्यावर म्हणणे ऐकुन न घेता तसेच वकिलांना विरोधकांच्या अक्षेपाची कागदपत्र न देता घाई घाईने सुनावणी घेतली. असा आरोप करत बाजार समितीचे सभापती विजयसिंह शिंदे पाटील, शिवसेनेचे संजय घनवट व जवळपास चाळीस ते पन्नास समर्थक खेडच्या तहसीलदार ज्योती देवरे यांच्या कार्यालयात सोमवारी (दि ९) उपस्थित राहिले. माजी आमदार दिलीप मोहिते पाटील यांचे ऐकुन कामकाज करता असा आक्षेप घेत सर्वांनी तहसीलदार ज्योती देवरेंवर प्रश्नांचा भडिमार केला. अचानक झालेल्या गोंधळ,



गडबडीमुळे तहसीलदार ज्योती देवरे यांनी पोलिस बोलावले. त्यांनी गोंधळ घालणाऱ्या सर्वांना बाहेर काढले. त्यानंतर तहसीलदार देवरे यांच्याकडे नियमित कामकाजाची सुनावणी दरम्याण त्यांना अस्वस्थ वाटू लागल्याने डॉक्टरांचे पथक या ठिकाणी बोलावण्यात आले. त्यांनी तपासणी केली असता देवरे यांचा रक्तदाब वाढला असल्याचे निदर्शनास आले. देवरे यांनी काही वेळ कामकाज बंद ठेवून पुन्हा सुरळीत सुरू केले.

माजी आमदार दिलीप मोहिते पाटील यांच्या पॅनल मध्ये निवडणुक लढवून अशोक राक्षे बाजार समितीमध्ये दुसऱ्यांदा संचालक झाले आहेत. विधानसभा निवडणुकीची रणधुमाळी थांबल्यावर बाजार समितीचे संचालक अशोक राक्षे यांच्या आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटक दाखल्यावर सुनावणी होणार असल्याची माहिती समर्थकांना मिळाली. पराभव झाला म्हणून मोहिते यांनी तहसीलदार ज्योती देवरे यांना पुढे करून हे कृत्य करण्यास भाग पाडले असे आरोप केले.

दरम्यान, दिलीप मोहिते पाटील यांच्या समर्थक सुमन मल्हारी मोहितेयांनी ३० ऑक्टोबर २०२४ ला प्रांताधिकारी अनिल दौंडे यांच्याकडे राक्षे यांच्या दाखल्यावर आक्षेप घेतला होता. प्रांताधिकारी दौंडे यांच्या मार्गदर्शनाखाली त्याची सुनावणी सोमवारी दिनांक ९ रोजी झाली. यावेळी गृह तपासणी करण्याचे आदेश तहसीलदारांनी दीले. त्यानुसार राजगुरुनगर मंडळ अधिकारी महादेव रोकडे व तलाठी यांनी संचालक अशोक राक्षे यांची आमदार गृह तपासणी कारवाई केली. तर आमचे अथवा आमच्या वकिलांचे म्हणणे तहसीलदारांनी ऐकूण घेतले नाही. अर्ज, विनंती करूनही आक्षेप घेतला त्याची माहिती दिली नाही. असे बाजार समितीचे सभापती विजयसिंह शिंदे पाटील यांनी याबाबत सांगितले. प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे. याबाबत मी योग्य वेळी माहिती देईन असे तहसीलदार ज्योती देवरे म्हणाल्या.

## Selected

### कऱ्हेकाठी उजळली एक दिवटी ज्ञानाची



**पुरंदर :** भारतीय लोकदैवत खंडेराया यांचा चंपाषष्ठी उत्सवा सहा दिवस घटस्थापना राज्यासह खंडोबा देवाच्या विविध स्थळी साजरा केला जातो. यंदा आचार्य अत्रे यांच्या कऱ्हे काठी असलेल्या सासवड मधील जयाद्री भवन येथे शिक्षण कला वाचन साहित्य संस्कृती विषयांना स्पर्श करणाऱ्या विविध कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते. कार्यक्रमाची सुरुवात अॅड भगवान होले यांच्या हस्ते दीप प्रज्वलन करून व शाहीर सगनभाऊ लिखित खंडेरायाच्या भूपाळी श्रवणाने करण्यात आले. वाचन संस्कृतीचा विकास व्हावा म्हणून 'एक दिवटी ज्ञानाची ' कार्यक्रमाचे आयोजन नचिकेत टाक यांनी केले. यात मान्यवर लेखकांच्या साहित्याचे वाचन करण्यात आले. शंकर पाटील लिखित नाटकाचे वाचन स्नेहल देशपांडे यांनी केले. तर 'वैशाली की नगर वधू' या कादंबरीचे सारांश वाचन शलाखा गोळे यांनी केले. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या कवितेचे वाचन इंदिरा पवार यांनी केले. गौरी प्रभुणे, प्रीतीदा माहूरकर यांनीही वाचन केले.

### मेफेड्रोन विक्रीप्रकरणाची खेडला सुनावणीस प्रारंभ

**राजगुरूनगर :** अमली पदार्थ तस्कर ललित पाटील मुख्य आरोपी असलेल्या चाकणमधील मेफेड्रोन विक्री प्रकरणातील खटल्याच्या सुनावणीला खेड न्यायालयात सुरुवात झाली. तत्कालीन अमली पदार्थ विरोधी पथकाचे पोलिस अधिकारी शाकीर कौसुद्दीन जेनेरी यांनी न्यायालयात आरोपींना ओळखले. मीच दि. ७ ऑक्टोबर २०२० ला चाकण पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केल्याचे त्यांनी न्यायालयात सांगितले. खेड येथील विशेष न्यायाधीश अश्रफ घनवाल यांच्या न्यायालयात विशेष सरकारी वकीलं शिशिर हिरे यांनी शाकीर कौसुद्दीन जेनेरी यांची साक्ष नोंदविली. गुन्हे शाखेच्या अमली पदार्थ विरोधी पथकाने खेड तालुक्यात ७ ऑक्टोबर २०२० रोजी २० किलो मेफेड्रोन (एमडी) जप्त केले होते. तपासात आरोपींनी रांजणगाव येथील कंपनीत तब्बल १३२ किलो आणि रायगड जिल्ह्यातील महाड येथे दहा-पंधरा किलो मेफेड्रोन तयार केल्याची माहिती मिळाली होती. या प्रकरणात पोलिसांनी अमली पदार्थ तस्कर ललित पाटीलसह २० जणांना अटक करून गुन्हा दाखल केला होता. ललित पाटील ससून रुग्णालयात उपचार घेत असताना मेफेड्रोनची विक्री करत असल्याचे उघडकीस आले होते, त्यातील आरोपींची ओळख पटली आहे.

### कर्मवीर भाऊराव पाटील विद्यालयात डॉ. आंबेडकरांना अभिवादन

**राजगुरूनगर :** डॉ. बाबासाहेब आंबेडकर महापरिनिर्वाण दिनानिमित्त वाडा (ता. खेड) येथील कर्मवीर भाऊराव पाटील विद्यालय व अॅड. राम जनार्दन कांडगे कनिष्ठ महाविद्यालयात त्यांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन करण्यात आले. यावेळी विद्यालयाचे प्राचार्य आनंदराव तांबे यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यालयातील सर्व शिक्षकांच्या समवेत डॉ. आंबेडकरांच्या प्रतिमेचे पूजन करून त्यांना अभिवादन करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यालयाचे पर्यवेक्षक नामदेव डोके हे होते. या कार्यक्रमांतर्गत विद्यालयातील शिक्षक विजय पवार यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना डॉ. आंबेडकरांसारखी अभ्यासू वृत्ती स्वीकारायला हवी, जाती धर्माबद्दल भेदभाव करू नका, तसेच संविधानाबद्दल विद्यार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शन केले. आठवीतील विद्यार्थिनी आर्या सावंत, साईशा वाडेकर, खुशी आतकरी, सांची शिंदे यांनी बाबासाहेबांच्या जीवनावर आधारित मनोगते व्यक्त केली. आठवीमधील विद्यार्थिनी समीक्षा वाडेकर व आत्मजा बोऱ्हाडे यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. विद्यालयाच्या शिक्षिका उज्ज्वला पवार यांनी आभार मानले.

## शासनाने बिबट्यांना ठार मारण्याची परवानगी देण्याची मागणी


# बिबट्यांची वाढणारी संख्या नागरिकांसाठी धोकादायक

■ **पंढरी संचार न्यूज नेटवर्क**

**नारायणगाव :** जुन्नर तालुक्यातील वन विभागाच्या कार्यक्षेत्रामध्ये बिबट्यांची संख्या दिवसेंदिवस वाढू लागल्याने, जनतेमध्ये भीतीचे वातावरण निर्माण होऊ लागले आहे. पूर्वी बिबट्या कधीतरी एखादा दिसायचा. मात्र, हल्ली बिबट्या दररोज कुठे ना कुठे टोळक्याने दिसू लागले असल्याने, शेतकरी वर्गामध्ये प्रचंड भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

बिबट्यांची वाढती संख्या पाहता शासनाने वन खात्याला बिबट्यांना ठार मारण्याची परवानगी द्यावी, तरच बिबट्यांची संख्या कमी होईल, अशी मागणी आता जनतेमधून जोर धरू लागली आहे. शासनाने वेळीच उपाययोजना केली नाही, तर जनतेच्या आक्रोशाला वन खात्याबरोबर शासनाला देखील सामोरे जावे लागण्याची शक्यता व्यक्त होत आहे.

बिबट्या हा प्राणी मांजरकुळातील असल्याने त्यांची संख्या झपाट्याने वाढत आहे. तसेच बिबट्या हा जंगलात असलेला प्राणी



गेल्या काही वर्षापासून उसाच्या शेतात वावरू लागल्याने तो आता उसाचे क्षेत्र सोडायला मागत नाही. तसेच पोषक वातावरण तसेच त्याला असलेली खाद्याची तात्काळ उपलब्धता यामुळे बिबट्यांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढू लागली आहे.

दरम्यान बिबट्यांची नसबंदी बाबतची मागणी अद्याप मार्गी लागलेली नाही. मादी बिबट्याची नसबंदी करण्याबाबतचा प्रस्ताव राज्य सरकारच्या माध्यमातून केंद्र सरकारकडे पाठवण्यात आला आहे. परंतु शासनाच्या लाल फीतीच्या कारभारामुळे अद्यापही हा प्रस्ताव "जैसे थे " स्थितीमध्ये फाईल बंद असल्याचे समजते. जुन्नर, आंबेगाव खेड,शिरूर या चार तालुक्यांमध्ये दररोज कुठे ना कुठे बिबट्याचा हल्ला झाल्याच्या बातम्या कानावर पडत आहे. पकडलेली बिबटे सरसकट शासनाने इतरत्र दुसऱ्या राज्यात हलवावेत, किंवा पकडलेले सोडून देऊ नयेत. शासनाला हे शक्य नसेल तर शासनाने थेट वन विभागाला बिबट्यांना गोळ्या घालण्याची परवानगी द्यावी, अशी मागणी आता जोर धरू लागली आहे

**मेंढपाळांनी वाघूर लावावे**

● जुन्नर, आंबेगाव, खेड व शिरूर तालुक्यांमध्ये मेंढपाळांची संख्या अधिक असल्याने या मेंढपाळांवर तसेच मेंढरांवर बिबट्याचा हल्ला नेहमीच होत आहे. मेंढपाळांना देखील वन खात्याकडून तंबू व लाईटची व्यवस्था करण्यात आली आहे. मेंढपाळाने रात्री झोपताना स्वतःभोवती मेंढरांना वापरण्यात येणारी "वाघूर" लावून झोपावे, अशा सूचना देण्यात आल्या आहेत. परंतु या सूचनांची अंमलबजावणी काटेकोरपणे करणे मेंढपाळांना शक्य होत नाही.

# ढगाळ हवामानाचा गव्हाला फटका

■ **पंढरी संचार न्यूज नेटवर्क**

**इंदापूर :** इंदापूर तालुक्यामध्ये गेल्या तीन दिवसांपासून ढगाळ वातावरण निर्माण झाले आहे. त्यामुळे चालु रब्बी हंगामात गहू पीक घेतलेले शेतकरी अडचणीत दिसत आहे. दरम्यान, ढगाळ वातावरणामुळे नागरिकांना रविवारी दिवसभर सूर्यदर्शनही होऊ शकते नाही.



सध्याच्या ढगाळ वातावरणामुळे गहू पिकाच्या वाढीवर परिणाम होण्याची भीती शेतकऱ्यांना वाटत आहे. तसेच सध्याचे ढगाळ वातावरण आणखी काही दिवस राहिल्यास गहू पिकावर तांबेरा रोगाचा प्रादुर्भाव होण्याची भीती शेतकऱ्यांनी व्यक्त केली.तसेच ढगाळ वातावरणामुळे भाजीपाला पिके व फळ बागा, हरभरा, करडई आदी पिकांवर किडी-रोगांचा प्रादुर्भाव वाढण्याची भीती शेतकऱ्यांमधून व्यक्त केली जात आहे.

दरम्यान, रब्बीतील हंगामातील पिकांना थंडी पोषक ठरत असले तरी ढगाळ हवामानामुळे मात्र पिकांवर रोगराईचा प्रादुभाव वाढतो. सध्या गहू, हरभरा, ज्वारी, मका, कांदा आदि पिकांची पेरणी अंतिम टप्प्यात आली असून पिके जोमात आली आहेत. काही ठिकाणी कांदा लागण सुरू आहे तर काही ठिकाणी पेरणी केलेला कांदा उगवून जोर धरू लागला आहे. पहाटे पडणारे धुके झाडण्यासाठी कांदा उत्पादकांची धांदल उडत आहे.

मात्र, मागील दोन दिवसांपासून वातावरणाचा नूर पालटला असून ढगाळ हवामान राहत आहे. ढगाळ हवामानामुळे कांद्याच्या पाती करपणे, गहू, ज्वारीची पानेदेखील पिवळी पडतात. तर मिरच्या, पालेभाज्यांवर तुडतुडी, पाने खाणा-या अळीचा प्रादुर्भाव वाढण्याचा धोका निर्माण झाल्याने कीडनाशकांच्या फवारणीचा खर्च वाढणार आहे. सध्या थंडीचा कडाका कमी होऊन ढगाळ हवामानात वाढ झाली आहे. याचा थेट परिणाम विविध पिकांवर होत आहे.

## वाहन चालकांसह प्रवाशांनी व्यक्त केले समाधान

# मंचर-शिरूर मार्गावर दिशादर्शक फलक

■ **पंढरी संचार न्यूज नेटवर्क**

**लोणी-धामणी :** आंबेगाव व शिरूर या दोन तालुक्यांना जोडणारा महत्वाचा रस्ता (मार्ग) म्हणजे मंचर-अवसरी खुर्द-पोंदेवाडी फाटा हा मार्ग काही दिवसांपूर्वी या रस्त्याचे डांबरीकरण करण्यात आले आहे. कामाची गुणवत्ता उत्तम राखली असल्याने मंचरहून मलठण, शिरूर, शिक्रापूर, रांजणगाव, कारेगावला जाण्यासाठी वाहनचालक या मार्गाचा वापर करत आहेत. मात्र, घोडखणा (झांजूर्णेबाबा मंदिर) ते पोंदेवाडी फाटा या रस्त्यादरम्यान दिशादर्शक फलक, वळणे, अरुंद पुल, वेगमर्यादा आदी दिशा



दाखवणारे फलक नसल्याने या मार्गावर अपघातांचे प्रमाण वाढले होते. संबंधित विभागाच्या वतीने या मार्गावर फलक लावण्यात आल्याने या मार्गावरून प्रवास करणाऱ्या वाहनचालकांनी तसेच प्रवाशांनी समाधान व्यक्त केले आहे.

हा मार्ग पुढे जाऊन अष्टविनायक, बेल्हा-जेजुरी या राज्य महामार्गाला मिळतो. शिक्रापूर, रांजणगाव या एमआयडीसी नाशिक शहराला जोडण्यासाठी हा महत्वाचा मार्ग बनला आहे. या शिवाय शिरूर भागातील नागरिकांना व विद्यार्थांना मंचर, अवसरी खुर्द, घोडेगाव, लांडेवाडी आदी गावांत शैक्षणिक, प्रशासकीय कामांसाठी, शेतमाल विक्रीसाठी या मार्गाचा वापर सोयीचा ठरतो आहे. या मार्गाची बहुतांश गैरसोय टळली आहे. याबाबत प्रवाशांनी समाधान व्यक्त केले आहे. मात्र रस्त्याच्या दुतर्फा अनावश्यक वाढलेली खुरटी झाडे झुडपे काढून टाकण्याची गरज असल्याची भावना वाहनचालकांनी व्यक्त केली.



मंगळवार, १० डिसेंबर २०२४

# मानसी

● फॅशन ● किचन ● गृहसजावट ● सहजीवन ● टिप्स

## ■ सेलीब्रिटी कॉर्नर



## कास्टिंग काऊचबाबत रश्मीचा गौप्यस्फोट

बॉलीवूडपासून टीव्हीपर्यंतचे अनेक स्टार्स कास्टिंग काउचचे शिकार ठरले आहेत. याबाबत अनेकांनी खुलासेही केले आहेत. यानंतर आता टीव्ही अभिनेत्री रश्मी देसाईने देखील कास्टिंग काउचवर भाष्य केले आहे.रश्मीला वयाच्या १६ वर्षी कास्टिंग काउचला सामोरे जावे लागले होते. मुलाखतीमध्ये रश्मीने सांगितले की, मी १६ वर्षांची असताना एका ऑडिशनला गेले होते. तेव्हा त्या व्यक्तीने ड्रिंकमध्ये ड्रग्ज टाकून मला बेशुद्ध करण्याचा प्रयत्न केला होता. मी त्याला स्पष्ट बोलले की, मला हे करायचे नाही. तरीही तो मला कंट्रोल करण्याचा प्रयत्न करत होता. मी शेवटी कशीतरी तिथून पळून गेले आणि स्वतःला वाचवले. पुढे रश्मी म्हणाली, दुसऱ्या दिवशी मी माझ्या आईसोबत त्याच्याकडे पुन्हा गेले. तेव्हा आईने थेट त्याला थोबाडीत मारली होती. असा भयानक अनुभव रश्मीला आल्याचे तिने सांगितले. ही घटना अनेक वर्षापूर्वी घडली जरी असली तरी अजूनही तिच्या मनात ती कायम आहे.

दरम्यान, टिव्ही अभिनेत्री रश्मी देसाई हिने आपल्या अभिनयाने प्रेक्षकांच्या मनावर राज्य केलं आहे. तिने अनेक हिट मालिका केल्या आहेत. रश्मीका नेहमी तिच्या स्पष्टवक्तेपणासाठी ओळखली जाते. 'उतरन' मालिकेतील तपस्याच्या भूमिकेमुळे तिला मोठी लोकप्रियता मिळाली. याशिवाय ती 'परी हूँ मैं,' 'रावण' आणि 'बिग बॉस १३' मध्येही दिसली होती. यासोबतच तिने अनेक वेब सीरीज आणि चित्रपटांमध्येही काम केले आहे. वैवाहिक जीवनाबद्दल बोलायचे झाले तर, रश्मीने २०१२ मध्ये उतरनचा को-स्टार नंदिश संधूसोबत लग्न केले. मात्र चार वर्षांनंतर दोघांचा घटस्फोट झाला. घटस्फोटानंतर रश्मीचे नाव अनेक स्टार्ससोबत जोडले गेले. बॉयफ्रेंड अरहान खान देखील 'बिग बॉस १३' मध्ये आला होता. दोघांमध्ये जोरदार वाद झाला आणि सलमानने अरहानचा पर्दाफाश केला होता. ●●●



## ■ स्मरण

## जगद्विख्यात कथ्थकसाधिका

रोहिणी गणेश भाटे या ज्येष्ठ कथ्थक नृत्य कलाकारांपैकी एक होत्या, ज्यांनी भारतीय शास्त्रीय नृत्याचा कलाकार, शिक्षिका, लेखक, संशोधक आणि समीक्षक म्हणून विकास केला. त्यांचा जन्म १४ नोव्हेंबर १९२४ रोजी बिहार राज्यात पाटणा येथे झाला. त्यांनी मराठी, संस्कृत हे विषय घेऊन फर्ग्युसन महाविद्यालयातून बी.ए.ची पदवी मिळवली.

जयपूर घराण्यातील ख्यातनाम गुरू पं. मोहनराव कल्याणपूरकर यांच्याकडे लखनौला रोहिणीताई विद्याग्रहण करू लागल्या. संगीताच्या आवडीमुळे त्या केशवराव भोळे आणि वसंतराव देशपांडे यांच्याकडे गायन शिकल्या. त्यानंतर त्यांनी पं. लच्छू महाराज यांच्याकडे कथकचे शिक्षण घेतले. पं. लच्छू महाराज हे लखनौ घराण्यातील नामवंत नर्तक व गुरू होते. भारताबाहेरही पूर्व जर्मनी, फ्रान्स, हॉलंड, आफ्रिका, अमेरिका व कॅनडा, व्हिएतनाम, इंग्लंड व जपान दौरे अतिशय यशस्वीपणे पार पाडून रोहिणी भाटे ख्यातनाम सुप्रसिद्ध कलाकार म्हणून राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवर मान्यताप्राप्त झाल्या.

रोहिणी भाटे यांनी 'माझी नृत्यसाधना', 'कथक दर्पण दीपिका' व 'लहेजा' या पुस्तकांचे लेखन केले. अमेरिकन नृत्यकर्मी इझाडोरा डंकन हिच्या आत्मवृत्ताचा 'मी इझाडोरा' हा त्यांनी केलेला अनुवाद गाजला होता. त्यांना १९७७ साली नृत्यासाठी 'महाराष्ट्र राज्य' पुरस्कार, १९७९ साली 'संगीत नाटक अकॅडमी', 'महाराष्ट्र गौरव' (१९९०), 'जीवनसाधना गौरव' (१९९९) आणि 'गोदावरी गौरव' पुरस्कार १९९४ साली मिळाला.

२००२ साली 'कालिदास' सन्मान, तर २००४ साली डेक्कन कॉलेजतर्फे त्यांना 'डी.लिट.' ही पदवी प्राप्त झाली. २००६ मध्ये त्यांना संगीत नाटक अकादमीचा 'रत्न' पुरस्कारही मिळाला. रोहिणी भाटे यांचे १० ऑक्टोबर २००८ रोजी पुण्यात निधन झाले. ●●●

**साधारणतः पंधरा -वीस वर्षापूर्वीपर्यंत आई-वडीलांनी आणलेलं स्थळ बघून, एकमेकांना भेटून पत्रिका, गुण वगैरे पाहून चटकन लग्नं ठरत असत. लग्न ठरवताना मुलगा आणि मुलगी फार चिकित्सा करत नसत. आपले पालक आपल्या बाबतीत योग्य तो निर्णय घेतील, हा विश्वास मुलांना होता. आता तसं होत नाही. अनेक पालक आपल्या मुलांच्या बाबतीत 'लग्नाचा निर्णय त्यांच्यावरच सोपवलाय!' असं म्हणून बॅकफूटवर राहताना दिसताहेत. 'तो किंवा ती दोघेही जो निर्णय घेतील तो आम्हाला मान्य आहे!' असं म्हणून निर्णयप्रक्रियेतून थोडे दूर राहू पाहताहेत. काय आहेत याची कारणं? त्या कारणांचा केलेला ऊहापोह.**

# दोन घडीचा डाव

• सुजाता पेंडसे


आपल्या घरातील मुलाचे, मुलीचे दोनाचे चार हात व्हावेत म्हणून प्रत्येक पालक प्रयत्नशील असतात. मुलं लग्न करून संसाराला लागली की जबाबदारी संपली, असं काही काळपर्यंत वाटत होतं, मात्र आज असा प्रश्न पडतोय की खरंच मुलामुलींचं लग्न ठरवणं आता इतकं सोपं राहिलंय?

पूर्वी म्हणजे फार नाही पंधरा वर्षापूर्वीपर्यंत आई-वडीलांनी आणलेलं स्थळ बघून, एकमेकांना भेटून पत्रिका, गुण वगैरे पाहून चटकन लग्नं ठरत असत. लग्न ठरवताना मुलगा आणि मुलगी फार चिकित्सा करत नसत. आपले पालक आपल्या बाबतीत योग्य तो निर्णय घेतील, हा विश्वास मुलांना होता. तसं आता होत नाही. अनेक पालक आपल्या मुलांच्या बाबतीत 'लग्नाचा निर्णय त्यांच्यावरच सोपवलाय!' असं म्हणून बँक फूटवर राहताना दिसताहेत. 'तो किंवा ती दोघेही जो निर्णय घेतील तो आम्हाला मान्य आहे!' असं म्हणून निर्णयप्रक्रियेतून थोडे दूर राहू पाहताहेत. काय आहेत याची कारणं?

मला जे जाणवलं, दिसलं त्यातून हे सांगावंसं वाटतंय की 'आपली मुलं पुरेशी निर्णयक्षम आहेत', किंवा 'त्यांचं त्यांना समजतंय की आपल्यांसाठी काय बरोबर किंवा काय चूक आहे'. किंवा 'समजा, आपण सुचवलं आणि लग्न ठरवलं, त्यातून पुढे त्या दोघांचं नाही पटलं, तर काय करायचं, त्यापेक्षा स्वतःच निवड केलेली असली की लग्न निभवण्याची काळजीही त्यांचीच असेल' असा विचार केला जातोय.

या सगळ्यामागे 'लग्न टिकलं नाही तर?' 'त्यांचं एकमेकाशी पटलं नाही तर?' अशी शंका प्रथमपासूनच असते. अलिकडच्या काही वर्षात हा मोठा बदल झालाय. पूर्वीच्या काळी 'लग्न टिकेल की नाही' हा विचार सुध्दा कुणाच्या मनात येत नसे. कारण लग्न ही टिकवण्याची, निभावण्याची तडजोडीची गोष्ट आहे हे सर्वमान्य होतं. मुलगा मुलगी आणि त्यांचे पालक हे सगळे घटक लग्न टिकवण्यामध्ये हातभार लावत असत. आज मात्र जवळजवळ प्रत्येक पालकाच्या मनात ही धाकधुक आहे की लग्न आणि संसार नीट होईल ना? म्हणूनच हे निर्णय स्वातंत्र्य मुलांकडे दिलं गेलेलं आहे. अर्थात काळ बदलला आहे. आजची पिढी अत्यंत व्यवहारी आहे. आपल्याला काय हवंय, याबद्दल त्यांच्या कन्सेप्ट क्लिअर आहेत. त्यामुळे त्यांनीच निर्णय घेणं काही चुकीचं आहे, असं म्हणता येत नाही.

आजकाल मुलीही भरपूर शिकून, उत्तम कमावत्या झालेल्या आहेत. अनेक वेगवेगळ्या क्षेत्रात चांगल्या पदावर सक्षमपणे काम करताहेत. त्यामुळे त्यांच्या कडे जोडीदार हवा तसा निवडण्याचे स्वातंत्र्य आहे. किंबहुना त्यांनी ते मिळवले आहे. मुलींच्या या प्रगतीचे खरोखर कौतुक करावे, इतक्या मुली आर्थिकदृष्ट्या स्वतंत्र झालेल्या आहेत. त्यामुळे मुलींना कसा मुलगा हवा आहे हे विचारूनच पालक स्थळ निवडताहेत. अपेक्षेप्रमाणे स्थळांची यादी करून मुलांकडे सोपवली की पालकांचे काम जवळजवळ संपतेच. मग त्यांनी ठरवायचे की, यातला जोडीदार कुठला हवा. मुलामुलींना इतके स्वातंत्र्य देऊनही अनेक घरांमध्ये 'लग्न जमणे' हे खूप कटकटीचे होऊन बसलेय. मुला मुलींचे लग्नाचे वय ३० पासून पुढे सुरू झालेय.





या सगळ्यात 'सेटल होणे' हे वाक्य तर अनेक लग्न ठरवण्याच्या मुळावर आलेय, असं म्हटलं तर वावगे ठरणार नाही. 'सेटल होणे' म्हणजे नेमकं काय, हाही एक प्रश्नच आहे. 'स्वतःचे घर असणे' पुरेसा बँक बॅलन्स असणे' 'कार किंवा तत्सम गरजेच्या गोष्टी असणे' म्हणजे सेटल होणे असे मानले तर वयाच्या तिशी-पस्तीशीत 'सेटल' झालेली मुलगा मुलगी दिसेल का? त्यातही 'सेटल होणे' हे फक्त मुलाच्याच बाबतीत पाहिलं जातं, हेही दिसून येतंय. मुलीकडचे स्थळ बघताना 'वयात अंतर अगदी कमी, स्वतःचे घर.. तेही उत्तम लोकॅलिटीत, शेती वगैरे असेल, अजून काही स्थावर मालमत्ता आहे का, त्याचा जॉब 'आयटी'मध्ये लठ्ठ पगारांचा आहे का? घरात मोठी गाणसं शक्यतो नकोतच अशा अपेक्षा ठेवूनच मुलीकरता स्थळे शोधताना दिसतात. या सगळ्या चाचण्या पार पडल्या की मग स्थळ पसंत पडतं. नाहीतर सरळ त्यावर फुली मानली जाते. 'मुलींनी चोखंदळ असू नये का? हाही प्रश्न येणारच. मुलींनी जरूर सिलेक्टिव्ह असावं, पण 'आपण स्वतः ज्या वयात आहोत तिथे किती कमावतो? 'आपले स्वतःचे घर आहे का?' 'आपली शेती किंवा प्रॉपर्टी आहे का?' या मुद्याचा जरूर विचार करायला हवा. हे मुद्दाम सांगण्याचे कारण म्हणजे आपण एक स्वतंत्र कर्तबगार व्यक्ती म्हणून मुली स्वतः कडे पहात असतील तर मुलाकडून नेमकं काय हवं आहे, आणि ते योग्य आहे का हा विचार जरूर करायला हवा.

आजकाल लग्नं टिकतील की नाही, याहून आधी 'लग्न होतात की नाही' हीच चिंता अनेक पालकांना पडलीय. 'कधी यांची लग्नं होणार, कधी हे मार्गी लागणार' हे प्रश्न घरोघरी चर्चिले जाताहेत. शक्यतो मुलामुलींना सांगितलं जातंय की, तुमच्या बरोबर काम करताहेत, त्यातलेच कुणी पसंत असेल तर सांगा, आम्ही लग्न लावून देऊ. असं म्हणण्याचं कारणच हे आहे की पालकांपेक्षा मुलांना कळतं, असं पालकही मानू लागले आहेत. आपली मुलं अत्यंत प्रॅक्टीकल आहेत. त्यामुळे भावनेच्या भरात ते निर्णय घेत नाहीत, हे पालकांना समजलेलं आहे. याचाच दुसरा परिणाम असा आहे की मुलांना लग्नानंतर जेव्हा कळतं की 'हा जोडीदार आपल्याला योग्य वाटत नाही, तर ते 'काहीही करून लग्न टिकवायचं' या भावनेच्या गुंत्यात न अडकता, सरळ ते तोडून पुढे जायला मागे पुढे पहात नाहीत. त्याचमुळे अनेक पालकांना 'मुलांची लग्न'ही मोठी समस्याच वाटू लागली आहे.

नव्या पिढीने व्यवहारीपणाबरोबर एक गोष्ट मात्र जरूर लक्षात ठेवायला हवी की लग्न हा 'दोन घडीचा डाव' नाही. ती निभवण्याची एक जबाबदारी आहे. लग्न म्हणजेच तडजोड आणि सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे 'परफेक्ट पार्टनर' ही व्यक्ती कुठेच अस्तित्वात नसते. त्याला समजून घेणे, जमले तर ते लग्न 'परफेक्ट' होत असते. ●●●



# मुलांचे पोषण जपताना...

**मुलांना आहाराबाबत आरोग्यपूर्ण दृष्टिकोन द्यायचा असेल तर त्यांना गोष्टी आणि कवितांच्या माध्यमातून आरोग्यसंपन्न आहाराचे महत्त्व सांगावे. एकाच वेळी मुलांना काही खाऊ घालणे अवघड बनते. म्हणून काही ठरावीक अंतरानंतर त्यांना वेगवेगळे पदार्थ खायला द्या. अर्थात त्यामध्ये एक क्रम जरूर असावा. म्हणजे, दिवसभरातून तीन वेळा जेवण आणि तीन वेळा स्नॅक्स अशी काही तरी वर्गवारी करावी. यामुळे एक शिस्त देखील राहिली आणि मुलांची पोषणासंबंधीची गरजही पूर्ण होईल.**

- आई-वडील जेवायला बसतात तेव्हाच मुलांना सोबत घेऊन बसणे उत्तम ठरते. पोळीपेक्षाही त्यांच्या मनात भाज्यांची आवड निर्माण करावी. यासाठी पालक, कोबी, यांचे पराठे बनवावेत. मुलांना खाताना मधून मधून पाणी पिण्याची सवय अजीबात लावू नये.
- मुलांना नेहमी प्रेमानेच जेऊ घालावे. त्यांच्याशी प्रत्येक वेळी प्रेमाने बोलणे अवघड काम असते; पण मुले जेवत असतात तेव्हा आपल्या रागावर नियंत्रण राखणे आवश्यक असते. कारण तुमच्या रागाचा त्यांच्या खाण्यावर नकारात्मक परिणाम होतो.
- बरेचसे पालक आपल्या मनासारखे काम करवून घेण्यासाठी मुलांना त्यांच्या आवडीचे पदार्थ खाण्याचे आमिष देतात. परंतु हे चुकीचे आहे. त्यामुळे मुलांच्या इतर आहारावर प्रतिकूल परिणाम होतो. तसेच चुकीची मानसिकता मुलांमध्ये विकसित होत जाण्याची शक्यता असते.
- मुलांना ट्रिट द्यायचीच असेल तर आठवड्यातील एखादा दिवस निर्धारित करावा. त्यामुळे त्याचाही एक नियम मुलांमध्ये रुजेल आणि इतर वेळी मुले हट्ट करणार नाहीत.
- मुले बाहेर काय खातात, दिवसभर किती पाणी पितात, शीतपेय पितात का? किती पितात? यावर पालकांची नजर असणे आवश्यक आहे. मुलांचा आहार उत्तम पद्धतीने सांभाळण्यासाठी त्याचा उपयोग होऊ शकतो.
- सर्वांत महत्त्वाची गोष्ट म्हणजे, मुलांना चांगल्या सवयी लावायच्या असतील तर स्वतःही त्यांचे अनुकरण केले पाहिजे. यासाठी सकाळी न्याहारी जरूर करणे, दिवसांतून किमान एक फळ खाणे, दिवसातून थोडा सुका-मेवा खाणे यांसारख्या गोष्टी तुम्ही नियमित करू शकता. हे करताना मुलांनाही सोबत घ्यावे. त्यामुळे मुलांनाही चांगल्या आरोग्यदायी सवयी लागण्यास मदत होईल.
- मुलांना आपण का जेवतो, यामागची कारणे, त्याचे महत्त्व वेळोवेळी पटवून सांगावे. कुठल्या पदार्थांमध्ये कोणते घटक आहेत, ते शरीरासाठी का आवश्यक आहेत, या संबंधीची माहिती द्यावी. त्यामुळे त्यांच्यामध्ये आरोग्यपूर्ण आहारासंबंधी आवड निर्माण होईल. मुलांना खाण्याची योग्य पद्धत कशी आहे ते शिकवावे. घास चावून खावा. फार मोठा घास घेऊ नये, काट्याचा चमच्याचा वापर कसा करावा हे शिकवावे. तसेच टीव्ही बघत जेवू नये, डायनिंग टेबलवर जेवताना किंवा खाली बसून जेवताना कसे जेवावे या गोष्टीही शिकवाव्यात. कारण यामुळे आहारासंबंधीचा शास्त्रीय दृष्टिकोन तयार होतो आणि तो मुलांच्या आरोग्यासाठी अनुकूल ठरतो. ●●●

# प्राणीप्रेमी फॅशन



**पदरावरती भरझरीचा मोर नाचरा हवा... आई मला नेसव शालू नवा...! असे लाडे लाडे म्हणत शालू मागणारी तरुणीसुद्धा पदरावर मोरच हवा असा आईकडे हट्ट करते. म्हणजे प्राण्यांच्या चित्रांची आवड ही खूप आधीपासून आहे. फक्त आता मात्र हा ट्रेंड जरा बदलून वेगळ्या स्वरुपात फॅशन म्हणून येऊ लागला आहे.**

- हटके दिसण्यासाठी सध्या कोण काय करेल हे सांगताच येत नाही. आपल्याकडे घुबड अशुभ मानलं जातं. पण फॅशन वर्ल्डमध्ये हेच घुबडही ट्रेंडी आणि लोकप्रिय झालं. घुबडच काय, पण सध्याची तरुणाई प्राणी पक्ष्यांना गळ्यात घेऊन फिरत आहेत. म्हणजे खरेखुरे नव्हे तर लेटेस्ट फॅशन ॲक्सेसरीजच्या रुपात ते त्यांच्या गळ्यातले ताईत बनले आहेत.
- तसं पहायला गेलं तर ॲनिमल डिझाइन्स किंवा नक्षी ती तशी पूर्वीपासूनच प्रचलित आहे. म्हणजे साड्यांवर मोर, हत्ती यांची डिझाईन्स असायची. आताही दिसतात. मात्र सध्या त्यांना नव ग्लॅमर आले आहे.
- नेकलेस, ब्रेसलेट, अंगठ्या, कानातले टॉप्स अशा ज्युलरीमध्ये विविध प्राणी पक्ष्यांचा समावेश झाला आहे. घुबड, हत्ती, मोर, साप, ड्रॅगन, सिंह आणि अगदी पालीच्या आकाराची ज्वेलरीही आजच्या हौशी तरुणींमध्ये दिसून येते.
- अशी ज्वेलरी वापरण्यामागे अर्थातच फॅशनचा एक भाग असला तरी त्यातून आपल्या व्यक्तिमत्वाची ओळख सांगण्याचाही प्रयत्न असतो.
- ॲनिमल ज्युलरी लोकप्रिय होण्याचं मुख्य कारण म्हणजे आपल्याला आवडणारे प्राणी हव्या त्या आकर्षक रंगात उपलब्ध आहेत. त्यामुळे थोडा हटके आणि इंटरेस्टिंग लुक मिळतो.
- ही ज्वेलरी वेस्टर्न आऊटफिटवर खुलून दिसते. योग्य प्रकारे निवड केल्यास संध्याकाळच्या पार्टीत साडी किंवा इव्हिनिंग गाऊनवरही ॲनिमल सेंट्रिक ज्वेलरी छान दिसते. अशा या ज्वेलरीच्या माध्यमातून आपली प्राण्यांवर प्रेम करा, हा संदेशही सर्वत्र देण्यासाठी मदत करतो.



# सपाट चपलांचा ट्रेंड

**उंच टाचांच्या चपलांपेक्षा फ्लॅट चप्पल निश्चितच आरामदायी असतात. योग्य पेहरावावर योग्य फ्लॅट चप्पल वापरल्यास चांगला लूक मिळू शकतो.**



- **लोफर्स :** सध्याच्या मोसमात गडद किंवा फिक्या रंगातील लोफर्स वापरू शकता. अर्थात पोशाखाला साजेसे आहेत की नाही याचा विचार जरूर करावा. ट्राऊझर्स, लांब स्कर्ट असेल तर त्यावर लोफर्स घालता येऊ शकतात. पण जर लोफर्सचा तळ जड असेल तर मात्र फक्त स्कर्टबरोबरच ते वापरा.
- **राऊंड टो :** सध्या बाजारात विविध डिझाईन, प्रकारातील राउंड टो गोलाकार टाच असलेले फ्लॅट फूटवेअर उपलब्ध आहेत. पुढून दिसायला छोटे असल्याने ते लहान पावलांना मोठे भासवते. साध्या पँटबरोबर घातल्यास ते नक्कीच स्टाईलिश दिसतील. जास्त किंवा कमी उंचीची पँट, जीन्स, स्कर्ट यांच्यावरही राऊंड टो फ्लॅट चांगल्या दिसतील.
- **पॉईंटेड :** तरुणींच्या पसंतीला उतरले हा प्रकार. स्कर्ट बरोबर पॉईटेंड फ्लॅटस वापरता येतात. स्कर्टबरोबर घालता येतात. स्ट्रेट फिटिंग जीन्स किंवा घोट्या पर्यंत लांब पँट वरही हे घातले जाऊ शकतात. मात्र अगदी स्कीन टाईट जीन्सबरोबर पॉईटेंड फ्लॅटस घालण्याची चूक करू नका. आपला लूक चांगला दिसणार नाही.
- **स्ट्रेपी :** स्ट्रेपी फ्लॅटस ऑफिसवेअर म्हणून नक्कीच योग्य दिसतील. त्यामुळे व्यक्तीमत्त्व आकर्षक दिसेल. सर्वसाधारणपणे पाश्चिमात्य पोशाखांवरच स्ट्रेपी फ्लॅटस वापरले जातात. भारतीय आणि पाश्चिमात्य दोन्ही प्रकारच्या पोशाखावर ते घातले जातात.

●●●

# एकच ध्येय! एकावेळी

• जगदीश काळे

रुग्णावर ऑपरेशन करणारे डॉक्टर असो, खेळाच्या मैदानात चेंडूवर लक्ष केंद्रित करणारा क्रिकेटपटू असो एवढेच नाही तर बँकेत कॅशियरचे काम करणारा कर्मचारी असो या तिन्ही मंडळीचे एक समान वैशिष्ट्ये म्हणजे ते एकावेळी एकच काम करतात. ऑपरेशन करताना डॉक्टरने आणखी एखादे काम हाती घेतले तर ते ऑपरेशन योग्य रितीने होणार नाही. खेळाडूने चेंडूवर किंवा गोलंदाजावर लक्ष केंद्रित केले नाही तर तो चांगली फलंदाजी करू शकणार नाही आणि बँकेत कॅशियरचे काम करणारा कर्मचारी हा जमा होणाऱ्या पैशाबाबत सजग राहिला नाही तर दररोज त्याला नुकसान सोसावे लागेल. याचा सारासार अर्थ असा की काम कोणत्याही क्षेत्रातले असो, ते आपण लक्ष केंद्रित करूनच करायला पाहिजे आणि एकाचवेळी अनेक कामांची जबाबदारी घेणे टाळले पाहिजे.



अनेक कामे हाती घेतल्यामुळे एखादे काम विसरण्याची शक्यता असते.कामाचा गुंता हा योग्य रितीने सोडविण्याचा प्रयत्न केला तर त्याचे सकारात्मक परिणाम दिसून येतात. अन्यथा आणखी गुंतागूंत वाढण्याची शक्यता असते. म्हणूनच काही गोष्टीचे पथ्य आपण पाळले पाहिजे.

लक्षात राहणाऱ्या कामाची यादी : पहिल्यांदा आपल्याला आवडणाऱ्या आणि शिकाव्यासा वाटणाऱ्या गोष्टींची यादी तयार करा. प्रत्येक ॲक्टिव्हिटीच्या वेळी ही यादी तयार करण्याची सवय आपण ठेवायला हवी. ती यादी किती मोठी होईल, याचा विचार करू नका. त्यातील तुम्ही चांगल्या पाच गोष्टी निवडा, ज्या की तुम्हाला शिकताना उत्साह वाटला किंवा वाटू शकतो आणि तुम्हीच स्वतः ला प्रश्न विचारा की, त्या आपल्यासाठी महत्त्वाच्या का आहेत. पहिल्या पाच गोष्टी निवडल्यानंतर त्यातून आणखी तीन गोष्टीची निवड करा. गेल्या दहा वर्षाच्या काळात या तीन गोष्टीशिवाय आपण अन्य विचारच करू शकलो नसतो, यादृष्टीने अशांचा त्यात समावेश असावा. या तीन गोष्टीपासून शिकल्यानंतर भविष्यात काय फायदा होणार आहे, याचाही विचार करणे गरजेचे आहे. भविष्यात आपले ध्येय साध्य करण्यासाठी या तीन गोष्टीचा फायदा कसा होईल, याचा विचार केला पाहिजे. टप्प्याटप्प्याने कामावर लक्ष केंद्रीत करता येईल आपण ध्येयप्राप्तीकडे वाटचाल करू शकू.

आवडीला कौशल्याची जोड द्या: आपण निवडलेल्या तीन गोष्टीतून त्याला कौशल्याची जोड कशी देता येईल, याकडे लक्ष दिले पाहिजे. त्यासाठी आपण नियोजन करणे गरजेचे आहे. त्या गोष्टीचा भविष्यात काय फायदा होऊ शकतो, याचा विचार करून आपण आवडणाऱ्या गोष्टीला आणखी धार देण्याचा प्रयत्न केला पाहिजे. उदा. लहानपणापासून आपल्या वाद्याची किंवा नृत्याची आवड असेल तर त्यात आपण करियर करू शकतो का किंवा त्यात प्रगती कशी करता येईल, याचाच सारासार विचार करून आपण वाटचाल केली पाहिजे. यासाठी सहा महिने, वर्ष दोन वर्षाचाही कालावधी लागू शकतो. एका कामावर आपण फोकस केले की त्यात आपले कौशल्य विकसित होण्यास फार काळ लागत नाही. एकावेळी अनेक गोष्टीकडे लक्ष दिले तर एकाताही आपण 'मास्टर' होऊ शकत नाही. त्यासाठी कष्ट करण्याची आणि सरावाची तयारी ठेवायला हवी.

कौशल्यात प्राविण्य मिळवा: आवडीच्या किवा उत्साह निर्माण करणाऱ्या गोष्टीवर लक्ष केंद्रित करून त्यात प्राविण्य मिळवण्यासाठी प्रयत्न सुरू केले पाहिजेत. प्रत्येक टप्प्यावर त्याची नोंद करून आपण किती प्रगती केली आहे, त्याचा आढावा सातत्याने घेणे गरजेचे ठरते. मागच्या चुकात सुधारणा करून आपण किती कौशल्य हस्तगत केले आहे, याची चाचपणी करायला हवी. आपण आणखी कशी प्रगती करू शकतो किंवा कसे लक्ष केंद्रित करू शकतो, याचाही विचार केला पाहिजे. किरकोळ चुकात सुधारणा करून कौशल्य हस्तगत करण्याचा प्रयत्न करणे आवश्यक आहे. म्हणूनच शिकताना बारीकसारीक गोष्टीची आपल्याकडे नोंद करणे गरजेचे ठरते. ध्येयप्राप्तीसाठी कृती योजना तयार करा: आपण ठरविलेले ध्येय किंवा उद्दिष्ट्ये साध्य करण्यासाठी कृती योजना तयार करा. ही योजना महिन्यासाठी असावी आणि त्याला आपल्या वेळेने भागावे. त्यानुसार आठवड्याचा आणि दिवसाचे नियोजन करणे सोपे ठरू शकते. त्यानुसार आपण कामावर लक्ष केंद्रित करून त्यादृष्टीने वाटचाल करता येऊ शकेल. दररोज अर्धा तास जरी आपण निवडलेले काम लक्ष देऊन केले तर ते काही महिन्यातच पूर्ण होऊ शकते. परीक्षेची तयारी किंवा एखाद्या वस्तूचे उत्पादन हे काही एका दिवसात पूर्ण होत नाही. दररोज टप्प्याटप्प्याने त्याचा साचा तयार केला जातो आणि कालांतराने ती वस्तू आकारास येते. दरोज नियमितपणे अभ्यास केला तर चांगले गुण, प्राविण्य मिळू शकते. एकावेळी एकच गोष्ट निवडून ती पूर्ण करण्यासाठी नियोजन केले तर यश हमखास आपल्या पदरात पडते. ●●●

# सौंदर्योपचार आणि वय




नववीत गेलेल्या मुलीने आईकडे आयब्रोज करण्याचा हट्ट करणे हा आजकालच्या आयांसाठी नवा अनुभव नाही. पण वयात येणाऱ्या आपल्या मुलीला आत्तापासूनच या ब्युटी ट्रीटमेंटची सवय लावावी की नाही, अशी त्यांची द्विधा मनःस्थिती होऊन जाते. ब्युटी पार्लरमध्ये जाणाऱ्या मुलीचे वय दिवसेंदिवस कमी होत चालले आहे. पूर्वी कॉलेजामध्ये गेल्यावर पार्लरमध्ये जायची सवय असलेल्या मुली आता शाळेत असतानाच या सगळ्या ब्युटी ट्रिटमेंटसमध्ये तरबेज झालेल्या दिसतात. त्यांना घेऊन येणाऱ्या आया मात्र खुप कन्फ्युज असतात. लहान वयात पार्लरमध्ये जाणं योग्य नाही, हे वास्तव एकीकडे त्रास देत असतं. तर दुसरीकडे मुलीचा हट्ट, समवयस्क मुलीकडे पाहून तिला अशा गोष्टींचं वाटणारं कुतुहल आणि मुलगी सुंदर दिसावी अशी इच्छा असा सगळाच गोंधळ आईच्या मनात सुरु असतो. काही ब्युटी ट्रिटमेंट्सनी मुलींचा आत्मविश्वास वाढत असला तरी या ट्रीटमेंट्ससाठी तिनं एक विशिष्ट वय पूर्ण केलेलं असणं महत्त्वाचं असतं. नाही तर त्याचे दुष्परिणाम मुलीलाच भोगावे लागतात. कोणत्या ट्रीटमेंट कोणत्यावयात कराव्यात, त्याचे फायदे, तोटे याची माहिती जाणून घेऊ.

- **पिंपल्स ट्रीटमेंट :** वयात येताना पिंपल्स येणं ही सामान्य घटना आहे. मात्र १६व्या वर्षापर्यंत त्यावर ट्रीटमेंट घेऊ नये. त्याआधी काही करायचे झाल्यास हर्बल किंवा आयुर्वेदिक ट्रीटमेंट घ्यावी. रसायनयुक्त ट्रीटमेंट अजिबात घेऊ नये.
- **आयब्रोज :** शक्य तितक्या उशीरा करणं चांगलं. लहान वयातच आयब्रोज करायला सुरुवात केल्यानं डोळ्यावरची त्वचा सैल पडते. सुरकुत्याही येतात.
- **वॅक्सिंग :** वॅक्सिंग वयाच्या तेरा,चौदा वर्षापासून करावे. मात्र ते वरचेवर करु नये. तीन ते चार महिन्यातून एकदा करावं. नाही तर त्वचेवर डाग पडतात. त्वचा तेलकट असल्यास पुरळ येण्याची शक्यता तपासून मगच वॅक्सिग करावं. ब्लॅक हेड्सही या वयात काढले तरी चालतात. हेअर कलरिंग स्टेटनिंग, परमनंट कलर, स्टेटनिंग टाळाच. त्याऐवजी कलर स्प्रे वापरता येईल, पण कायम नाहीच.
- **ब्लिच :** दहावीत गेल्यावर बऱ्याच मुली ब्लीच करतात. हे हानिकारक आहे. लहान वयात त्वचा नाजुक असताना ब्लीच केल्यास ती कायमची काळी पडू शकते. ●●●

## काँग्रेसने चालवली तयारी, विरोधीपक्ष पाठिंबा देणार

# राज्यसभेचे सभापती धनखड यांच्याविरोधात अविश्वास प्रस्ताव?

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क



**नवी दिल्ली :** राज्यसभेचे सभापती जगदीप धनखड़ यांच्याविरोधात विरोधी पक्ष आयएनडी आघाडी अविश्वास प्रस्ताव आणू शकते. काँग्रेसने हा प्रस्ताव आणण्याची तयारी दर्शवली असून, त्याला इंदिरा आघाडीतील इतर पक्षांचाही पाठिंबा मिळू शकतो. राज्यसभेचे सभापती म्हणून जगदीप धनखड़ पक्षपाती असल्याचा आरोप विरोधी पक्षांनी केला आहे. विरोधी पक्षांच्या खासदारांना ते संधी देत नाहीत आणि त्यांच्याकडे दुर्लक्ष केले जाते. ममता बॅनर्जी यांचा तृणमूल काँग्रेस, अरविंद केजरीवाल यांचा आम आदमी पक्ष आणि अखिलेश यादव यांच्या समाजवादी पक्षाने या प्रस्तावाला पाठिंबा दिला आहे.

विरोधी पक्ष हा प्रस्ताव राज्यघटनेच्या कलम ६७ (ब) अन्वये आणणार आहेत. सोमवारी संसदेच्या दोन्ही सभागृहांच्या कामकाजावर परिणाम झाला. राज्यसभेचे कामकाज ही अनेकवेळा तहकूब केल्यानंतर दिवसभरासाठी तहकूब करण्यात आले.

यावेळी जगदीप धनखड़ यांनी विरोधी खासदारांच्या वृत्तीवरही दु:ख व्यक्त करत हे लोक कामात व्यत्यय आणत असून लोकशाहीच्या मंदिरात चर्चा टाळत असल्याचे सांगितले.

सोमवारी सत्तापक्ष आणि विरोधकांनी विविध मुद्द्यांवर गदारोळ केल्याने राज्यसभेचे कामकाज तीन वेळा तहकूब झाल्यानंतर दुपारी ३ वाजून १० मिनिटांनी दिवसभरासाठी तहकूब करण्यात आले. काँग्रेस आणि त्यांचे नेते परदेशी संघटना आणि व्यक्तींच्या माध्यमातून देशाचे सरकार आणि अर्थव्यवस्था अस्थिर करण्याचा प्रयत्न करत असल्याचा आरोप एनडीएच्या खासदारांनी केला.

या विषयावर चर्चा व्हावी, अशी मागणी त्यांनी केली. त्याचवेळी काँग्रेसच्या नेतृत्वाखाली विरोधकांनी अदानी समूहाशी संबंधित मुद्दा उपस्थित करत पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि सरकारविरोधात घोषणाबाजी केली. तीन वेळा स्थगन झाल्यानंतर दुपारी तीन वाजता राज्यसभेचे कामकाज सुरू होताच विरोधी सदस्यांनी अदानी समूहाशी संबंधित मुद्दा उपस्थित करत पंतप्रधान आणि सरकारविरोधात जोरदार घोषणाबाजी केली. विरोधी पक्षातील काही सदस्य आपापल्या जागेच्या पुढे सरसावले.

सभागृह नेते जे. पी. नड्डा आणि विरोधी पक्षनेते मल्लिकार्जुन खर्गे यांच्यासोबत त्यांच्या दालनात बैठक झाल्याची माहिती सभापती जगदीप धनखड़ यांनी दिली. सभागृहाचे कामकाज सुरळीत व्हावे, हा या बैठकीचा उद्देश होता. दोन्ही बाजूंनी मोकळेपणाने चर्चा केली आणि देशाची अखंडता आणि सार्वभौमत्व आपल्यासाठी पवित्र असल्याचे संकेत दिले. मंगळवारी सकाळी १०.३० वाजता त्यांच्या दालनात पुन्हा बैठक घेण्याचे नेत्यांनी मान्य केल्याचे धनखड़ यांनी सांगितले.

## » Selected

### ममता बॅनर्जी यांचा बांगलादेशला इशारा

**कोलकाता** : पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री आणि तृणमूल काँग्रेसच्या प्रमुख ममता बॅनर्जी यांनी बांगलादेशला कडक शब्दांत इशारा दिला



असून जर तुम्ही आमचा भूभाग ताब्यात घेण्याचा प्रयत्न केला तर आम्ही शांत बसून राहू का, असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला आहे. पश्चिम बंगाल विधानसभेत त्यांनी बांगलादेशवर सडकून टीका केली. बांगलादेशात जे काही घडत आहे ते योग्य नाही, असे म्हणत त्यांनी तेथील अल्पसंख्याकांवरील अत्याचारांवर त्यांनी गंभीर चिंता व्यक्त केली. ममता बॅनर्जी विधानसभेत म्हणाल्या, कोणीतरी कोलकाता काबीज करण्याविषयी बोलले. काहींनी पुन्हा पश्चिम बंगाल, बिहार आणि ओडिशा परत मागण्याचा इशारा दिला आहे. कोलकता किंवा बंगाल काबीज करण्यासाठी कोणी आले तर राज्य सरकार गप्प बसणार नाही आणि लॉलीपॉप खात राहणार नाही. भारत अविभाज्य आहे, असे त्यांनी स्पष्टपणे सांगितले.

### भारताचे परराष्ट्र सचिव बांगलादेश दौऱ्यावर

**नवी दिल्ली** : बांगलादेश मध्ये अल्पसंख्यांक हिंदू समाजावर सुरू असलेले अत्याचार थांबण्याचे नाव घेत नाहीये. या अत्याचाराच्या विरोधात भारतात जागोजागी निदर्शनं सुरू आहेत. अशातच आता भारताने चर्चेच्या दिशेने पहिले पाऊल उचलण्याचा निर्णय घेतला आहे. परराष्ट्र सचिव विक्रम मिसरी सोमवार दिनांक ९ डिसेंबर रोजी धाका येथे पोहोचले असून भारत आणि बांगलादेश यांच्या मध्ये द्विपक्षीय बैठक होणार असल्याची चर्चा आहे. मुहम्मद युनुस यांच्या अंतरिम सरकारच्या स्थापनेनंतर पहिल्यांदाच भारत सरकारचे प्रतिनीधी बांगलादेशला भेट देत आहेत. परराष्ट्र सचिवांच्या भेटी दरम्यान द्विपक्षीय बैठकीत विविध विषयांवर चर्चा होणार असल्याची माहिती माध्यमांना मिळाली. ४ डिसेंबर रोजी बांगलादेशाच्या अंतरिम सरकारचे प्रतिनीधी शफीकुल आलम यांनी माध्यमांशी बोलताना माहिती दिली की दोन्ही देशांमधील परस्पर हितसंबंधावर चर्चा होणार आहे. या वर्षी सप्टेंबरमध्ये, बांगलादेशाच्या अंतरिम सरकारचे परराष्ट्र सल्लागार (मंत्री) मो. तौहीद हुसैन यांनी परराष्ट्रमंत्री एस जयशंकरांची भेट घेतली होती.

### दिल्लीत पुन्हा बॉम्बची धमकी

**नवी दिल्ली** : दिल्लीतील शाळा, हॉटेल, विमानतळासह अनेक ठिकाणे बॉम्बने उडवण्याची धमकी दिल्याच्या घटना सातत्याने उघडकीस येत होत्या. अजूनही हे सत्र सुरूच असल्याचे दिसून येत आहे. आज सकाळी पुन्हा दिल्लीतील शाळा बॉम्बने उडवून देण्याच्या धमक्या देण्यात आल्या आहेत. धमकीची माहिती मिळताच घटनेचा कसून तपास सुरू करण्यात आला आहे. मात्र यामुळे विद्यार्थ्यांसह पालकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. सोमवारी सकाळी सात वाजण्याच्या सुमारास दिल्लीतील चाळीस शाळांना ईमेलद्वारे बॉम्बच्या धमक्या मिळाल्या. यामध्ये पश्चिम विहारच्या डीपीएस आणि जीडी गोयंका स्कूल व्यवस्थापनाला धमकी देण्यात आली. त्याचबरोबर आरके पुरममधील दिल्ली पब्लिक स्कूल, पश्चिम विहारमधील जीडी गोएंका, मयूर विहारमधील मदर मेरी स्कूल, चाणक्यपुरीतील ब्रिटिश स्कूल, मयूर विहारमधील सलवान पब्लिक स्कूल, मंडी हाऊसमधील मॉडर्न स्कूल, केंब्रिज स्कूल, वसंत कुंजमधील दिल्ली पब्लिक स्कूल अशा अनेक शाळांचा समावेश आहे.

## ईव्हीएमवरुन पृथ्वीराज चव्हाण यांचा आरोप

# जागतिक तज्ज्ञांकडून ईव्हीएमची तपासणी व्हावी

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क



**सातारा** : ईव्हीएमविरोधात मारकडवाडी गावात आंदोलन उभं राहत असताना माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांनी ईव्हीएमवर मोठं भाष्य केलं. ईव्हीएमबद्दलचा माझा २०१९ चा जुना व्हिडिओ दाखवला जातोय. ईव्हीएम मशीनमध्ये ट्रान्समीटर आणि रिसिव्हर नाही, अशी माझी माहिती आहे.

मतदान झाल्यानंतर ईव्हीएम हॅक करता येणार नाही, असं मी त्यावेळी म्हटलं होतं. परंतु, व्हीव्हीपॅटमधील मतांची मोजणी करुन आंतरराष्ट्रीय समिती नेमून मशीनची तपासणी केली पाहिजे, अशी माझी आता मागणी आहे, असं त्यांनी यावेळी सांगितलं. यावेळी त्यांनी माजी सरन्यायाधीश धनंजय चंद्रचूड यांच्यावरही हल्लाबोल केला.

ईव्हीएमबद्दलचा माझा २०१९ चा जुना व्हिडिओ दाखवला जातोय. ईव्हीएम मशीनमध्ये ट्रान्समीटर आणि रिसिव्हर नाही, अशी माझी माहिती आहे. मतदान झाल्यानंतर ईव्हीएम हॅक करता येणार नाही, असं मी त्यावेळी म्हटलं होतं. परंतु, आंतरराष्ट्रीय समिती नेमून मशीनची तपासणी केली पाहिजे, अशी माझी मागणी आहे. ठराविक मशिनमधील मतं मोजण्यापेक्षा सर्वच मशिन आणि व्हीव्हीपॅटमधील मतं मोजली जावीत. त्यासाठी काही दिवस लागतील, पण हे नाही केलं तर लोकांचा संशय वाढेल, असंही त्यांनी सांगितलं.

ईव्हीएममध्ये प्रोग्रामिंग करणं शक्य आहे. जगातील प्रगत देशांमध्ये ईव्हीएमवर निवडणुका होत नाहीत. भारतात हट्टानं ईव्हीएमवर निवडणुका घेतल्या जातात, असा आरोपही पृथ्वीराज चव्हाण यांनी यावेळी केला. भारतातील लोकशाही टिकावी, ही जगातील लोकशाही प्रेमी नागरिकांची इच्छा आहे. निवडणूक प्रक्रियेबाबत आणि निकालाबाबत सामान्य नागरिकांच्या मनात असलेलं संशयाचं वातावरण केंद्रीय निवडणूक आयोग आणि केंद्र सरकारनं दूर करावं, असे आवाहनही त्यांनी केले.

### २१ डिसेंबर हा जागतिक ध्यान दिवस

**न्यूयॉर्क** : दि. २१ डिसेंबर हा 'जागतिक ध्यान दिवस' म्हणून साजरा केला जावा, हा लिश्टनस्टाईन या देशाने मांडलेला आणि भारतासह अनेक देशांनी अनुमोदन दिलेला प्रस्ताव संयुक्त राष्ट्रांच्या आमसभेने शुक्रवार, दि. ६ डिसेंबर रोजी एकमताने मंजूर केला, अशी माहिती संयुक्त राष्ट्रांतील भारताचे प्रतिनिधी पर्वतनेनी हरीश यांनी दिली.

ते म्हणाले की, "दि. २१ डिसेंबर हा जागतिक ध्यान दिवस म्हणून साजरा करण्याचा प्रस्ताव संयुक्त राष्ट्रांनी मंजूर केला. 'वसुधैव कुटुंबकम्' (संपूर्ण जग एक कुटुंब आहे) अशी भारताची धारणा आहे. माणसाच्या कल्याणासाठी सर्व जगाने एकजुटीने प्रयत्न करायला हवे, असे भारताला वाटते. जगभरात दि. २१ जून हा 'आंतरराष्ट्रीय योग दिवस' म्हणून साजरा केला जातो. त्यासाठी २०१४ साली भारताने पुढाकार घेतला होता." त्याची आठवण करून देत पर्वतनेनी हरीश यांनी म्हटले आहे की, "जागतिक योग दिन ही गेल्या दहा वर्षांत जागतिक चळवळ बनली आहे.

### सीरियाचे अध्यक्ष यांच्याबाबत रशियाचे मौन

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क



**मॉस्को** : सीरियाचे पदच्युत अध्यक्ष बशर अल असद मॉस्कोला पळून गेल्याच्या वृत्ताला दुजोरा देण्यास रशियाने सोमवारी नकार दिला. रशियाचे प्रवक्ते दिमित्री पेस्कोव्ह यांनी पत्रकारांना सांगितले की, असद कुठे आहेत, याबाबत माझ्याकडे सांगण्यासारखे काहीही नाही.

इस्लामी नेतृत्वाखालील बंडखोरांनी दमास्कसमध्ये प्रवेश केल्यानंतर देश सोडून पळून गेल्यानंतर काही तासांतच असद आणि त्यांचे कुटुंबीय मॉस्कोमध्ये असल्याची माहिती क्रेमलिनच्या सूत्रांनी रविवारी वृत्तसंस्थांना दिली. असद यांचा मुलगा रशियाच्या राजधानीत शिक्षण घेत आहे. रशियाने असद आणि त्यांच्या कुटुंबीयांना आश्रय दिला तर हा निर्णय रशियाचे राष्ट्राध्यक्ष व्लादिमीर पुतिन घेतील, असे पेस्कोव्ह यांनी सोमवारी सांगितले. अर्थात राष्ट्रप्रमुखांशिवाय असे निर्णय घेता येत नाहीत आणि हा त्यांचा निर्णय आहे, असे पेस्कोव्ह म्हणाले. तसेच पुतिन यांच्या अजेंड्यावर असद यांच्यासोबत कोणतीही बैठक झाली नसल्याचे त्यांनी सांगितले.

रशियाने युक्रेनचे माजी राष्ट्राध्यक्ष व्हिक्टर यानुकोविच यांच्यासह अनेक पदच्युत नेत्यांना आश्रय दिला आहे. सीरियातील गेल्या काही दिवसांतील नाट्यमय घडामोडींवर थोडक्यात भाष्य करताना पेस्कोव्ह यांनी रशिया आश्चर्यचकित झाल्याची कबुली दिली. जे घडले त्याने संपूर्ण जगाला आश्चर्यचकित केले आहे.

### माजी आयपीएस संजीव भट्ट यांची निर्दोष मुक्तता

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली** : गुजरातमधील पोरबंदर येथील न्यायालयाने माजी आयपीएस अधिकारी संजीव भट्ट यांची १९९७ च्या कोठडीतील छळ प्रकरणात निर्दोष मुक्तता केली आहे. अतिरिक्त मुख्य न्यायदंडाधिकारी मुकेश पंड्या यांनी पोरबंदरचे तत्कालीन पोलीस अधीक्षक (एसपी) भट्ट यांना आयपीसी कलमांखाली दाखल केलेल्या गुन्ह्यातून पुराव्याअभावी निर्दोष मुक्त केले. फिर्यादी संशयापलीकडे गुन्हा सिद्ध करू शकत नाही, असे न्यायालयाने म्हटले आहे.

संजीव भट्ट यांना याआधी जामनगरमधील १९९० च्या कोठडीत मृत्यू प्रकरणात जन्मठेपेची आणि १९९६ मध्ये अंमली पदार्थ बाळगल्याप्रकरणी २० वर्षांच्या तुरुंगवासाची शिक्षा सुनावण्यात आली होती. ते सध्या राजकोट मध्यवर्ती कारागृहात आहेत.

फिर्यादीला गुन्हा कबूल करण्यास आणि धोकादायक शस्त्रे आणि धमक्यांचा वापर करून वेदना देऊन स्वेच्छेने आत्मसमर्पण करण्यास भाग पाडले गेले. त्या वेळी आपले कर्तव्य बजावणारे लोकसेवक असलेल्या आरोपीवर खटला चालवण्याची आवश्यक मंजुरी या प्रकरणात मिळाली नसल्याचेही न्यायालयाने नमूद केले.

### हिमवर्षाव...

पंढरी संचार छायाचित्रसेवा



**मॉन्ट्रियल** : कॅनडातील मॉन्ट्रियल, क्यूबेक येथे हंगामातील पहिल्या हिमवर्षावानंतर तेथील नागरिकांना त्याचा मनमुराद आनंद लुटला.

### मारकडवाडीत गडबड झाली आहे- नाना पटोले

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**मुंबई :** महायुती सरकार मतांच्या आधारावर आलेले नाही. ईव्हीएममध्ये मोठ्या प्रमाणात गडबड आहे. ते आता सर्व जनतेला माहीत पडलंय. मारकडवाडी गावात ग्रामस्थांनी मतदान केले आणि एका उमेदवाराला दिलेली मतं दुसरीकडे गेलीत. ईव्हीएमच्या विरोधात सध्या ग्रामस्थ आक्रमक झाले असून, तिथे ग्रामस्थ आंदोलनाच्या तयारीत आहेत. काल शरद पवारांनी भेट दिली.
मी उद्या किंवा परवा तिकडे जाणार आहे. परंतु तिथली जनता विचारते की, आम्ही केलेले मतदान गेले कुठे? हे पाशवी सरकार आहे आणि यावर सभागृहात सरकारने चर्चा केली पाहिजे, अशी मी मागणी करणार असल्याचंही नाना पटोले म्हणालेत.

समाजवादी पार्टीतील आमदार अबू आझमी आणि रईस शेख यांनी शनिवारी शपथ घेतली आणि आम्ही महाविकास आघाडीतून बाहेर पडलो आहोत, असे वक्तव्य केले आहे.

## शंभू सीमेच्या याचिकेवर सुनावणी घेण्यास नकार

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क



**नवी दिल्ली :** हरियाणा आणि पंजाबमधील शंभू सीमा आणि पंजाबचे इतर महामार्ग उघडण्याची मागणी करणाऱ्या याचिकेवर सुनावणी करण्यास सर्वोच्च न्यायालयाने नकार दिला आहे. न्यायमूर्ती सूर्यकांत यांच्या अध्यक्षतेखालील खंडपीठाने सांगितले की, या प्रकरणी एक याचिका आधीच प्रलंबित आहे. नव्या याचिकेवर स्वतंत्रपणे सुनावणी होणार नाही. याचिकाकर्त्याची इच्छा असल्यास तो प्रलंबित प्रकरणात अर्ज दाखल करू शकतो.

पंजाबमधील जालंधरचे रहिवासी याचिकाकर्ते गौरव लुथरा यांनी म्हटले होते की, शेतकरी आंदोलनामुळे शंभू सीमा बऱ्याच दिवसांपासून बंद आहे. आता शेतकरी संघटनांनी पंजाबचे इतर महामार्गही बंद केले आहेत. हे केवळ बेकायदेशीरच नाही तर इतर नागरिकांच्या मूलभूत अधिकारांचेही उल्लंघन आहे.

भारतीय न्यायिक संहिता आणि एनएचएआय कायद्यांतर्गत रस्त्यात अडथळा निर्माण करणे हा गुन्हा आहे, परंतु पोलिस किंवा एनएचएआय म्हणजे राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण कोणतीही कारवाई करत नसल्याचे याचिकेत म्हटले आहे.

आंदोलनाच्या अधिकारालाही संविधानाने मूलभूत अधिकाराचा दर्जा दिला आहे. पंजाबमधील मोठ्या लोकसंख्येकडून हा मूलभूत अधिकार हिरावून घेण्यात आला आहे.

## उत्तराखंडमध्ये मोसमातील पहिलीच बर्फवृष्टी

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली** : केदारनाथ-बद्रीनाथपासून शिमलापर्यंत उत्तराखंड आणि हिमाचल प्रदेशच्या शहरांमध्ये मोसमातली पहिली बर्फवृष्टी पहायला मिळत आहे. त्यामुळे या ठिकाणी निसर्गाचे मनमोहक दृष्य निर्माण झाले आहे.

पर्वतीय प्रदेशात सर्वत्र बर्फाची चादर पसरलेली दिसून येत आहे. रस्त्यापासून झाडे, वेली, घरे अशा सर्वांवर पांढऱ्या शुभ्र बर्फाचे अच्छादन निर्माण झाले आहे. त्यामुळे या ठिकाणी मनमोहक दृष्य निर्माण झालेय. केदारनाथ मध्येही मोठ्या प्रमाणात बर्फवृष्टी झाली आहे. ज्यामुळे केदारनाथ मंदिर पांढऱ्या शुभ्र बर्फांने वेढल्याचे सुंदर चित्र दिसत आहे. पर्वती आणि डोंगराळ प्रदेशातील बर्फवृष्टीचे चित्र येत्या काही दिवसात मैदानी भागातही दिसून येईल. वातावरणातील थंडीची तीव्रता वाढण्यासोबतच पारा आणखी खाली जाण्याची शक्यता आहे.चमोली, औली, बद्रीनाथ, जोशीमठसह उंचावरील पर्वतरांगा मोसमातील पहिल्या बर्फवृष्टीने न्हाउन निघाल्या आहेत. त्यामुळे पर्यटकही आनंदीत आहेत. उत्तराखंडच्या डोंगराळ भागात तुफान बर्फवृष्टी तर मैदानी प्रदेशात ढगाळ वातावरण पाहायला मिळत आहे.

## ईडी करणार ६ हजार कोटींच्या जप्त मालमत्तेचा लिलाव

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क



**नवी दिल्ली:** पॉन्झी घोटाळ्यात बळी पडलेल्या लाखो गुंतवणूकदारांना लवकरच मोठा दिलासा मिळणार आहे. त्यांचे गेलेले पैसे परत करण्याची तयारी ईडी अर्थात सक्तवसुली संचालनालयाने केली आहे. या साठी ईडीने जप्त केलेल्या तब्बल सहा हजार कोटीरुपयांहून अधिक किमतीची मालमत्ता विकण्याची प्रक्रिया सुरू झाल्याची माहिती आहे. विशेष म्हणजे सर्वोच्च न्यायालय आणि आंध्र प्रदेश उच्च न्यायालयानेही गरीब गुंतवणूकदारांना या माध्यमातून त्यांची गेलेली रक्कम परत देण्यात यावी अशी भूमिका घेतली होती.
पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी लोकसभा निवडणुकीच्या प्रचारादरम्यान अनेक घोटाळ्यांना बळी पडलेल्या नागरिकांना त्यांची गेलेली रक्कम परत देण्याचे आश्वास दिले होते. फसवणुकीला बळी पडलेल्या पीडितांना ईडीने जप्त केलेल्या मालमत्तेचा लिलाव करून पैसे वसूल करण्यासाठी कायद्यात बदल करण्याचे देखील ते म्हणाले होते.
अ‍ॅग्री गोल्ड पॉन्झी घोटाळ्यातील ३२ लाख पीडितांना त्यांचे पैसे परत करण्यासाठी ६,००० कोटी रुपयांहून अधिक जप्त करण्यात आलेली मालमत्ता विकली जाणार आहे. गेल्या आठवड्यात ईडीने अ‍ॅग्री गोल्ड कंपनी आणि तिच्या प्रवर्तकांविरोधात हैदराबादच्या पीएमएलए कोर्टात धाव घेतली होती. ईडीने आंध्र प्रदेश, तेलंगणा, कर्नाटक आणि ओडिशामधील जप्त मालमत्तांची विक्री करण्याची मागणी केली होती.

ईडीने ज्या मालमत्तांसाठी अर्ज दाखल केला आहे, त्यामध्ये २,३१० निवासी व व्यावसायिक भूखंड, अपार्टमेंट्स, मनोरंजन पार्कयांचा समावेश आहे. जप्त केलेल्या २,३१० मालमत्तांपैकी आंध्र प्रदेशात २२५४, तेलंगणामध्ये ४३, कर्नाटकमध्ये ११ आणि ओडिशामध्ये २ मालमत्ता आहेत.

## लासलगाव कृषी समितीत २० हजार क्विंटलची आवक

# कांद्याची आवक वाढल्याने दरात घसरण

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**नाशिक** : जिल्ह्यात लाल कांद्याची आवक प्रचंड प्रमाणात वाढल्याने दरात घसरण सुरू झाली आहे. एकट्या लासलगाव कृषी उत्पन्न बाजार समितीत ११ नोव्हेंबरला लाल कांद्याची ८५६ क्विंटल आवक झाली. आता डिसेंबरमध्ये ही आवक सरासरी २० हजार क्विंटलपर्यंत जाऊन पोहोचली आहे. त्या तुलनेत दरात प्रतिक्विंटल ५०० रुपयांपर्यंत किरकोळ घसरण झालेली असली, तरी आवक कायम वाढत राहिल्यास येत्या काळात दर अजून कमी होण्याची शक्यता वर्तविली जाते.

### जानेवारीत होणार रांगडा कांद्यांची आवक

● लाल कांद्याबरोबर लेट खरीप अर्थात रांगडा कांदा जानेवारीपासून बाजार समितीत विक्रीसाठी दाखल होईल. त्या वेळी कांद्याची आवक



प्रचंड प्रमाणात वाढेल आणि दरात घसरण होण्याचीही शक्यता गृहित धरली जाते. अशा परिस्थितीत निर्यात खुली केली तरच कांद्याचे दर टिकून राहतील; अन्यथा सरकारला पुन्हा शेतकऱ्यांच्या रोषाला सामोरे जावे लागण्याची शक्यता आहे.

गेल्या सहा महिन्यांपासून भाव खाणारा उन्हाळ कांदा आता जवळपास संपला आहे. त्यामुळे लाल कांद्यावरच सर्वांची भिस्त असून, त्याची आवक दिवसेंदिवस वाढत आहे. जिल्ह्यातील सर्व बाजार समित्यांमध्ये दररोज एक लाख क्विंटल लाल कांदा विक्रीसाठी येतो. लासलगाव बाजार समितीत सर्वाधिक सरासरी २० हजार क्विंटल कांद्याची आवक होते. किमान एक हजार, तर कमाल साडेचार हजार रुपये प्रतिक्विंटल दर मिळत आहे. नोव्हेंबरमध्ये उन्हाळ कांद्याची आवक जास्त होती. त्याला प्रतिक्विंटल साडेचार हजार रुपये भाव मिळाला. लाल कांद्याची आवकच कमी असल्याने उन्हाळ कांदाही तेजीत होता. आवक दिवसागणिक वाढत असल्याने दरामध्ये घसरण होण्यास सुरुवात झाली आहे.

लासलगाव बाजार समितीत २६ नोव्हेंबरला साडेचार क्विंटल आवक झालेल्या कांद्याला सरासरी चार हजार रुपये प्रतिक्विंटल इतका दर मिळाला; तर त्याच्या पुढच्याच आठवड्यात साडेसात हजार क्विंटल कांद्याची आवक झाली व भाव सरासरी तीन हजार ७०० रुपये प्रतिक्विंटल याप्रमाणे मिळाला. आता आवक थेट २३ हजार क्विंटलपर्यंत वाढली आहे. भाव सरासरी तीन हजार ८०० रुपयांपर्यंत टिकून आहेत. कांद्याची आवक प्रचंड प्रमाणात वाढत चालल्याने बाजार समितीत वाहने लावण्यासाठी एक दिवस आधी तयारी करावी लागते. एकट्या लासलगाव बाजार समितीत ५०० ते एक हजार वाहने दररोज येतात. यात ट्रॅक्टर, पिकअप आदींचा समावेश आहे.



'मी असं म्हणेल की त्याला सर्व ५ सामने खेळवा. तुम्ही भारतासाठी खेळत आहात, तर वर्कलोड वगैरे गोष्टींचा प्रश्नच उद्भवत नाही. त्याला जोपर्यंत दुखापत नाही, तोपर्यंत त्याने सर्व ५ सामने खेळायला हवेत. ऍडलेड सामना अडीच दिवसातच संपला आहे. — सुनिल गावस्कर

'त्यावेळी माझी आणि सचिनची खेळाडू म्हणून चांगली ओळख तयार झालेली, त्यामुळे आम्हाला सर्व सामन्यात संधी मिळत होती. पण प्रत्येक सामन्यानंतर जेव्हा आम्ही भेटायचो. तो सचिनलाही सोडायचा नाही.' —संजय मांजरेकर



## इंडियाची धडधड वाढली; भारताची डब्लूटीसी क्रमवारीत घसरण

# आफ्रिकेचा मोठा विजय

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क



**केबेरा :** दक्षिण आफ्रिकेने श्रीलंकेविरूद्धचा दुसरा सामना जिंकून भारतीय संघाची धडधड वाढवली आहे. दुसऱ्या कसोटीत आफ्रिकेने श्रीलंकेवर १०९ धावांनी मात केली आणि मालिकेतील दोन्ही सामने जिंकून मालिका आपल्या नावे केली. ज्यामधे पहिल्या डावात रायन रिकल्टन व कायल वेरेने शतक झळकावले, तर दुसऱ्या डावात एडन मार्कराम व टेम्बा बावुमाने अर्धशतकी कामगिरी केली. तर गोलंदाज डेन पीटरसन व केशव महाराज यांनी आपले फायफर (५ विकेट्स) पूर्ण केले. आफ्रिकेने या विजयानंतर जागतिक कसोटी अजिंक्यपद स्पर्धेच्या क्रमवारीत ऑस्ट्रेलियाला मागे टाकत अव्वल स्थान गाठले आहे. त्यामुळे तिसऱ्या क्रमांकावरील भारतासाठी हा मोठा धक्का मानला जात आहे.

जागतिक कसोटी अजिंक्यपद स्पर्धेतील अंतिम सामन्यात पोहचणे भारतासाठी अवघड बनत चालले आहे. श्रीलंकेविरूद्ध पहिला कसोटी सामना जिंकून दक्षिण आफ्रिकेने ऑस्ट्रेलियाला मागे टाकत WTC क्रमवारीत दुसरे स्थान मिळवले. त्यानंतर पिंक बॉल कसोटीत पराभव पत्करल्यामुळे भारताची पहिल्या क्रमांकावरून दुसऱ्या क्रमांकावर घसरण झाली. परंतु आज आफ्रिकेने पहिल्या स्थानावर धडक मारून ऑस्ट्रेलियाला दुसऱ्या व भारताला तिसऱ्या क्रमांकावर टाकले आहे. त्यामुळे WTC फायनलचे स्वप्न पाहाण्यासाठी भारताला ऑस्ट्रेलियाविरूद्धचे उर्वरित तीन सामने जिंकणे अत्यावश्यक बनले आहे.

श्रीलंकेविरूद्ध दुसऱ्या कसोटी सामन्यात आफ्रिकेने सुरूवातीपासून वर्चस्व राखले. रायन रिकल्टन (१०१) व कायल वेरेने (१०५) यांच्या शतकी व कर्णधार टेम्बा बावुमाच्या अर्धशतकी खेळीच्या जोरावर आफ्रिकेने पहिल्या डावात ३५८ धावा केल्या. प्रत्युत्तरात श्रीलंकेने चांगली फलंदाजी केली. पथुम निसंकाच्या ८९ धावांच्या खेळीच्या मदतीने श्रीलंकेने ३२८ धावांपर्यंत मजल मारली.

दुसऱ्या डावातही दक्षिण आफ्रिकेने ३०० धावांचा टप्पा पार केला. ज्यामध्ये एडन मार्कराम (५५) व टेम्बा बावुमाने (६६) अर्धशतकी खेळी केली. दुसऱ्या डावात ३१७ धावा उभारत श्रीलंकेसमोर विजयसाठी ३४८ धावांते लक्ष्य ठेवले. या लक्ष्याचा पाठलाग करताना कर्णधार धनंजय डी सिल्व्हाने अर्धशतक लगावले, पण त्याला इतर फलंदाजांची साथ मिळाली नाही.

# ललित्या, सिरी, ईश्वरी, लक्ष्मी श्री दांडूची आगेकूच

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क



**पुणे :** महाराष्ट्र राज्य लॉन टेनिस असोसिएशन व सोलापूर जिल्हा लॉन टेनिस असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित व ओॲसिस, प्रिसीजन, इलिझियम-जामश्री व बालाजी अमाईन्स पुरस्कृत ओॲसिस सोलापूर ओपन एमएसएलटीए - एसडीएलटीए २५हजार डॉलर महिला आयटीएफ टेनिस स्पर्धेत ललित्या कल्लुरी, सिरी पाटील, ईश्वरी माथेरे, लक्ष्मीश्री दांडू या भारतीय खेळाडूंनी पात्रता फेरीच्या अंतिम चरणात प्रवेश केला.

एम. एस. एल. टी. ए. टेनिस सेंटर, जिल्हा क्रीडा संकुल, कुमठा नाका, सोलापूर येथे आजपासून सुरू झालेल्या या स्पर्धेत पहिल्या पात्रता फेरीत भारताच्या ललित्या कल्लुरी हीने दुसऱ्या मानांकित सोनल पाटीलचा टायब्रेकमध्ये ६-७(३), ६-४, ११-९ असा पराभव करून सनसनाटी निकालाची नोंद केली. भारताच्या सिरी पाटीलने सहाव्या मानांकित थायलंडच्या व्हिएरा दिपर्मचा ६-२, १-६, १०-८ असा तीन सेटमध्ये संघर्षपूर्ण पराभव केला. भारताच्या ईश्वरी माथेरेने सातव्या मानांकित नेपाळच्या अभिलाषा बिस्तचे आव्हान ६-०, ६-० असे एकतर्फी मोडीत काढले. लक्ष्मीश्री दांडूने अकराव्या मानांकित अंजली राठीचा ६-४, ६-४ असा पराभव करून अंतिम पात्रता फेरीत प्रवेश केला. चौदाव्या मानांकित बेला ताम्हणकरने ज्योत्स्ना मदनेवर ६-२, ६-१ असा विजय मिळवला. तिसऱ्या मानांकित स्म्रिती भसीनने ईशा बुधवालला ६-०, ६-० असे पराभुत केले.

# पिछाडीवरून पाटणाचा दमदार विजय; जयपूरवर ३८-२८ने मात



**नवी दिल्ली :** पाटणा पायरेट्स संघाने सहा गुणांच्या पिछाडीवरून उत्तरार्धात सामन्याला कलाटणी दिली आणि जयपूर पिंक पँथर्स संघावर ३८-२८ असा रोमहर्षक विजय नोंदविला. श्री शिवछत्रपती क्रीडा संकुल म्हाळुंगे बालेवाडी येथील बॅडमिंटन हॉलमध्ये सुरू असलेल्या प्रो कबड्डी स्पर्धेत मध्यंतराला जयपूर संघाकडे १८-१२ अशी आघाडी होती. पाटणा संघाने येथील पहिल्या सामन्यात हरियाणा स्टीलर्सकडून पराभव स्वीकारला होता. तरीही त्यांनी या लढतीआधीपर्यंत १६ पैकी नऊ सामने जिंकले असल्यामुळे तसेच माजी विजेता असल्यामुळे त्यांच्याविषयी कमालीची उत्सुकता निर्माण झाली होती. जयपूर संघाने या लढतीआधीपर्यंत १६ सामन्यांपैकी आठ सामने जिंकले होते. येथील पहिल्या सामन्यात त्यांना यू मुंबा संघाविरुद्ध बरोबरी स्वीकारावी लागली होती. सुरुवातीपासूनच दोन्ही संघांनी सावधच पवित्रा घेतला होता त्यामुळेच की काय दहाव्या मिनिटाला ५-५ अशी बरोबरी होती.

# पी.व्ही. सिंधू लग्नाची पत्रिका घेऊन सचिन तेंडुलकरच्या घरी



**नवी दिल्ली :** भारताची बॅडमिंटनपटू पीव्ही सिंधू आणि होणारा नवरा व्यंकट दत्ता साई यांनी मास्टर ब्लास्टर सचिन तेंडुलकरच्या निवासस्थानी भेट दिली आणि लग्नाचे आमंत्रण दिले. पीव्ही सिंधू व व्यंकट दत्ता साई यांचे लग्न २२ डिसेंबर रोजी उदयपुर येथे होणार आहे. सचिन तेंडुलकरने पीव्ही सिंधू आणि व्यंकट दत्ता साई यांच्यासोबतचा फोटो सोशल मीडियावर शेअर करत त्यांना पुढील आयुष्यासाठी शुभेच्छा दिल्या. त्याने ट्वीट मध्ये लिहिले, "बॅडमिंटनमध्ये, स्कोअरची सुरुवात नेहमी 'प्रेमा'ने होते आणि व्यंकट दत्ता साईंसोबतचा तुमचा सुंदर प्रवास 'प्रेम' कायम राहील याची खात्री देतो. तुमच्या मोठ्या दिवसाचा एक भाग होण्यासाठी आम्हाला वैयक्तिकरित्या आमंत्रित केल्याबद्दल धन्यवाद. तुम्हा दोघांनाही आयुष्यभराच्या आठवणी आणि आंनदी प्रवासासाठी शुभेच्छा!" सिंधूचे वडील पीव्ही रमणा यांनी यापूर्वी मीडियाला लग्नाबद्दल सांगितले. ते म्हणाले, "दोन्ही कुटुंबे एकमेकांना ओळखत होती पण महिनाभरापूर्वीच सर्व काही फायनल झाले होते.

# महाराष्ट्रातील मार्शल आर्ट "मर्दानी खेळाला" प्रोत्साहन



**पुणे :** उषा इंटरनॅशनल या भारतातील ग्राहकोपयोगी वस्तू उद्योगामधील आघाडीच्या कंपनीने स्वतंत्र वीर सावरकर भवन, निगडी येथे महाराष्ट्रातील उषा मर्दानी खेळ राज्य-स्तरीय स्पर्धेचे आयोजन करण्यासाठी तुळजा भवानी मर्दानी खेळ प्रशिक्षण व सांस्कृतिक सेवा संस्था, पिंपरी सोबत सहयोग केला. या इव्हेण्टमध्ये १२ समूहांमधील १२५ हून अधिक मार्शल आर्टिस्ट्सनी जुना पारंपारिक मार्शल आर्ट 'मर्दानी खेळ'सोबत महाराष्ट्रातील समृद्ध संस्कृतीला दाखवले. या कार्यक्रमाचे उद्घाटन गुणवंत सेवेसाठी राष्ट्रपती पदक विजेते आणि मर्लिन पुरस्कार जिंकणारे पहिले पोलीस कर्मचारी सुभाष दगडखैर आणि तुळजाभवानी मर्दानी खेल शिक्षण व्ही सांस्कृतिक सेवा संस्था, पुणे यांचे संचालक श्री नितीन दादा लोखंडे यांच्या हस्ते करण्यात आले. त्यावेळी श्री शिवाजी स्मारक मंडळ, महाराष्ट्राचे सदस्य सुधीर थोरात, इतिहास प्रबोधन संस्थेचे अध्यक्ष रवींद्र पाटील, लोणावळा येथील उद्योगपती सुरेश तापकीर डेक्कन कॉलेजच्या पुरातत्व विभागाचे नीलेश जाधव आणि तानाजी मालुसरे यांचे वंशज श्री कुणालजी मालुसरे सह अन्यमान्यवर उपस्थित होते तसेच त्यांनी बक्षीस वितरण समारोहाचे अध्यक्षस्थान देखील भूषवले. विजेते व उपविजेत्यांना शील्ड्स (ढाल) आणि पदकांसह सन्मानित सन्मानित करण्यात आले, तर सर्व सहभागींना परंपरा कायम ठेवण्यासाठी त्यांच्या योगदानाकरिता प्रमाणपत्रे देण्यात आली. अधिक उत्साहाची भर करण्यासाठी लकी ड्रॉचे देखील आयोजन करण्यात आले, जेथे विजेत्याला उषाकडून स्पेशल गिफ्टसह गौरविण्यात आले. सर्वसमावेशकता व संस्कृती जपत महिला व पुरूषांनी अनुक्रमे त्यांच्या पारंपारिक नऊवारी साड्या आणि मांडचोल अंगरखा परिधान केला, तसेच विविध प्रकारच्या शस्त्रांचा वापर करत आक्षेपार्ह व बचावात्मक लढाऊ कौशल्यांमधील प्रभुत्व देखील दाखवले. या इव्हेण्टची खासियत प्राचीन शस्त्रास्त्रांचे प्रदर्शन ठरले.

# क्रिकेट स्पर्धेत एके स्पोर्टस संघाची विजयी सलामी

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क



**पुणे :** नीलेश भिंताडे यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित एन.बी. करंडक २०२४(१७ वर्षाखालील) क्रिकेट स्पर्धेत साखळी फेरीत कौस्तुभ केवाटे(३-२९) याने केलेल्या सुरेख गोलंदाजीच्या जोरावर एके स्पोर्टस संघाने केपी क्रिकेट क्लब संघाचा ४ गडी राखून पराभव करत शानदार सुरुवात केली.

सनी स्पोर्ट्स, हांडेवाडी व ब्रिलियंट क्रिकेट क्रीडांगणा येवलेवाडी या मैदानावर सुरू असलेल्या या स्पर्धेत साखळी फेरीत प्रथम फलंदाजी करताना केपी क्रिकेट क्लब संघाचा डाव ४२.३ षटकात सर्व बाद १३३ धावावर संपुष्टात आला. यात प्रणव कुळये २५, स्वराज पवार नाबाद १९, नील आपूने १५, साई गिरमे १५ यांनी धावा केल्या. एके स्पोर्टसकडून कौस्तुभ केवाटे(३-२९), अन्वय वाशिमकर(२-१५), सोहम वानरे(२-१६), राजवीर देशमुख(१-६) यांनी सुरेख गोलंदाजी केली.

हे आव्हान एके स्पोर्टस संघाने ३५.३ षटकात ६ बाद १३५ धावा करून पूर्ण केले. यात कृष्णा शिंदे नाबाद ५६, राजवीर देशमुख १७, समर्थ देशमुख १४ यांनी धावा काढून संघाच्या विजयात मोलाचा वाटा उचलला.

# सिराज-ट्रेविस हेडला बाचाबाची महागात पडणार

**नवी दिल्ली :** भारत आणि ऑस्ट्रेलिया संघात ऍडलेडला झालेला दिवस-रात्र कसोटी सामना मोहम्मद सिराज आणि ट्रेविस हेड यांच्यात झालेल्या वादामुळे चांगलाच चर्चेत राहिला. बॉर्डर-गावसकर ट्रॉफी या कसोटी मालिकेतील हा दुसरा सामना होता, ज्यात रविवारी (८ नोव्हेंबर) ऑस्ट्रेलियाने अवघ्या अडीच दिवसातच १० विकेट्सने विजयाची नोंद केली.

या सामन्यात दुसऱ्या दिवशी ऑस्ट्रेलियाच्या पहिल्या डावात ट्रेविस हेड दमदार फलंदाजी करत होता. त्याने आक्रमक खेळताना शतकही झळकावले होते. पण दीडशे धावांच्या जवळ असताना ८२ व्या षटकात त्याला सिराजने यॉर्करवर क्लिन बोल्ड केले. त्यामुळे हेड १४० धावांवर बाद झाला. त्यावेळी सिराजने जोरदार सेलीब्रेशन केले. याचदरम्यान ट्रेविस हेडही त्याला काहीतरी बोलताना दिसला. त्यावेळी सिराजनेही त्याला चिडून सेंडऑफ दिला.

## अशोक रुईया मेमोरियल हिवाळी राष्ट्रीय ब्रिज स्पर्धेत

# आशा व पूजा, वासंती व गोपीका यांच्यात अव्वल स्थानासाठी चुरस

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क



**पुणे :** पूना रिजन ब्रिज संघटना यांच्या वतीने आयोजित व ब्रिज फेडरेशन ऑफ इंडिया(बीएफआय), महाराष्ट्र ब्रिज संघटना(एमबीए) यांच्या मान्यतेखाली होत असलेल्या अशोक रुईया मेमोरियल हिवाळी राष्ट्रीय ब्रिज स्पर्धेत आशा शर्मा व पूजा बात्रा, वासंती शहा व गोपीका टंडन या दोन जोड्यानी पात्रता फेरीतील पहिल्या २२ सामन्यांअखेर अव्वल दोन स्थान पटकावून अंतिम फेरीत आगेकूच करण्यासाठी आपले आव्हान कायम राखले. शितल बन्सल - सारिका मित्तल, अलका क्षीरसागर - भारती डे आणि एकता चढ्ढा - बिना मल्होत्रा या जोड्याणी पहिल्या पाच मानांकनामध्ये स्थान मिळवून अंतिम फेरीकडे आगेकूच केली.

श्री शिवछत्रपती क्रीडा संकुल बालेवाडी येथे सुरू असलेल्या या स्पर्धेत महिला पेअर्स विभागात १० पटांवर प्रत्येकी पाच फेऱ्या पार पडणार असून एकूण ५० सामन्याअखेर अव्वल १८ जोड्या ऑल प्ले ऑल राऊंड रॉबिन स्पर्धेसाठी पात्र ठरणार आहेत. या सर्व फेऱ्यानंतर सर्वोच्च गुण मिळवणाऱ्या जोडीला राष्ट्रीय विजेतेपद मिळणार आहे.यानंतर मिश्र दुहेरी, वरिष्ठ सांघिक गोल्ड व सिल्व्हर सांघिक आणि अखेरीस अत्यंत प्रतिष्ठेच्या मॅच पॉइंट पेअर्स या स्पर्धेने सांगता होणार आहे.

तत्पूर्वी, आशा शर्मा व पूजा बात्रा या सातव्या मानांकित जोडीने ९९ गुणांची निश्चिती करताना पहिल्या पात्रता फेरीअखेर अव्वल स्थान मिळवले. अत्यंत चुरशीच्या सामन्यात वासंती शाह व गोपिका टंडन या नवव्या मानांकित जोडीने ९३ गुणांची कमाई केली. तिसऱ्या पटावर शितल बन्सल व सारिका मित्तल या २३व्या मानांकित जोडीने ९२ गुणांची कमाई करताना आपले आव्हान कायम राखले.

# १३ विद्यार्थ्यांची राष्ट्रीय स्पर्धसाठी निवड

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क



**इंदापूर :** क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, पुणे .एस. बी. पाटील स्कूल, पिंपरी चिंचवड, रावेत. पुणे .आयोजित शालेय राज्यस्तरीय कुराश स्पर्धा : २०२४-२५ मध्ये इंदापूर तालुका ज्युदो कराटे स्पोर्ट अकॅडमी व शहा हेल्थ क्लब च्या खेळाडूंची छत्तीसगड येथे होणाऱ्या राष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड झाली.

राष्ट्रीय स्पर्धेसाठी महाराष्ट्रातून निवड झालेल्या 48 खेळाडूंपैकी शहा क्लबच्या 13 खेळाडूंची निवड गोल्ड मेडल विजेते.

१) आदित्य शिंदे २) अजित व्यवहारे ३) अजिंक्य नरुटे ४)कपिल जाधव ५) सोहम देवकर ६) जगदीश तोंडे ७) कु. यशश्री पोतदार ८) कु. श्रावणी शिताप ९) कु. तन्मयी मारवाडे १०) कु. पूजा बनसुडे

सिल्वर मेडल विजेते : १) कु.शुभश्री पोतदार २) कु.वैष्णवी वाघमोडे. ब्रांझ मेडल विजेते : १) सत्यजित सातपुते. सर्व विजेत्या खेळाडूंचे एस बी पाटील ट्रस्टच्या ट्रस्टी श्रीमती पद्माताई भोसले यांनी भेटून अभिनंदन केले तसेच यावेळी संस्थेचे संस्थापक अध्यक्ष व आंतरराष्ट्रीय पंच (कुराश) श्री दत्तात्रय व्यवहारे (सर)पुणे जिल्हा क्रीडा अधिकारी श्री महादेव कासगवडे श्री शिवाजी कोळी महाराष्ट्र कुराश असोसिएशन अध्यक्ष श्री अंकुश नागर (सर) महाराष्ट्र कुराश असोसिएशन सचिव श्री शिवाजी साळुंखे (सर ) उपस्थित होते याचबरोबर श्री नारायणदास रामदास चॅरिटेबल ट्रस्टचे ट्रस्टी श्री भरत शहा शहा ग्लोबल स्कूलचे संचालक श्री अंगद शहा व संस्थेच्या मार्गदर्शका .सौ जयश्री व्यवहारे (मॅडम) पुणे जिल्हा कुराश असोसिएशन सचिव तेजश्री व्यवहारे (मॅडम)कुराश चे राष्ट्रीय पंच श्री. सुनील जाधव (सर), श्री. अनिकेत व्यवहारे (सर), श्री. सागर बनसोडे (सर), श्री. रुपेश भालेराव (सर) यांनी अभिनंदन केले व पुढील स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.

# आरीतने ग्रँडमास्टरला पराभूत करत घडवला इतिहास

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क



**नवी दिल्ली :** भारतामध्ये बुद्धिबळ खेळाला गेल्या काही वर्षात सुगीचे दिवस आले आहेत. गेल्या अनेक वर्षात युवा भारतीय खेळाडूंनी जगात डंका वाजवला आहे. आता दिल्लीतील ९ वर्षीय बुद्धिबळपटू आरीत कपिल याने मोठा पराक्रम केला आहे. त्याने चक्क एका ग्रँडमास्टरला पराभूत केलं आहे. त्यामुळे तो ग्रँडमास्टरला पराभूत करणारा सर्वात कमी वयाचा भारतीय ठरला आहे.

आरीतने केआयआयटी आंतरराष्ट्रीय ओपन टूर्नामेंटमध्ये त्याने रविवारी अमेरिकेच्या ग्रँडमास्टर रुसेट झियात्दिनोव यांना ९ व्या आणि अखेरच्या फेरीत पराभूत केले. आरीतने जेव्हा रुसेट झियात्दिनोव यांना पराभूत केले, तेव्हा त्याचे वय ९ वर्षे २ महिने आणि १८ दिवस इतके वय होते. त्यामुळे तो ग्रँडमास्टरला पराभूत करणारा भारताचा सर्वात युवा, तर जगातील तिसऱ्या क्रमांकाचा सर्वात युवा खेळाडू ठरला. ग्रँडमास्टरला सर्वात कमी वयात पराभूत करण्याचा विश्वविक्रम भारतीय वंशाच्या सिंगापूरमधील अश्वथ कौशिकच्या नावावर आहे.

# १७ चेंडूत ३२ धावा; मोहम्मद शमीची फटकेबाजी अन् बंगाल उपांत्यपूर्व फेरीत

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क



**नवी दिल्ली :** भारतीय संघाला रविवारी ॲडिलेड कसोटीत पराभवाचा सामना करावा लागला. सामन्यातील समालोचनादरम्यान "बुमराहवरचे दडपण वाढतयं, शमीला लवकरात लवकर ऑस्ट्रेलियात बोलवा." अशी मागणी माजी प्रशिक्षक रवी शास्त्री यांनी बीसीसीआयकडे केली. त्यानंतर काहीच वेळात बातमी आली की, मोहमद्द शमी शेवटच्या दोन कसोटी सामन्यासाठी उपस्थित रहाण्याची शक्यता आहे. शमी सध्या सय्यद मुश्ताक अली स्पर्धा खेळत असून त्याच्यावर NCA मेडिकल प्रशिक्षक लक्ष ठेवून आहेत. त्याने आज चंदीगड विरूद्धच्या सामन्यात दमदार फकटेबाजी केली.

घोट्याच्या शस्त्रक्रियेनंतर शमी प्रथमच रणजी ट्रॉफी स्पर्धेत मैदानावर उतरला. त्यानंतर त्याला पुन्हा पायाची समस्या उद्भवली होती. पण सय्यद मुश्ताक अली ट्रॉफी स्पर्धेत शमी उल्लेखनीय कामगिरी करताना पाहायला मिळत आहे. त्याने आज चंदीगडविरूद्ध फलंदाजी करताना जलद खेळी केली. शमीने या दहाव्या क्रमांकावर फलंदाजी करताना ३ चौकार व २ षटकारांच्या मदतीने १७ चेंडूत ३२ धावांची खेळी केली.

बंगाल संघाने प्रथम फलंदाजी करत चंदीगडला विजयासाठी १६० धावांचे लक्ष्य दिले. ज्यामध्ये कोणत्याही फलंदाजाने मोठी खेळी केली नाही. सलामीवीर अभीषेक पोरेल ८ धावांवर बाद झाला तर, करन पालने २५ चेंडूत ३३ धावांची खेळी केली. करन पाल व व्रितीक चटर्जी २१ चेंडूत ४० धावांची भागीदारी केली. चटर्जीने १२ चेंडूत २८ धावांचे योगदान दिले.

## ११व्या फेरीअखेर पहिल्यांदाच आघाडी

# डी. गुकेशचा लिरेनविरुद्ध सनसनाटी विजय

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क



**नवी दिल्ली :** भारताच्या डी. गुकेश याने जागतिक बुद्धिबळ अजिंक्यपद लढतीतील ११व्या फेरीत सनसनाटी विजयाची नोंद केली. या विजयासह त्याने पहिल्यांदाच आघाडी मिळवली. या प्रतिष्ठेच्या लढतीतील तीन फेऱ्या शिल्लक असून, गुकेश सहा गुणांसह आघाडीवर आहे. गतविजेता चीनचा डिंग लिरेन याच्याकडे पाच गुण आहेत. ११वा डाव रिव्हर्स्ड ब्लुमेनफेल्ड ओपनिंगने सुरू झाला. गुकेशने डिंगच्या फ्रेंच बचावाचा सामना करणे टाळले. डिंगला हे ओपनिंग अनपेक्षित असावे. कारण त्याने पहिल्या पाच खेळी करायला ५० मिनिटे घेतली.

यानंतर वेळ भरून काढण्यासाठी त्याने पटापट खेळी करायला सुरुवात केली तेव्हा गुकेशचा विश्वविजेतेपदाच्या लढतीतील अननुभव दिसून आला. स्वतःकडे भरपूर वेळ असताना त्यानेही जरूर नसताना पटापट खेळी केल्या. त्यामुळे त्याच्या हातून वजिराच्या बाजूचे एक प्यादे पुढे ढकलण्याची घोडचूक झाली.

परिस्थिती सावरण्यासाठी गुकेशनेही ५० मिनिटे विचार केला. दोन्ही खेळाडू वेळेच्या दबावाखाली आले. त्यांच्या हातून सर्वोत्कृष्ट खेळी झाल्या नाहीत. गुकेशने स्वतःला सावरत वजिराच्या बाजूचे प्यादे पुढे ढकलले आणि एक प्यादे देऊन आपले सर्व मोहरे आक्रमक ठिकाणी आणून ठेवले. डिंगने बचाव करण्याचा आटोकाट प्रयत्न केला, परंतु त्याने गुकेशची एक चाल बघितली नाही आणि एक मोहरा गमावला. डिंगने लगेचच आपला पराभव मान्य केला.

या विजयामुळे गुकेशने एक दमदार पाऊल विश्वविजेतेपदाकडे टाकले आहे. डिंगचा प्रत्येक डाव बरोबरीत सोडवून टाय ब्रेकमध्ये जाण्याचा मनसुबा गुकेश फोल ठरविणार असे वाटते. अर्थात गेल्या विश्वविजेतेपदाच्या लढतीत रशियन खेळाडू नेपोमिनीआची विरुद्ध मागे पडल्यावर डिंगने लगेच पुढचा डाव जिंकून लढतीत बरोबरी साधली होती. तसे त्याला पुन्हा करू न देण्याची किमया गुकेशने आता उरलेल्या तीन डावांत करायला हवी.